# माणूस

२७ डिसेंबर १९६९ ४० पैसे




‘आपण सिंडिकेटवादी का इंडिकेटवादी याबद्दल त्यांचा गोंधळ झाला असावा ! मला वाटतं आपण त्यांना थोडा वेळ विश्रांती देणं बरं !”



'केवळ अपचन आहे ! चार आठ दिवसांचं एक उपोषण डिक्लेअर करा ! एका दगडात दोन पक्षी ! !'

२७ डिसेंबर १९६९

समग्र साप्ताहिक

# माणूस

वर्ष नववे : अंक तिसावा

संपादक : **श्री. ग. माजगावकर**

सहाय्यक : दिलीप माजगावकर, सौ. निर्मला पुरंदरे

१०२५ सदाशिव, पुणे ३० : दूरध्वनी ५७३५९

किंमत ४० पैसे : **वार्षिक वर्गणी वीस रुपये** : परदेशची वर्गणी चाळीस रुपये

आपला १३ डिसेंबरचा अंक वाचला. 'भितीच्या तुकड्या' हे सदर पूर्वीप्रमाणे विशेष वाटत नाही. एस्. ए. कुलकर्णी ह्यांचा, 'एक व्यासंगी धन्वंतरी' हा लेख छान वाटला. त्या लेखाचा विद्यार्थ्यांवर बराच चांगला परिणाम होईल.


अशोक साळवी ह्यांची 'उणीव' ही कथा बरी आहे.

**डिसेंबर, १३** **पी. जी. मामीडवार, नांदेड.**

तेरा डिसेंबरच्या अंकातील राजेंद्र व्होरा आणि अनिल गोरे यांचा ऐतिहासिक ललितकृतींच्या संदर्भातला लेख वाचला. ऐतिहासिक ललितकृतींबद्दल जे विचार माझ्या मनात अंधुकसे होते ते येथे स्पष्टपणे वाचावयास मिळाले. लेखाला प्रसिद्धी देऊन घरोघर आपण हे विचार पोहोचविलेत हे छानच. असे 'डोस' मराठी-वाचकांना अंतर्मुख करतील ही आशा.

**डिसेंबर, १५** **चंद्रकांत कल्लोळी, कोल्हापूर.**

**प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन.** अंकात व्यक्त झालेल्या मताशी 'माणूस' **साप्ताहिकाचे चालक सहमत** असतीलच असे नाही. ललित साहित्यातील **पात्रे काल्पनिक.**



# दिल्ली

## दिनांक १६ डिसेंबर

### इंदिरानुचरांवर पत्रांचा पाऊस

पत्र-पत्रकांच्या वर्षावात जन्माला आलेल्या इंदिरा-काँग्रेसचे बालपण सध्या पत्र-पत्रकांशीच खेळण्यात जात आहे यात नवल नाही. मुंबई-मेळाव्याच्या तयारीची नांदी म्हणून नवीन काँग्रेसचे सरचिटणीस डॉ. शर्मा यांनी नुकताच इंदिरानुयायांना एक खलिता पाठविला होता. त्याच्या पाठोपाठ प्रत्यक्ष इंदिराजींनीही एक कृपापत्र पाठविले आहे. या पत्रात त्यांनी एक 'समर्थ, समाजवादी, निधर्मी लोकशाही' स्थापण्याचा आपला निर्धार व्यक्त करून आपल्या आर्थिक उद्दिष्टांची रूपरेखा दिली आहे. ही उद्दिष्टे येणेप्रमाणे: आर्थिक शक्तीच्या केंद्रीकरणावर लगाम, आर्थिक विषमता कमी करण्याचे प्रयत्न, भूमिहीनांना व पददलितांना न्याय, व्यक्तिगत फायद्याच्या आधी देशाला लाभ होईल अशा रीतीने अर्थकारणाचे संचालन, सुशिक्षित बेकारीचा प्रश्न जोरात हाताळणे; आणि सरकारी क्षेत्रातील व्यवसायांची कार्यक्षमता सुधारणे.

हे पत्र पाठवून दोन दिवस होतात न होतात तोच इंदिरा-काँग्रेसचे अध्यक्ष सुब्रह्मण्यम् यांनी पक्ष-प्रतिनिधींना स्वदस्तुरचे इंदिरा-स्तोत्र पाठविले. या खलित्यात नवीन काँग्रेसचे प्रागतिक पण अ-साम्यवादी चित्र रंगविण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. पत्रात इंदिराजींना प्रगतिशीलतेचे प्रतीक म्हणून गौरवून सुब्रह्मण्यम् म्हणतात : " इंदिराजींवर साम्यवाद्यांचा किंवा साम्यवादी विचारसरणीचा अथवा पद्धतीचा प्रभाव पडला आहे अशी एक हूल उठविण्यात आली आहे, पण त्यात मुळीच तथ्य नाही. आम्ही फक्त सिंडिकेटवाल्यांच्या 'बॉसिझम्'च्या विरुद्ध आहोत." पत्राच्या शेवटी त्यांनी निःसंकोचपणे आवाहन केले आहे की, " मंडळी हो, इंदिराजींच्या पावलावर पाऊल ठेवून नव्या युगाचे नवे पाईक व्हा." असे पत्र पाठविण्याची सुब्रह्मण्यम् यांना म्हणे आवश्यकता वाटली, कारण मुंबई-मेळाव्याच्या आठवडाभरच आधी अप्पा आणि मंडळी अहमदाबादला काँग्रेस अधिवेशन भरविण्याचा 'देखावा' करीत आहेत.

## नंदाजींच्या एका बोटावरची थुंकी दुसऱ्या बोटावर

इजा, बिजा, तिजा. आधी नवीन काँग्रेसचे सरचिटणीस, नंतर नवीन काँग्रेसच्या अधिष्ठात्री देवता इंदिराजी, व त्यानंतर नवीन काँग्रेसचे अध्यक्ष सुब्रह्मण्यम् यांनी अशी एका पाठोपाठ एक तीन पत्रे आपल्या गोटातल्या मंडळींना पाठवली. – पण एवढ्यावर संपले नाही. तिसऱ्या पत्रकाच्या दुसऱ्याच दिवशी साधु-समागम करून भागलेले अन् पुन: राजकारणाला लागलेले आणि भारताचे धंदेवाईक टेंपरवारी पंतप्रधान गुलझारीलाल नंदा यांनी एक तीन-पानी इंदिरा-प्रशस्ती-पत्रक काढून एकीकडे अप्पा-काँग्रेसवाल्यांना काँग्रेसचे विभाजन करण्याबद्दल फटकारले तर दुसरीकडे "एकीचा दरवाजा अजून खुला आहे" असे आमंत्रण दिले. "आपण हे पत्रक आधी इंदिराजींना दाखवले होते," असा त्यांनी पत्रकारांपुढे कबुलीजबाब दिला. पत्रकात ते म्हणतात : "इंदिराजींवरचे खोटे आरोप मागे घेतले व त्यांना काँग्रेसमधून काढून टाकण्याची कारवाईही मागे घेतली तर पुन: एकी नांदू शकेल. पण हाय ! ध्रुवीकरणाच्या गप्पांना बळी पडून अप्पा आणि मंडळी काँग्रेसचे तुकडे करण्यासाठी कटिबद्ध झालेली दिसतात. ही मंडळी जनसंघ आणि स्वतंत्र पक्षाच्या राजकीय पाठिंब्यावर अवलंबून आहेत." यावर पत्रकारांची खवचट पृच्छा : "मग नवी काँग्रेस साम्यवाद्यांवर तितकीच अवलंबन नाही का ?" नंदाजींचे मासलेवाईक उत्तर : "छे, छे ! आम्ही त्यांच्याशी काही ठरवाठरवी केली तर आमच्यावर संगनमत केल्याचा आरोप ठेवता येईल. पण आमचा एखादा कार्यक्रम त्यांना चांगला वाटल्याने त्यांनी त्याला पाठिंबा दिला तर त्यात आनंदच आहे." आणखी एक मोक्याचा प्रश्न : "जनसंघ व साम्यवादी हे दोन्ही पक्ष काँग्रेसच्या दृष्टीने सारखेच गर्हणीय नाहीत काय ?" नंदाजींचे गंमतीदार उत्तर : "त्यात आपण पडूच नये. आमचा पक्ष दोन्ही पक्षांपेक्षा श्रेष्ठ आहे."

## किती टक्के सत्यमेव जयते ?

अशा या पत्र-पत्रकांच्या फैरीत मुंबई व अहमदाबाद मेळाव्यांची तयारी चालली आहे. अर्थात बहुसंख्येचा दावा दोन्ही काँग्रेस कंठरवाने करीत आहेत. इंदिरा-काँग्रेसचे चिटणीस डॉ. शर्मा म्हणाले, "अहमदाबादला पन्नास टक्क्यांहून अधिक प्रतिनिधी जमले तर अप्पा-काँग्रेस ही खरी काँग्रेस आहे असे आपण मान्य करू. – पण त्यांना आपली तारीख बदलावी लागली यातच त्यांच्या अपयशाची गुरु-किल्ली आहे." उलट अप्पा-काँग्रेसचे चिटणीस शामधर मिश्रा यांनी हे आव्हान स्वीकारून असा जबाब दिला आहे की, अहमदाबादला पन्नास टक्केच काय पण साठ टक्के काँग्रेसजन गोळा झालेले दिसतील." ते काही असले तरी घोडामैदान आता अगदी जवळ आले आहे, कारण हे वार्तापत्र प्रकाशित होईपर्यंत दोन्ही मेळावे

[पृष्ठ ६३ वर]



राज्य नाट्यमहोत्सव स्पर्धा

# केंद्र : पुणे

**अखेर स्पर्धा गंधर्व रंगमंदिरात झाल्या हेच काय ते वैशिष्ट्य. बाकी सगळा आनंदच ...**

**शरद गोखले**

कोणतीही तडजोड करून का होईना, पण स्पर्धा अखेर बालगंधर्व रंगमंदिरामध्ये झाल्या हेच पुणे केंद्रातील नाट्यस्पर्धेचे सगळ्यात मोठे वैशिष्ट्य समजावे लागेल. महिनाभर रेंगाळलेल्या स्पर्धेमध्ये सतरा नाटके पाहूनही स्पर्धेचे सगळ्यात मोठे वैशिष्ट्य म्हणून स्पर्धा बालगंधर्व रंगमंदिरामध्ये झाल्या याचा उल्लेख करण्याची पाळी यावी यावरून सुजाण वाचक नाट्यप्रयोगासंबंधीची माझी सर्वसाधारण प्रतिक्रिया निश्चितपणे समजू शकेल.

स्पर्धेमधील रथी-महारथी म्हणून ज्यांचा उल्लेख केला जातो त्या दोन संस्थांपैकी महाराष्ट्रीय कलोपासक या स्पर्धेमध्ये उतरलेच नाहीत. स्पर्धेच्या नाटकापुरते बोलायचे झाल्यास पी. डी. ए. ची सूत्रे अनुभवी तथापि तरुण उत्साही मंडळींच्या हाती होती. केवळ स्पर्धेच्या मर्यादित दृष्टिकोनातून विचार केला, तर कोणतेही बऱ्यापैकी नाटक घेऊन मुंबईची वाटचाल करण्याचे सामर्थ्य या नाट्यसंघाच्या नटवर्गाकडे, व तंत्रज्ञांकडे आहे. सर्वसाधारणपणे मराठी रंगभूमीला अपरिचित असणाऱ्या विषयावरील प्रयोगशील नाटक घेऊन काही वेगळे, नवीन करता आले तर अवश्य करावे, आणि अशा प्रयत्नांना स्पर्धेची रंगभूमी सगळ्यात सुयोग्य आहे, असे मानणारे जे दोन-चार नटसंघ पुण्या-मुंबईच्या परिसरामध्ये आहेत, त्यामध्ये या संस्थेतील तरुण मंडळींचा समावेश करावा लागेल. या पार्श्वभूमीवर चालू वर्षी सादर करण्यात आलेल्या 'जादूगार'चा विचार करावा लागेल.

'जादूगार' हे श्री. अनिल जोगळेकर यांचे बहुधा तिसरे नाटक. बर्गमन या स्विडीश दिग्दर्शकाच्या 'मॅजिशिअन' वरून त्यांनी हे नाटक घेतले आहे. लेखनाच्या दृष्टिकोनातून विचार करता मूळ कथाविषयाशी, आणि त्यातील गर्भित आशयाशी जोगळेकर प्रामाणिक राहिले आहेत हे मान्य करावेच लागेल. आजच्या प्रेक्षकाला नाटक आवडावे यासाठी कोणतीही खोटी तडजोड त्यांनी केलेली नाही.

मोझेस हा जादूगार. मोहिनीविद्येचे दांडगे सामर्थ्य असलेला, निदान ते आहे

असे भासवणारा, या सामर्थ्याच्या आधारे आपण विविध रोग बरे करतो असे समजणारा मोझेस, स्वतःला डॉक्टर मोझेस म्हणवून घेत असतो. नाटकाला पार्श्वभूमी भारतीय आहे आणि नाटकाचा काळ आहे संस्थानी अमलातला. अशाच एका संस्थानात मोझेसची पार्टी आली असताना–त्याच्याबद्दल विलक्षण तिटकारा असलेला प्रखर बुद्धिवादी डॉक्टर अल्वारीस मोझेसच्या करामतीची चाचपणी करण्याचा प्रयत्न करतो; आणि या प्रयत्नातून त्याची खात्री पटते की, मोझेसजवळ कोणतीही दैवी शक्ती नाही, तो एक सामान्य जादूगार आहे. त्याच्या चार फालतू ट्रिक्सना बळी पडणारा एक कमकुवत मनाचा गडी आहे. स्वतः डॉक्टरवरही या फालतू प्रयोगातून वर्चस्व गाजवण्याचा त्याचा प्रयत्न आहे. तथापि प्रत्येक गोष्टीची तर्कशुद्ध उकल करून डॉक्टर मोझेसचे खरे स्वरूप उघड करतात. आणि आपल्या खऱ्या स्वरूपाची कल्पना येऊनही गरजेपोटी व्यवसाय चालू ठेवणारा मोझेस–आपल्या पहिल्या तोऱ्यात राजवाड्यातील प्रयोगासाठी रवाना होतो.

प्रेक्षकांच्या दृष्टिकोनातून समजू शकणारी ही झाली खोटे मुखवटे धारण करणाऱ्या दुर्दैवी जादुगाराची कहाणी. या कथेमध्ये नाटकाची वैचारिक दृष्टिकोनातून–एका वेगळ्या पातळीवरून पाहणी केली असता प्रभावी ठरणाऱ्या सालोमनला स्थान नाही. प्रवाहाबरोबर वहात जाऊन कलाकारातील कलावंत मरतो. काही तरी भव्य–दिव्य भपकेबाज करण्यामागे तो धावू लागतो, आणि या हव्यासातून निर्माण झालेला एक वेगळा मुखवटा घेऊन तो वावरू लागतो. आपला हा मुखवटा हेच आपले खरे अस्तित्व अशी धारणा होण्यापर्यंत त्याची मजल जाते. खरा कलाकार पूर्ण दबला जातो. एखादा बुद्धिवादी याची चिरफाड करायला बसला म्हणजे प्रत्येक गोष्ट तर्काच्या कसोटीवर तो निरखून पारखून घेतो. आणि मग मुखवटा फाटला जाऊन खरे स्वरूप पुढे येते. वेळ निघून गेलेली असते, आपल्या खऱ्या स्वरूपाची प्रचीती येऊनही पुन्हा मागे वळणे अशक्य असते आणि मग रुळलेल्या मार्गाने वाटचाल चालू राहते.

–आता जादूगारच्या संदर्भात विचार करताना प्रत्येक व्यक्तिरेखा वरील विचाराचे प्रतिनिधित्व करते. मुखवटयाच्या खोट्या जगात वावरणारा कलाकार मोझेस, बुद्धिवादाची कास धरणारा डॉक्टर अल्वारीस, कलेचा बाजार मांडणारा–जंगम, खऱ्या कलाकाराचे प्रतिनिधित्व करणारा सालोमन, या मंडळींच्या वैचारिक ठेवणीतून नाटकाचा आशय उभा रहातो.

हे झाले नाटकासंबंधी. आता हे सर्व प्रेक्षकांपर्यंत पोचवण्याची जबाबदारी कलावंतांची. पुण्याच्या हौशी रंगभूमीवर नाव घेण्यासारखे जे कलावंत आहेत त्यांपैकी अनेक चांगले कलावंत या संस्थेजवळ आहेत. असे असूनही हे नाटक–निदान लेखकाला, दिग्दर्शकाला, कलावतांना अभिप्रेत असलेला अर्थ प्रेक्षकांपर्यंत पोचवू शकत नाही. आणि मग प्रेक्षकांच्या दृष्टीने ती झाली एका जादूगाराची स्टोरी!–अगदी

सामान्य, अर्थहीन आणि भंकस. प्रेक्षकांची प्रयोग संपल्यानंतरची तात्काळ झालेली प्रतिक्रिया ही अशी. कलाकार नेहमीचेच असल्याने आणि निर्मितीची तांत्रिक बाजूही बऱ्यापैकी संभाळली गेल्याने प्रेक्षकांची त्यासंबंधी तक्रार नव्हती; पण जे चालले होते त्यामध्ये नेहमीसारखे काही नव्हते, आणि जे चालले होते ते समजू शकत नव्हते, त्यामुळे प्रेक्षक गोंधळले, काही कंटाळले आणि त्याची थोडीफार प्रचीती प्रयोग चालू असतानाही आली.

कलाकारांपैकी अंजली फडके (पावलो–मेरी) आणि जयंत धर्माधिकारी (जंगम) विशेष प्रभाव पाडून गेले. पुरुषी वेषातील अंजलीचा वावर जितक्या सहजतेने झाला, तितकेच किंबहुना त्याहीपेक्षा अधिक कौशल्य तिने मेरीचा कोंडमारा व्यक्त करताना केले. जब्बार पटेल यांचा डॉक्टर अल्वारीस प्रखर बुद्धिवादी निश्चित वाटला, तथापि आवाजावरील त्यांचा ताबा अधून मधून सुटत होता. अन्य छोटे मोठे कलावंत आपआपल्या जागी ठीक होते. तथापि या सर्वांच्या एकत्रित प्रयत्नातून जी एकसंध नाटयकृती निर्माण व्हावयास पाहिजे होती तशी ती होऊ शकली नाही. नाटक संपल्यावर लक्षात राहिले ते फक्त काही प्रवेश. उदाहरणार्थ–मोझेस–मेरी आणि डॉ. अल्वारीस यांचा प्रवेश, जंगमचे वर्चस्व असलेला भोजनालयातील सीन, डॉ. अल्वारीस शवविच्छेदन करतो तो सीन. इ.

नाटकाची निर्मितीची बाजू समाधानकारक असली तरी कलाकार काहीसे बावचळतच होते. योजलेले तंत्र कोठे दगा देणार नाहीना याची छुपी भिती त्यांच्या मनामध्ये असावी असे वाटले. अर्थात एक–दोन प्रयोगानंतर ही भीती सहज दूर होऊ शकेल.

## ‘ज्युलिएटचे डोळे’

स्पर्धेमध्ये पहावयास मिळालेला आणखी एक धाडसी प्रयोग म्हणून कॉस्मॉपॉलिटन कल्चरल सेंटर या संस्थेने सादर केलेल्या ‘ज्युलिएटचे डोळे’ या नाटय प्रयोगाचा उल्लेख करावा लागेल. या नाटकाचा विषयही परिचित विषयांपेक्षा वेगळा. अनिल बर्वे यांनी या नाटकामध्ये नवीन जगाचा मागोवा घेण्याचा प्रयत्न केला आहे. देहापासून आत्म्याला मुक्त केल्यावर नवीन जगाचा जन्म होणार आहे ही कल्पना प्रमाण मानून त्यांनी नाटकाची उभारणी केली आहे. संस्थेने या नाटकाचा प्रयोग तसा पुष्कळ व्यवस्थित बसवला होता. प्रयोगाचे दिग्दर्शन श्री. गोपीनाथ टिपणिस यांनी केले. श्री. नेरकर यांच्या नेपथ्यामध्ये नाटककार आणि दिग्दर्शक यांना अभिप्रेत असलेले वातावरण निर्माण करण्याचे काहीसे सामर्थ्य असल्याचे दिसून आले.

शांताराम दीक्षित (मुक्तात्मा) यांची संवाद बोलण्याची पद्धत नाटय विषयाला मानवण्यासारखी नव्हती. मधुकर गिजरे (प्राध्यापक) आणि विष्णू भावे (डॉक्टर) संवाद बोलत होते, तथापि नाटय विषय त्यांनाही उमजला नसावा. दिगंबर जोशी

(शास्त्रीबुवा) आणि अजित दिघे (कवी) केवळ हस्यास्पद होते. नाटकाची पातळी या मंडळींनी एकदम विघडवून टाकली. मिना टाटा (रजनी) हे स्पर्धतील एकमात्र स्त्रीपात्र ठीक होते. तिच्या वेषभूषेतील बदल नाटच विषयाला मानवणारे नव्हते.

प्रयोगशील म्हणून ज्याचा उल्लेख करावा, असे स्पर्धेतील तिसरे नाटक म्हणजे आराधना नाटचसंघाचे 'ऐक जनमेजया.' पद्माकर गोवाईकर यांनी आद्य रंगाचार्य यांच्या कानडी नाटकावरून हे नाटक घेतले आहे. सर्वसाधारण नाटकाला पडणाऱ्या मर्यादा या नाटकाला नाहीत. मानवी जीवन हाच नाटकाचा विषय असल्याने नाटकामध्ये व्यक्ती नाहीत. प्रतिनिधित्व आहे ते गटांना—म्हणून पात्रे ओळखली जातात ती म्हातारा, तरुण, तरुणी, सामान्य माणूस अशा पद्धतीने. नाटकाला सूत्रधार आणि पुढारी आहेत. त्यांच्या संवादातून आशय बाहेर येतो आणि बाकीची पात्रे नाटकाला वळण देतात.

रामचंद्र मोकाशी (सूत्रधार) विश्वनाथ ठिपसे (पुढारी) क्रांतीकुमार कऱ्हाडकर (म्हातारी) सुरेश कोकीळ (तरुण) निरुपमा क्षीरसागर (तरुणी); भालचंद्र पानसे (सामान्य माणूस) या कलाकारांच्या कामगिरीचे श्रेय दिग्दर्शक अनंत ओक यांना जाते. कलाकारांच्या हाताळणीबाबत श्री. ओक यांचे वैशिष्टच हे की, कलाकारांच्या अभिव्यक्तीच्या ताकदीमध्ये फरक असला तरी त्याला योग्य त्या मर्यादा घालून श्री. ओक एका विशिष्ट पातळीने नाटक नेतात. व्यक्तिसामर्थ्यापेक्षा, संघसामर्थ्यावर भर देण्यचा त्यांचा कल असतो. नाटचविषय खुलविण्यासाठी त्यांनी नेपथ्याच्या भरपूर उपयोग करून घेतला आहे. नाटकामध्ये कथानकापेक्षा विविध विचारप्रवाहांना असलेले महत्त्व ओळखून हा वैचारिक संघर्ष सूचित करणारे नेपथ्य त्यांनी केले होते. प्रयोग नीरस झाला तरी कलाकारांना नाटचविषय समजल्याचे जाणवत नव्हते. सर्व खेळ दिग्दर्शकांच्या हुकमतीखाली चालला होता.

## जुना मार्ग—नीटस प्रयोग

काहीही आगळे वेगळे करण्याच्या भरीस न पडता अगदी रुळलेल्या वाटेने जाणारी नाटके घेऊनही त्यांचे अत्यंत आकर्षक प्रयोग करण्याची कामगिरी भरत नाटच संशोधन मंदिर, आणि सरस्वती नाटचसंघ या संस्थांनी केली.

श्री. रणजित देसाई यांनी लिहिलेल्या 'धन अपुरे' या नाटकाचा प्रयोग सरस्वती नाटचसंघाने सादर केला. एका विशिष्ट ताकदीचा, नटसंच, नीटस दिग्दर्शन, समाधानकारक तांत्रिक बाजू, यांच्या बांधणीतून एक सुरेख प्रयोग पहावयास मिळाला.

कोकणातील समुद्रकिनारी असलेल्या एका खेडयामध्ये राहणाऱ्या एका प्रतिष्ठित कुटुंबामध्ये निर्माण झालेल्या वादळाचे चित्रण श्री. रणजित देसाई यांनी या नाटकामध्ये केले आहे. समाजामध्ये आज सररुकट आढळणाऱ्या पैशाच्या मोहाने मनुष्य किती हीन पातळीवर जाऊ शकतो याचे प्रतिबिंब रणजित देसाई या नाटकात पहावयास मिळते.

गड्याचे काम करणाऱ्या बाबू गयावळ यांच्यापासून ते भाऊंची भूमिका वठवणाऱ्या पुरुषोत्तम सहस्रबुद्धे यांच्यापर्यंत सर्व नटसंच समाधानकारक होता. काहीसा अपवाद असला तर तो शरद चितळे (डॉ. दिनानाथ) यांचा. महेशची भूमिका करणाऱ्या श्री. वसंत लोणकर यांनी प्रयोग व्यवस्थित बसवला होता. रंगमंचावरील प्रत्येक कलाकाराची हालचाल (Movement) जाणीवपूर्वक होत होती. नेपथ्य, प्रकाश, ध्वनी, या तांत्रिक बाजूचा उत्तम उपयोग करून घेण्यात आला. भाऊंच्या आयुष्यामध्ये त्यांच्या मृत पत्नीचा होणारा वावर कल्पकतेने दाखवण्यात आला.

रमेश गंगापुरे यांनी लिहिलेल्या "अमृत पडले भूमीवरती" या नाटकाचा प्रयोग भरत नाट्य संशोधन मंदिराने सादर केला. समज असलेले कलावंत, आणि समाधानकारक निर्मिती असूनही नाटक ठिसूळ असल्याने प्रयोग रंगू शकला नाही.

नाटकाचा काल संस्थानी अमलाखालील आहे. वासूकाका नावाच्या गृहस्थाच्या आयुष्यात घडणाऱ्या दुर्दैवी घटनांचे चित्रण आणि त्यातून निर्माण होणारा दारुण शोकांतिका हा या नाटकाचा विषय. नाटकाचा पहिला अंक विलक्षण कंटाळवाणा, व मुख्य विषयापासून अकारण दूर रेंगाळणारा झाला आहे. नाटकामध्ये घातलेली भजने विशेषतः दुसरे अकारण लादलेलो आहेत. भारताच्या पहिल्या स्वातंत्र्यदिनी मिरवणुकोमध्ये भाग घेतल्याने संस्थानाधिपतींची वासूकाकांच्या नियोजित जावयावर खप्पा मर्जी होऊन त्याला बेदम मारपीट करून हाकलून देण्यात येते वासूकाकांची मुलगी हा धक्का सहन न होऊन मरून जाते. वासूकाका वेडे होतात. नापत्ता झालेला–जावई संन्यासी होऊन पुन्हा येतो. वासूकाकांची दुरशा बघून अस्वस्थ होतो. एका अपघाताने वासुकाका शहाणे होतात. संन्यासी म्हणजच आपला नियोजित जावई हे त्यांना आपल्या परममित्राकडून – अप्पांकडून समजते. तथापि त्याची प्रत्यक्ष भेट होण्यापूर्वी सन्यासी मरण पावतो. शहाणे वासूकाका पुन्हा वेडे होतात (कसं अगदी हिन्दी फिल्मला सुयोग्य कथानक आहे नाही.) अशी ही कथा संशोधन मंदिराच्या कलाकारांनी अतिशय प्रामाणिकपण, भरपूर मेहनत घेऊन सादर केली. नाटकाचे नेपथ्य ही या नाटकाची मोठो जमेची बाजू. उभारलेल्या नेपथ्याचा भरपूर लाभही उठवला गेला. कलाकारांपैकी वासूकाका (राम शिंदगीकर) वाजवीपेक्षा जास्त आक्रस्ताळी व काहीसे कृत्रिम वाटले. नंदकुमार कारखानोस यांचा अप्पाही फारसे समाधान देऊ शकला नाही.

सौ. आशा गाडगीळ (हौशी कलावंत?) व सौ. विदुला इनामदार यांची सहजता, वावरण्यातील आत्मविश्वास आणि भूमिकेशी एकजीव होण्याचे कौशल्य खरोखरच वाखाणण्यासारखे होते. प्रयोगास उत्कृष्ट नेपथ्य दिल्याबद्दल भालेकर–केळकर – गाडगीळ या त्रिकुटाचे अभिनंदन केले पाहिजे.

'श्रीमंत' या विजय तेंडुलकर यांनी लिहिलेल्या नाटकाचा प्रयोग चांगला होईल अशी अपेक्षा असली तरी तो इतका चांगला होईल असे वाटले नव्हते.

तथापि औद्योगिक ललित कला मंडळाने श्री. अनंत ओक यांच्या दिग्दर्शनाखाली सादर केलेला प्रयोग प्रेक्षकांना एकदम पसत पडला.

औद्योगिक ललीत कला मंडळ पुण्यातील कारखान्यांसाठी एकांकिका स्पर्धा भरवते. या स्पर्धेमध्ये यशस्वी ठरलेले कलावंत निवडून आणि त्यांच्यावर भरपूर मेहनत घेऊन औद्योगिक ललित कला मंडळाने हे नाटक रंगभूमीवर आणले.

अत्यंत संपन्न कुटुंबामध्ये जन्माला येऊनही कुमारी-मातृत्व पदरी येऊ घातल्याने मथुरेच्या आयुष्याला मिळालेले वेगळे वळण, त्यामुळे श्रीधरसारख्या माणसाचा दादासाहेबांच्या घरात होणारा प्रवेश, यातून तेंडुलकरांनी नाटकाची पातळी एकदम बदलली आहे. सभ्यतेच्या बुरख्याआड व्यभिचार करणारा भाऊ, श्रीधरचे मथुरेशी नाते नसते तर त्याच्या खुनापर्यंत मजल मारणारे दादासाहेब, – आणि या पार्श्वभूमीवर अकृत्रिम स्नेहाने केशवला जवळ करणारा श्रीधर, – व्यवहाराची मर्यादा न मानणारा, पण माणुसकी असलेला श्रीधर, – अशी नाटकातील व्यक्तिरेखांची विविध रूपे दाखवून एक वेगळे नाट्य तेंडुलकरांनी निर्माण केले आहे. मूळ कथेला धक्का न लागता सहजतेने या गोष्टी पुढे येत असल्या तरी त्या समजावून घेऊन साकार करणे अवघड; तथापि अनंत ओक यांनी या बाबतीत पुष्कळ यश मिळवले आहे.

कलाकारांपैकी सर्वात प्रभावी ठरतात – विनायक गोडबोले (श्रीधर) आणि मथुरा (रोहिणी ओक) आपल्या अभिनयकौशल्याने रोहिणी ओक यांनी अनेक लहान मोठ्या जागा अचूक घेतल्या आहेत. – आपल्या छोट्या बालकाला हाताळण्यातील त्यांचे कौशल्य आणि मुद्राभिनयाने भावना व्यक्त करण्याचे त्यांचे सामर्थ्य वाखाणण्यासारखे होते. मंगेश तेंडुलकर यांचा दादासाहेब कृत्रिम असूनही आवडला तो संवाद बोलण्याच्या त्यांच्या खास व्यक्तिगत पद्धतीमुळे. राजू मेहेंदळे यांनी केशवची भूमिका समजून केली – तथापि त्यांनी भडकपणा थोडा टाळला असता तर बरे झाले असते.

प्रयोगात डावी ठरलेली मंडळी म्हणजे बाळ रहाणे (डॉक्टर) आणि मंगला गुमास्ते (रत्ना). त्यातही विशेष निराशा केली डॉक्टरांनी त्यांची संवादफेक दोषास्पद होती. आणि त्यातही बरोबरचे कलावंत पुष्कळच उजवे असल्याने हा दोष प्रकर्षाने जाणवला. रत्नाची स्वभाववैशिष्ट्ये दाखवण्यात आणि तिचे अस्तित्व प्रस्थापित करण्यात मंगला गुमास्ते फार कमी पडल्या. विहंग नायक – यांचा भाऊ – सहज सुंदर अभिनयाने समाधानकारक वाटला, तरी त्यांच्या अकारण – आणि काही वेळा विदुषकी वाटणाऱ्या हातांच्या हालचालींमुळे रसभंग झाला.

नेपथ्य सुंदर होते. श्रीमंतीचे वैभव त्यातून सूचित होत होते. तथापि प्रवेशद्वारापाशी पडणाऱ्या शॅडोज त्रास देत होत्या. आतल्या बाजूने अपुरा पडदा वापरण्यातील प्रयोजन समजू शकले नाही.

दिग्दर्शक अनंत ओक यांचे लेव्हल सजेस्ट करण्यातील आणि कांपोझीशन्समधील कौशल्य वाखाणण्यासारखे होते. विशेषत: तिसऱ्या अंकातील कांपोझीशन्स अतिशय सूचक होती. एक नीटस प्रयोग पाहिल्याचे समाधान या प्रयोगाने दिले.

औद्योगिक क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या मंडळींकडून आलेला आणखी एक नाट्य–प्रयोग म्हणजे रंगश्री नाट्य-संघाने सादर केलेल्या 'ही दैवाची उलटी रेघ' या नाटकाचा. रमेश सुळे यांनी या नाटकात एका खुनाचे रहस्य गुंफले आहे. दिग्दर्शक श्रीपाद गोखले यांनी बरीच मेहनत घेऊन प्रयोग बसवला आहे. नेपथ्य आणि तांत्रिक बाजू ठाकठीक आहेत. कलाकारांपैकी विजय कुलकर्णी (इन्स्पेक्टर राजे) यांना 'स्कोप' आहे आणि त्याचा त्यांनी भरपूर फायदाही उठवला आहे. श्री. श्रीपाद गोखले यांचा गृहस्थ संयमित अभिनयाचे चांगले उदाहरण आहे. विनायक ओक, सुरेश आठवले, सुनंदा बोपर्डीकर हे अन्य कलावंत योग्य मार्गदर्शन मिळाल्यास तयार होऊ शकतील.

कला–भारती या संस्थेने सादर केलेले 'अवघी दुमदुमली पंढरी' हे नाटक फारसे समाधान देऊ शकले नाही. नाटकाचा प्रयोग यथातथातच झाला. रवीन्द्र भट यांच्या दिग्दर्शनामध्ये, अथवा त्यांच्या व्यक्तिगत अभिनयामध्ये खास वाखाण-ण्यासारखे असे काहीही आढळले नाही. संगीताची बाजू ठाकठीक होती. त्याचे श्रेय बाळासाहेब माटे, आणि बकुळ पंडीत यांना द्यावे लागेल.

स्पर्धेतील एक बऱ्यापैकी विनोदी नाट्यप्रयोग म्हणून संपदा थिएटर्सच्या 'नवरा हवा तात्पुरता' या नाटकाचा उल्लेख करावा लागेल. नारायण भावे (दिग्दर्शक– व बगारामची भूमिका) यांच्या व्यक्तिगत कौशल्याने प्रयोग काहीसा रंगला. मंगला पोतनीस, (नयना) यांनी त्यांना चांगली साथ दिली.

संपदा थिएटर्स, या संस्थेने आतापर्यंत स्पर्धेत केलेल्या नाटकांपैकी सर्वात यशस्वी नाट्यप्रयोग म्हणून या प्रयोगाचा उल्लेख करता येईल.

## कशासाठी हा अट्टाहास

हौशी नटसंघ या संघाने सादर केलेला 'संगीत सोबत' या नाटकाचा प्रयोग सर्वच दृष्टीने सामान्य होता. संगीताची बाजू याही नाटकाच्या बाबतीत बाळासाहेब माटे यांनी संभाळली. मुकुंद उपासनी (मुकुंदा) यांचे गायनकौशल्य वाखाणण्या-सारखे होते. तथापि स्पर्धेमध्ये आपण नाट्यप्रयोग करीत आहोत याची जाणीव संयोजकांना नसावी असे वाटते.

यंदाच्या स्पर्धेमध्ये अक्षरश: धमाल उडवली मराठी ग्रंथालयाच्या नाट्यशाखेने. ही मंडळी कशासाठी नाटक करतात हे समजू शकत नाही. स्पर्धेमध्ये नाट्यसंघा-कडून किमान अपेक्षा पाठांतराची. पण याही बाबतीत ग्रंथालयाच्या नाट्यशाखेने प्रेक्षकांना चकवले. 'खरे मोती खोटे मोती' या एका सामान्य नाटकाचा अति-

[ पृष्ठ ६२ वर ]

आफ्रिकन
राजकारणातले
एक
अत्यंत
महत्त्वाचे
प्यादे...

# सुदान

श्याम तारे

"जे प्रश्न सुदानमधील लष्करी क्रांतीने आपल्यासमोर मांडले आहेत तेच बहुधा सर्व लष्करी क्रांतीचे इतिहास आपल्यासमोर मांडणार आहेत...."

"कोणत्याही लोकशाही राष्ट्राची प्रगती काही विशिष्ट कारणांनी खुंटली तर त्याकरिता लष्करी क्रांती हाच एकमेव जालिम उपाय आहे अशी भावना जोपासली गेली तर?..."

खार्टूम : २५ मे १९६९ : सकाळी एक वाजता...

खार्टूमपासून थोड्याच अंतरावर असलेल्या 'खौर-औमान्' या ठिकाणी तळ देऊन असलेल्या लष्कराने रोजची कवाईत या सदराखाली खार्टूम शहरात चिल-

खती रणगाड्यांसह प्रवेश केला. अध्यक्षीय निवासस्थानापाशी पोचताच मुख्याधिकाऱ्याच्या आदेशाबरोबर ताबडतोब सुदानची सत्ता ताब्यात घ्यायला या मूठभर कनिष्ठ लष्करी अधिकाऱ्यांनी प्रारंभ केला...अवघ्या तीन तासातच ही रक्तहीन लष्करी कार्यवाही पूर्ण करून लष्कराने सुदानचा ताबा घेतला...

संयुक्त अरब प्रजासत्ताकाचे अध्यक्ष कर्नल अब्दुल गमार नासेर यांच्या 'Free Officers' Movement' या संघटनेच्या पावलावर पाऊल टाकून राज्यक्रांतीचा हा घाट घडवून आणला गेला. कारणपरंपरा वेगळी असली तरी प्रमुख लष्करी अधिकाऱ्याची वार्षिक रजा आणि पाच प्रमुख वरिष्ठ लष्करी अधिकाऱ्यांची चालू असलेली मॉस्को-भेट यांचा मुहूर्त साधून कनिष्ठ लष्करी अधिकाऱ्यांनी ही कार्यवाही उरकून घेतली.

या संदर्भात ताबडतोब मुख्य लष्करी अधिकारी आणि पोलिसप्रमुख यांची धरपकड करण्यात आली.

Mdurman हे प्रमुख रेडिओकेन्द्रही या गटाने काबीज केले.

प्रमख राजकीय नेत्यांची धरपकड मात्र सकाळपर्यंत थोपवून धरण्यात आली. सर्वप्रथम अध्यक्ष श्री. इस्माईल अल् अझारी यांना कैद करण्यात आले, पंतप्रधान महंमद अहमद मगौब आणि त्यांच्या सर्व सहकारी मंत्र्यांनाही अटकेत ठेवण्यात आले.

पहिल्या महायुद्धाच्या सुरुवातीला आफ्रिकेत फक्त चार स्वतंत्र राष्ट्रे अस्तित्वात होती. इथिओपिआ, संयुक्त दक्षिण आफ्रिका, इजिप्त आणि लायबेरिआ...

आज एकंदर छत्तीसपेक्षाही जास्त राष्ट्रे स्वतंत्र म्हणून जगाच्या नकाशावर दाखविली जात आहेत. यांपैकी बहुतांश राष्ट्रांना गेल्या दशकातच स्वातंत्र्य प्रदान करण्यात आलेले आहे. गेल्या दहा वर्षातला स्वातंत्र्यार्जनाचा हा बदल निश्चितच आफ्रिकेतील नव्या धारणेकडे लक्ष वेधून घेणारा आहे.

मुख्यत: अरब–मुस्लिम वस्ती असलेल्या या देशाने ब्रिटीश–इजिप्त संयुक्त वसाहतींकडून १९५६ साली स्वातंत्र्य प्राप्त केले.

देशाची घडण ही प्रामुख्याने मुस्लिम–अरब आणि काळ्या आफ्रिकन जनतेची असल्यामुळे सहाजिकच जातीय आणि सामाजिक विषमतेमुळे तणावाचे वातावरण हे नेहमीचेच...त्यातल्यात्यात अरबांचे या देशावरचे आज अनेक वर्षांचे गुलामांचे व्यापारी या नात्याने असलेले वर्चस्व...राजकीय आणि आर्थिक दृष्टीने इतरांना मागासलेले ठेवण्यात अरब समर्थ ठरलेले आहेतच आजही या काळ्या जनतेला आपल्याच पूर्ण आधिपत्याखाली ठेवण्याचा अरबांचा सतत प्रयत्न चाललेला आहे.

खुद्द इस्लाम आणि अनेक मागासलेल्या जमातींमध्ये असलेले धार्मिक मतभेद मधूनच तीव्र स्वरूप धारण करतात. याशिवाय इस्लाम आणि ख्रिस्ती यांच्यामध्ये परंपरागत मतभेद नि द्वेष आहेत ते वेगळेच...तरी काळ्या जनतेपैकीही बहुतांश

लोकांना मुस्लिम धर्माची दीक्षा देण्यात राज्यकर्ते सफल झालेले आहेत.

अरब आणि काळी आफ्रिकन जनता यांच्यामधील हे तणावाचे वातावरण सर्वच राष्ट्रांमधून थोड्याफार प्रमाणात आढळत असले तरी सुदानमध्ये या तणावाचा जोर भयंकर आहे. अरब–मुस्लिम वर्गाचे या राष्ट्रावरील आधिपत्य हेही त्याचे एक कारण असू शकेल.

## प्रमुख प्रवृत्ती

१९५६ साली स्वतंत्र झालेल्या या राष्ट्रातल्या प्रमुख प्रवृत्तींची ओळख करून घेणे आवश्यक आहे.

१९५६ ते १९५८ या काळात सुदानमध्ये लोकशाही राजवट अस्तित्वात होती. १९५८ मध्ये मेजर जनरल अबौद यांच्या मार्गदर्शनाखाली पहिली लष्करी क्रांती घडवून आणण्यात आली. जनरल अबौद यांनी संपूर्ण सत्ताधिकारी म्हणून स्वतःची नेमणूक करून घेतली. २५ मे १९६३ रोजी इथिओपिआची राजधानी आदिस अबाबा येथे झालेल्या आफ्रिकन एकतेच्या पत्रकावर संमतिदर्शक स्वाक्षरी करणाऱ्यां-मध्ये प्रमुख म्हणून मेजर जनरल अबौद यांनी कामगिरी केली. आफ्रिकन राष्ट्रांमध्ये एक अत्यंत मोक्याचे ठिकाण म्हणून सुदानला अतिशय महत्त्व आहे हे लक्षात घेतले तर याच पत्रकावर सही करणाऱ्यांमध्ये कर्नल नासेर आणि घानाचे त्यावेळचे प्रमुख क्वामे एन्क्रूमा यांचीही नावे असणे याला वेगळा अर्थ प्राप्त होतो.

१९५३ मध्ये ह्या घटना घडत असतानाच सामान्य जनतेची सुदानमधील लष्करी राजवटीबद्दलची नापसंती तीव्र होऊ लागली होती. मात्र जनरल अबौद यांच्या राजवटीत मुलकी स्वातंत्र्यावर पूर्णपणे बंदी असली तरी याच राजवटीने सुदानच्या मोडकळीला आलेल्या अर्थव्यवस्थेला थोडीशी स्थिरता प्राप्त करून देण्याचा प्रयत्न केला होता हे विसरता येणार नाही.

कंटाळलेल्या जनतेचा कौल घेण्यासाठी राजकीय क्षेत्रातली मंडळी पुढे झाली. यामध्ये Democratic Unionist पक्षाचे प्रमुख मगौब आणि Umma पक्षाचे प्रमुख सादिक अल् महदी यांनी एकत्र येऊन लष्करी राजवटीला उलथून पाडण्यात यश मिळविले...यश मिळविले म्हणतानाच लष्करी राजवट उलथून पाडण्याचा अशा प्रकारचा मुलकी अधिकाऱ्यांचा हा पहिलाच यशस्वी प्रयत्न होता हे सांगणे अवश्य आहे.

लष्करी राजवटीला उलथून पाडण्यात यशस्वी झालेल्या या दोन पक्षांनी एकत्र येऊन सादिक अल् महदी यांना प्रमुख म्हणून मान्य केले. लोकशाही राजवटीने पुन्हा एकदा मूळ धरले.

सादिक अल् महदी यांचे सरकार अधिकारारूढ असतानाच Democratic Unionist पक्ष आणि Umma पक्ष यांच्यामधील तेढ तीव्र व्हायला लागली होती. उम्मा पक्षातील डावे नेते प्रामुख्याने मुस्लिमांच्या आधिपत्याकडे अधिक

लक्ष देण्यावर भर देत असत. याउलट सादिक अल् महदी यांचा कल हा मात्र दक्षिण सुदानमधील आफ्रिकन जनता आणि उत्तर सुदानमधील अरब–मुस्लिम यांच्यातील मतभेद सामोपचाराने मिटविण्याकडे अधिक होता. सादिक यांच्या पक्षाला तडे गेले. सादिक यांच्यानंतर पंतप्रधानपदावर आलेल्या श्री. महंमद अहमद मगौब यांच्यावर ही जबाबदारी येऊन पडली.

परंतु दोन वर्षापूर्वी झालेल्या निवडणुकांमध्ये मगौब यांच्या पक्षाला बहुमत मिळविणे शक्य झाले नाही. उम्मा पक्षाच्या एका बंडखोर गटाला मंत्रिमंडळात स्थान देऊन बहुमत टिकविणे अवश्य होते. त्याप्रमाणे ही युती साधारण दोन वर्षे टिकली, पण दोनच महिन्यांपूर्वी उम्मा पक्षाच्या या बंडखोर गटाने पुन्हा एकदा सादिक अल् महदी यांच्या पक्षाशी संगनमत केल्याचे जाहीर केले. उम्मा पक्षाचे हे दोन विभाग हे 'काका-पुतण्या' नातेसंबंध असलेल्या इमाम-अल् महदी आणि सादिक-अल् महदी यांच्या आधारावर उभे आहेत इतके सांगितले म्हणजे सुदान-मधील राजकीय परिस्थिती इतकी अस्थिर राहण्याचे कारण आपोआपच लक्षात येते इतके ते बोलके आहे. 'उम्मा' पक्ष हा साहजिकच सरकार आणि विरोधी पक्ष या दोन्हीही ठिकाणी सारखाच बलिष्ठ झाला होता. मगौब आणि इतर वरिष्ठ नेते हा राजकीय पेच सामोपचाराने कसा सोडवता येईल या विचारात असतानाच कर्नल निमेरी यांच्या मार्गदर्शनाखाली या तरुण लष्करी अधिकाऱ्यांनी सत्ता काबीज करून हा पेच विचित्र परिस्थितीत सध्यापुरता तरी सोडवला आहे असे म्हणावे लागेल.

याचा अर्थ असा की उम्मा पक्षाच्या या दोन विभागांच्या संगनमताच्या संदर्भातच आपल्याला कर्नल निमेरी यांच्या मार्गदर्शनाखाली घडवून आणलेल्या या लष्करी क्रांतीचा विचार करणे आवश्यक ठरणार आहे.

जनरल अबौद यांना पदच्युत करून अधिकारारूढ झालेल्या संयुक्त सरकारनेही कृतीत अबौद यांचीच 'री' ओढण्याचा प्रयत्न केला आहे हे आता स्पष्ट झाले आहे. संदर्भ : वशिला आणि ढवळाढवळ. लाचखोरी अत्यंत बोकाळलेली दिसत होती. शिवाय दक्षिण सुदानमधील आफ्रिकन जनतेचा प्रश्न हे सरकार व्यवस्थित रीतीने हाताळू शकले नव्हते हेही एक कारण होतेच. या दक्षिण सुदानमधील जनता प्रामुख्याने ख्रिश्चन आहे हे सांगितले तर 'भावनात्मक ऐक्याच्या' दृष्टीने हा प्रश्न किती निकडीचा होता ते बघणे शक्य होईल.

हे अंतर्गत दडपण तर होतेच शिवाय १९६७ सालच्या अरब–इस्त्राएल लढाई-मुळे निर्माण झालेल्या अरब-मुस्लिम निकडीमुळे सुदानला सोव्हिएट रशियाकडून शस्त्रास्त्रे मागणे आवश्यक ठरले. सुदानच्या इतिहासात सोव्हिएट रशियाकडून शस्त्रास्त्रे मागविण्याची ही पहिलीच खेप. सुदानच्या वरिष्ठ लष्करी अधिकाऱ्यांचे एक शिष्टमंडळ क्रांतीच्या सुमाराला रशियाचा दौरा करीत होते ते या कारणा-

साठीच. या संदर्भात कदाचित पाश्चिमात्य देशांची फस या क्रांतीला कारणीभत झाली असावी असा एक तर्क करायला निश्चितपणे अवसर आहे.

१९६६ मध्ये एकदा लष्करी क्रांतीचा एक अयशस्वी प्रयत्न करण्यात आला होता. त्यावेळीच लोकशाही सरकारमधील भ्रष्टाचाराच्या अनेक अफवा सुदानच्या लष्करी क्षेत्रांमध्ये पसरल्या होत्या. त्यानंतर मात्र अशा प्रकारचा कुठलाही प्रयत्न करण्यात आला नाही.

## एक वेगळा संदर्भ

उम्मा पक्षाच्या दोन विभागांच्या संगनमताच्या संदर्भातच कर्नल निमेरी यांच्या लष्करी क्रांतीचा विचार करावा लागेल, असे मी यापूर्वी मांडलेले आहे. पण याशिवाय आणखीही एक संदर्भ लक्षात घेणे आवश्यक आहे.

एका दृष्टीने सुदान हा इराकसारखाच एक देश आहे. इराकमधील विशिष्ट धार्मिक अल्पसंख्यांकांचा प्रश्न सोडवण्यात बगदाद सरकार आजवर अनेकदा असमर्थ ठरल्यामुळे त्या ठिकाणी सुंदोपसुंदी नेहेमीच सुरू असते. पण, प्रत्यक्ष बघायला गेले तर इराकमधील सुंदोपसुंदी ही एकाच धर्माच्या जनतेतली आहे. त्या ठिकाणी राष्ट्रीयत्वाचा प्रश्न असला तरी धार्मिक विभाजनावर आधारलेला तो खासच नाही. म्हणजेच त्याची तीव्रता सुदानच्या संदर्भात कमी ठरावी.

दक्षिण सुदानमधील प्रश्न थोडासा गुंतागुंतीचा आहे. कारण 'इस्लाम' हे एक विभाजनाचे शस्त्र आहे ही या प्रदेशातल्या जनतेची एक ठाम समजूत झालेली दिसते. धर्म हा या ठिकाणी एक विभाजक ठरलेला आहे.

दक्षिण सुदानमधील या प्रश्नाबाबत नवीन लष्करी सरकार कोणती पावले उचलणार आहे यावरून या प्रश्नाची सोडवणूक कोणत्या प्रकाराने केली जाणार आहे ते दिसून येईल.

स्वतःची अशी अरब-साम्यवादी नीती वापरून दक्षिण सुदानमधील बहुसंख्य जनतेला आपलेसे करून घेण्यात जर नवीन सरकारला यश मिळाले तर दक्षिण सुदान हे एक प्रश्नचिन्ह न ठरता सुदानच्या आर्थिक स्थैर्याच्या दृष्टीने उचलले जाणारे ते एक अत्यत योग्य पाऊल होईल यात शंका नाही. जातीय किंवा पंथवादाची ही दृष्टी दक्षिण सुदानमधून नाहीशी करणे हे या नवीन सरकारचे या दृष्टीने पहिले कर्तव्य ठरते.

अर्थातच असे करण्यात सरकारने 'अरब' या शब्दांचा वापर अत्यंत प्रमाणात करावा हे ओघानेच येईल. सुदान (सुदानचे, सुदानसाठी वगैरे) हा शब्दप्रयोग जास्तीत जास्त प्रमाणात वापरून नव्या राज्यकर्त्यांना दक्षिण सुदानमधील हा प्रश्न सोडविणे आवश्यक आहे. शेवटी कुठल्याही एका विचारसरणीचे अधिष्ठान सुदानला देणे आणि इतर सर्व विचारसरणींना चांगल्या अगर वाईट—तेवढ्याच धिटाईने दरवाजे बंद करून घेणे ही गोष्ट सोपी नाही. हे

खरे असले तरी राष्ट्रीय एकात्मतेच्या दृष्टीने सुदानला ही गोष्ट केव्हा ना केव्हा-तरी करावी लागणारच हे निश्चित. '...सुदान' हा शब्दप्रयोग वापरीत असताना १९६३ मधील आफ्रिकन एकतेच्या जाहीरनाम्याला तडे गेले असल्याचाही कांगावा होईल हे गृहीत धरूनच त्याला योग्य रीतीने तोंड देण्याचे कार्य सुदान सरकारने करणे आज अत्यंत आवश्यक होऊन बसले आहे.

याच ठिकाणी नवीन लष्करी राजवटीने सत्ता काबीज केल्यानंतर खार्टूममध्ये झालेल्या निदर्शनांच्या बाबतीत लिहायला हवे.

सत्ता काबीज केल्यानतर खार्टूम या राजधानीच्या शहरात एकंदर तीन निदर्शने करण्यात आली असे प्रधानमंत्री अवादल्लाह यांनीच म्हटले आहे. यापैकी एक उत्स्फूर्त निदर्शन अध्यक्षीय निवासस्थानाच्या समोरच घडवून आणले गेले. सैन्याने हवेत बार उडवून निदर्शकांना पिटाळून लावले होते.

दुसरे निदर्शन 'मुस्लिम बंधुभाव' गटाच्या मंडळींचे असून तिसरे निदर्शन 'अन्सार' या न वाने ओळखल्या जाणाऱ्या गटाचे होते.

या तीन निदर्शनांपैकी पहिले सोडून दिले तर इतर दोन्ही निदर्शने ही शक्तिशाली अशा म्होरक्यांच्या आधारावर झालेली निदर्शने होती. म्हणजेच नवीन सरकारला 'मुस्लिम बंधुभाव गट' आणि 'अन्सार' यांच्याकडून विरोध होईल हे स्पष्टच आहे. झालेच तर वर सांगितल्याप्रमाणे इतर अंतस्थ दडपणामुळे नवीन सरकार-मध्ये एखादे अस्थिरतेचे मूळ वाढीला लागणेही सर्वस्वी अशक्य नाही. या सर्व अस्थिरता निर्माण करणाऱ्या बाबींची योग्य ती दखल न घेणे हे या राजवटीच्या दृष्टीने अत्यंत घातक ठरणार आहे.

'महदी' या अत्यंत शक्तिशाली अशा घराण्यामुळे होणारा विरोधही लक्षात घेतला पाहिजे. कारण महदो घराणे, मुस्लिम बंधुभाव गट आणि वरिष्ठ लष्करी अधिकारी यांचे अत्यंत सलोख्याचे संबंध सुदानमध्ये आहेत. शिवाय पश्चिम सुदानमधील शतकरीवर्गात असलेले 'महदो' यांचे वर्चस्व अगदीच निष्प्रभ होईल अशी अपेक्षा करणेही चुकीचे ठरणार आहे.

## नवीन सरकारची रचना

सुदानच्या नवीन लष्करी सरकारला स्वतःपुढे असणाऱ्या प्रश्नांची विशिष्ट प्रमाणात तरी पूर्ण जाणीव असावी असे नेत्यांच्या वक्तव्यावरून आज तरी म्हणायला हरकत नाही. जातीयवादी आणि प्रांतवादी प्रवृत्तीच्या लोकांची नाडी ओळखून त्यांनो आता भरीव कार्य करायला सुरवात करावी ही अपेक्षा आहे. पण ही अपेक्षा ज्यांच्यावर आधारलेली आहे ते पुढारी, प्रमुख आहेत तरी कोण ?

- सध्या प्रधानमंत्री आणि परराष्ट्रमंत्री असलेले श्री. वारबेकर अवादल्लाह हे एकावन्न वर्षांचे गृहस्थ त्यांच्या लोकशाही प्रवृत्ती आणि न्यायप्रियतेबद्दल प्रसिद्ध आहेत. सुदानच्या संसदेचे सभापती म्हणून काम करीत असताना संसदीय काम-

काजाचा त्यांनी अत्यंत जवळून अभ्यास केलेला आहे. सुदानचे मुख्य न्यायमूर्ती या पदावरून त्यांनी पक्षबंदी घालण्याच्या संसदेच्या अधिकारांबाबत एक ऐतिहासिक आदेश दिला होता. त्यावेळचे प्रधानमंत्री सादिक अल् महदी यांनी या आदेशाची अंमलबजावणी करण्याचे नाकारल्यानंतर अवादल्लाह यांनी राजीनामा सादर केला. ऑक्टोबर १९६४ मध्ये खार्टूमच्या रस्त्यावर जनरल अबौद यांच्या लष्करी राजवटीविरुद्धच्या प्रचंड निदर्शनांचे नेतृत्व त्यांनीच केले होते. डाव्या विरोधी पक्षाचे अध्यक्षीय उमेदवार म्हणून त्यांचे नाव पुढे आलेले असतानाच कर्नल निमेरी यांच्या आमंत्रणानुसार आज ते प्रधानमंत्री आणि परराष्ट्रमंत्री म्हणून काम पहात आहेत.

कर्नल निमेरी (आता मेजर जनरल निमेरी)...लाचखोरी आणि वशिलेबाजी यांच्याविरुद्ध प्रत्यक्ष कार्यवाही करण्याची जनरल निमेरी यांची ही दुसरी वेळ. १९६६ मध्ये एका अयशस्वी क्रांतीत भाग घेण्याच्या आरोपावरून जनरल निमेरी यांना सादिक सरकारने अटकेत ठेवले होते. योग्य पुराव्याअभावी पुढे त्यांना सोडून देण्यात आले. ऑक्टोबर १९६४ च्या अतिभव्य प्रमाणावरील निदर्शनांच्या वेळी कर्नल निमेरी हे एका बटालियनचे प्रमुख होते. या निदर्शकांवर गोळीबार करण्याचा हुकूम देण्यात येऊनही तो त्या विशिष्ट परिस्थितीत ठोकरून देण्याचे धैर्य या अधिकाऱ्यामध्ये निश्चितच होते. 'लष्कर हे जनतेला ठेचून काढण्याऐवजी तिचे संरक्षण करण्यासाठी आहे' असे ठासून सांगणारा हा एक बहाद्दर अधिकारी. कर्नल निमेरी यांच्यावर या उद्गारांबद्दल काही कार्यवाही होण्याअगोदरच जनरल अबौद यांची लष्करी राजवट संपुष्टात आणली गेली होती. कर्नल निमेरी यांचा हा कनिष्ठ लष्करी अधिकाऱ्यांचा गट साधारण दहा वर्षापूर्वी बनविण्यात आला होता. त्यावेळची या गटाची उद्दिष्टे जरी आज समोर नसली तरी आजची लष्करी क्रांती ही मात्र सरकारी क्षेत्रातील गोंधळ, वसाहतवादी वृत्ती, लाचखोरी आणि बेकायदेशीर कृत्ये यांच्यामुळे घडून आलेली आहे, असे या गटाचे निवेदन आहे.

नवीन सरकारमधील इतर नेत्यांची नावे बघितली तर असे दिसते की, जनरल निमेरी यांनी थोड्याफार प्रमाणात 'कामराज-योजना' लागू करण्याचा प्रयत्न केला आहे. काही वरिष्ठ कम्युनिस्ट नेत्यांना, सामान्य जनतेचा नवीन सरकारला पाठिंबा मिळवून देण्यासाठी मुद्दाम सरकारी कक्षेच्या बाहेर ठेवण्यात आलेले आहे. सुदानमधील कम्युनिस्ट पक्ष हा संपूर्ण आफ्रिका आणि अरब जगतात सर्वात मोठा आणि सर्वोत्तम कार्य असलेला असा पक्ष आहे. 'GEZIRE' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या विभागातील शेतकरी वर्ग आणि कामगार यांच्यामध्ये या पक्षाचे अतिशय वजन आहे. सामान्य आधारासाठी या दोन विभागांमध्ये लोकप्रियता मिळविणे ही सुदानमधील सरकारकरिता स्थैर्याची किमान मागणी आहे.

'महदी' घराण्यापासून सरकारला होणाऱ्या संभाव्य विरोधाची कल्पना

करताना पश्चिम सुदानमधील शेतकरी वर्गामधील त्यांचे वर्चस्व दृष्टीआड करून चालणार नाही. कारण 'महदी'नी मनात आणले तर आज हजारो कडवे लढवय्ये घेऊन खार्टूमवर चाल करून येणे त्यांना अशक्य नाही, ही गोष्ट खरी आहेच. या दृष्टीनेही नवीन सरकारने वेळीच पावले उचलली आहेत. सर्व धर्माधिकाऱ्यांना राजकारणापासून पूर्णपणे अलिप्त रहाण्याचे सक्त आदेश देण्यात आले आहेत.

नवीन सरकार हे डावे तसेच कम्युनिस्ट असल्याचा आरोप करण्यात आलेला असला तरी त्याचा ताबडतोब इन्कारही नव्या सरकारने केलेला आहे.

पण...

उजवे असो किंवा डावे, कम्युनिस्ट किंवा इतर कुणीही, प्रश्न हा नसून दक्षिण सुदान आणि उत्तर सुदान यांमधील मतभेद नि हेवेदावे मिटविण्यासाठी ही नवी लष्करी राजवट कुठला मार्ग अनुसरणार आहे हा खरा प्रश्न आहे. उत्तर सुदान — अरब की दक्षिण सुदान आफ्रिकन ? की एखादा नवीन मध्यममार्ग ?

लष्कराच्या साहाय्याने दक्षिण सुदानवर आधिपत्य गाजविणे हे आजवर सफल झालेले असले (काही प्रमाणातच) तरीही आज ते सफल होईलच अशी खात्री देता येत नाही. कदाचित जातीय दंगलींना पुन्हा ऊत येण्याचा संभव आहे. शिवाय नवीन राजवटीने नुकताच प्रसारित केलेला अलिप्ततेचा जाहीरनामा हा सुद्धा या अंतर्गत बाबींच्या संदर्भातच विचारात घेतला पाहिजे.

अलिप्ततेचे हे तारू आता अरब-एकतेच्या खडकावर आदळते की आफ्रिकन-एकतेच्या किनाऱ्याला लागते ते बघायचे ! ...

ते काहीही असो.

जे प्रश्न सुदानमधील लष्करी क्रांतीने आपल्यासमोर मांडले आहेत तेच प्रश्न बहुधा सर्व लष्करी क्रांतीचे इतिहास आपल्यासमोर मांडणार आहेत.

याच्या मुळाशी असणारा प्रश्न मात्र खरोखरीच कठीण आहे.

कोणत्याही लोकशाही राष्ट्राची प्रगती काही विशिष्ट कारणांनी खुंटली तर त्याकरिता लष्करी क्रांती हाच एकमेव जालिम उपाय आहे अशी भावना जोपासली गेली तर ?...

किंबहुना प्रत्येक स्वतंत्र राष्ट्रात लोकशाही...लोकशाही...असा उदोउदो होणार. त्यावेळी असणारे राजकीय नेते या संधीचा योग्य फायदा घ्यायला टपलेले असणारच. शिवाय जनता ही आश्वासनांच्या भरवशावर निवडून देते ही कल्पना फार सुखावणारी आहे. फक्त आश्वासने. एकदा निवडणूक जिंकल्यानंतर सत्ताधारी पक्षात येनकेन प्रकारेण प्रवेश. नि मग सारे रान मोकळेच. अशी जी एक प्रथा प्रत्येक स्वतंत्र राष्ट्रात पडू पहाते आहे तिला काबूत आणण्यासाठी, नामशेष करण्यासाठी हाच एकमेव मार्ग आहे का ...?

□ □ □

क्रमांक पाच

# गावी शेती

सौ. अंजली ठकार

मी तो अकलेचा कांदा । अगा सुरू केला धंदा ।।
फंदानं या झाला वांधा । साफ की बुडाला... ।।

—तर काय, धंदा सुरू केला बांगड्या विकण्याचा. काचेच्या, प्लॅस्टिकच्या, नायलॉनच्या. कोथिंबिरी, निळ्या, जांभळ्या, तांबड्या, शेवाळी. (या धंद्याच्या शेवाळावरून पाय घसरून बांगड्यांच्या स्वप्नाचा 'चक्काचूर' होईल असे ध्यानीमनीही नव्हते.) बांगड्यांना नवीनवी नावे दिली. 'मधुचंद्र,' 'प्रीतिसंगम'...पण का कोण जाणे, या बांगड्यांचा आणि बायकी हातांचा संगम फारसा झालाच नाही. एक तर आजकाल बायका बांगड्याच वापरीत नाहीत, कारण त्या कामात हरघडी अडचण करतात. शिवाय एक हात त्या हरकाम्या 'घडी'ने व्यापलेला. (त्याच हातात हँड्करचीफची नाकही न मावेल एवढी चिमूटभर घडी.) मग उरलेल्या दुसऱ्या हातात बहुधा तारेइतकी बारीक चौदा कॅरटची नाजुक कंकणे. वाटे दशभुजा, अष्टभुजा या देवींसारखे यांना आणखी चार-सहा हात असते तर माझ्या बांगड्यांना किती भाव आला असता! इत्यर्थ, बांगड्या खपवायला माझ्याच या जातवाल्या 'हातभार' लावत नाहीत. पुरुष अजून राजरोस बांगड्या भरत नसल्याने त्या

बापड्यांच्या मनगटबळाचा प्रश्नच नव्हता. माझ्या न खपलेल्या बांगड्या भरभरून घरादारातली, नात्यागोत्यातली, ओळखीपाळखीची मंडळी भयानक वैतागली.

शिवाय धंदा म्हणजे रक्तातच वेपारी वृत्ती हवी, ती तर नव्हतीच. वरे, 'कष्टाळूपणा,' 'योजकता,' 'धडाडी,' 'कल्पकता,' 'चोख व्यवहार' करून 'पद्मश्री'च काय कुठलीच श्री मिळेल याचा हवाला वाहाण्याने देऊ नये. बांगड्या खपेनात तेव्हा मनात आले, आता 'बांगडा' खपवून पहावा. पण म्हटले, बांगड्यांमुळे माणसांनी वैर धरले, आता पाण्यात न राहता माशांशी वैर नको. काय करावे सुचत नव्हते. महागाई ही अशी उतू चाललेली. इतकी की दूधसुद्धा त्यामुळे उतू जाणे विसरलेले. ते आपले आता खळाखळा उकळते. दुधाइतके पाणी आजकाल कुणातच नाही. डोळे पाणीदार असतात, पण ते या महागाईने. गाईला पुराणात देव मानले आहे. या महा'गाई'ला चालू जमान्यात तेच स्थान. उठताबसता तिला भजा. साधे पार्कमध्ये जाऊन भजी-भेळपुरी खाल्ली तरी येऊन जाऊन पाच-दहा रुपयांची चटणी. अजून फुलांच्या सुवासावर वेल्थ–टॅक्स नाही हेच आश्चर्य. तो सुवासही दुर्मिळच. कारण चक्क जाईच्या कुंजाखाली भलीमोठी कढई ठेवून भजी, अळूबोंडे तळण्याचा कार्यक्रम खमंगपणे सुरू असतो. असो. त्यामुळे या शहरी भंकस जिण्याला, त्या बांगड्यांच्या बुडीत धंद्याला इतकी वैतागले की, गावच्या इवल्याशा शेतीच्या तुकड्याची कडकडून याद आली. देवाला म्हटले,

**'तेची खेडे दे गा देवा !'**

नको नको हे शहर
यंत्र झालेली माणसे
तिथे बोलकी कणसे
वावरात !
नको मिटर फिटर
नळराज हे लहरी
सज्ज स्वागता विहिरी
तिथे सदा.
नको सिनेमा ते पार्क
नको भेळ पाणीपुरी
पंढरीची वारी बरी
दरसाल.
जलमाच्या या लायनीत
मुंगीसाखरेचा रवा
तुझा विसर न व्हावा
पांडुरंगा !

अशा तऱ्हेने गावची वाट चालू लागले. 'ग्रामपंचायती'ची पंचाईतच नको म्हणून ती वाटच सोडली. जाताजाता 'वाचकांच्या पत्रव्यवहारात' एक पत्र खरडले-- "बायांनो ! खेड्यात चला !" आणि ते चक्क छापून आले ! त्या पत्रामुळे की काय नकळे, रेडियोवरही 'गंमतजंमत'मध्ये 'कावकाव कावकाव ! कित्तीकित्ती छान माझे शेतीचे गाव !' हे बालगीतही मी गाऊन आले. त्यामुळे चढलेल्या भयानक हुरुपाने 'खेडे' या विषयावर एक खेडवळ लेखही लिहिला. माझे अक्षरच मुळात खराब असल्यामुळे म्हणा, की कशामुळे म्हणा, तो अक्षर वाङ्मयात जमा न होता 'साभार' परत आला. म्हटले, नकोच लेखणी, त्यापरीस नांगर बरा—म्हंजे तेच हो, ट्रॅक्टर.

अशी मजल दरमजल करीत गावी येऊन पोचले. पण नुसते शेतीच्या तुकड्याकडे पाहून 'तुकड्या'ची चिंता मिटणार नव्हती. उन्हातान्हात हेलपाटे घालून, खटपटीलटपटी करून दोन विहिरी खणल्या. नशिबाने पाणी लागले. (हे खास 'इकडचे' पाणी-अर्ज करणे, तगाई मिळवणे...) प्रथम आपला भाजीपाला, ज्वारीबाजरी, मका, हरबरा काढला. हळूहळू सल्फेट, दाणेदार खते, हायब्रिड हरबरा हे प्रयोग मी सफाईने वापरू लागले. मग अनुभवाने धीर आला. कुणी म्हणे, दुसरा तुकडा खरीदा, द्राक्षमळा लावून पहा. पण कानांवर हात ठेवले. बायकांपेक्षा नाजूक ती द्राक्षवेलीची जात. तिची मर्जी संपादणे म्हणजे सवतीची वा सासूची मर्जी संपादणे. पुन्हा त्या बांगड्यांच्या 'नाजूक' प्रकरणाची आठवण झाली. म्हटले, तेव्हा साऱ्याजणी बांगड्या घालघालून वैतागल्या, आता आणि हीऽऽ आंबटढोण द्राक्ष खाऊनखाऊन खोकले न् शिव्याशाप नकोत. (हो हो, कोल्ह्याला द्राक्षे आंबटच.)

आणि मग काय म्हाराजा ! इठ्ठुब्बा-रखमाईनं एकजुटीनं ठरविल्यापरमानं मनात योजयोजून ऊस लावला. आवंदा अस्सा पैसा लावलाय् कनवटीला म्हंता ! (पुन्हा बिग्गर टॅक्स !) शिवाय शिलकीतली एक मोहर ! मग काय मंडळी, बोला तर ! गुऱ्हाळाला केव्हा येता ! □

---


## पुरंदऱ्यांची दौलत

श्रीमंत बाजीराव पेशवे / तुळशीबागवाला / खासा फिरंगी
मारिला / जिद्द / खासगीवाला / खंडेराव दरेकर /
तलवारीचे पाते / पालखी / पुरंदऱ्यांची दौलत
नऊ पेशवेकालीन कथा
ब. मो. पुरंदरे
किंमत : साडेतीन रुपये
राजहंस प्रकाशन


---



# मी समाधानी आहे

तारा कोल्हटकर

ही प्रवेशपत्रिका पाहिल्याबरोबर प्रथमच 'कला' या क्षेत्राकडे जाणारा मार्ग माझ्या नजरेत भरला.

लहानपणापासून मला या क्षेत्राविषयी आत्यंतिक प्रेम, आपुलकी आहे. कारण आमच्या 'कोल्हटकर' घराण्यालाच जणू या कलेचे बाळकडू मिळाले आहे. त्याचबरोबर शाळेत असताना मिळालेल्या बक्षिसांमुळे मला 'या क्षेत्रात काही प्रयत्न करावे' अशी इच्छा झाली. त्यामुळेच मी हा मार्ग निवडला.

पण मला या कलेबरोबर शिक्षणाचीही खूप आवड आहे. त्यामुळे ते प्रथम पूर्ण करायचे मी ठरवले. पण त्यावेळीसुद्धा कोणाचे ओळखपत्र असल्याखेरीज प्रवेश मिळेना. त्यामुळेच थोडा नैवेद्य देऊन वशिला लावला आणि शाळेत प्रवेश मिळवला. शाळेमध्ये असताना माझ्या ज्ञानातील वाढीबरोबर त्याहून मुख्य म्हणजे कलेला उत्तेजन मिळाले. मग मी एस्. एस्. सी. झाले.

त्यानंतर साहजिकपणेच महाविद्यालयात प्रवेश घेतला. पण माझ्यातील सुप्त कलावंत एकसारखा डोके वर काढू पहात होता. त्यामुळे मी संगीत शिक्षण घेऊ लागले. त्याचा माझ्यावर चांगलाच परिणाम होऊन मी कलेकडे जास्तच आकृष्ट झाले. नंतर मुळातील माझी कलेची आवड व आता घेतलेले संगीत शिक्षण यांना पूरक असे अभिनयाचे शिक्षण मी घेतले. यात मात्र मी संगीतापेक्षा अधिक नैपुण्य मिळवले. (मुळात त्याचीच आवड अधिक.)

पण या वेळी माझे अभ्यासाकडे दुर्लक्ष झालेले नव्हते. बी. ए. च्या दुसऱ्या परीक्षेत मी माझी अभ्यासातील चमकही इतरांच्या नजरेस आणून दिली. याच वर्षी आमच्या महविद्यालयातील फी वाढली. त्याकाळाला अनुसरून लगेच निरुद्योगी विद्यार्थ्यांनी प्रचंड मोर्चे काढले. उपयोग झाला नाहीच! त्याचवेळी विद्यार्थीयुनियनमध्ये काम करायची संधी मिळाली होती. पण तिथे जायची माझी इच्छा नव्हती.


काही कारणाने मला पदवी मात्र मिळाली नाही. पण आता मी शिक्षण सोडून कलेकडे जायचे ठरवले होते. त्या दृष्टीने मी प्रयत्न करायला सुरुवात केली. इथे मात्र माझे सर्व ग्रह एकदम उदित झाले होते. त्यामुळे मराठी चित्रपटसृष्टीत अत्यंत गाजलेल्या एका निर्मात्यांनी आपल्याकडे एका चित्रपटातील दुय्यम भूमिकेसाठी मला बोलावले. भूमिका प्रमुख आहे की दुय्यम आहे हा विचार पहिल्याच चित्रपटाच्या वेळी योग्य नव्हता. पण मला अनुभव मात्र वेगळा आल्याने हा आनंद फार काळ टिकला नाही. सिनेमात दुय्यम भूमिका करणाऱ्या नट-नटींशी नायक-नायिका, निर्माते इ. बरोबर फडतूस माणसेही फटकून वागताना मला अनुभवावे लागले. त्यामुळे मी अगदी वैतागून हे सारे सोडायचे ठरवले; पण देवाच्या मनात तसे नव्हते. त्यामुळे नंतर लगेचच मला नायिकेची भूमिका मिळाली. माझा आनंद गगनात मावेना. मी सारे कौशल्य पणाला लावून, जीव ओतून ती भूमिका साकार केली. आणि माझ्या रसिक प्रेक्षकांनी त्याला दादही अगदी हृदयापासून दिली. त्या चित्रपटामुळे मला अफाट लोकप्रियता मिळाली. मी जणू लोकप्रियतेच्या शिखरावरच पोहोचले. त्याच वर्षी मी रसरंग अॅवॉर्ड पटकाविले. पण मिळतात म्हणून अवाक्याबाहेर कामे स्वीकारणे मला मान्य नव्हते. आणि जी स्वीकारली ती स्वतःला त्या भूमिकेत कल्पून साकारही केली, असा मला आत्मविश्वास आहे. माझ्या भूमिकांना प्रेक्षकांप्रमाणे सरकारकडूनही चांगलीच दाद मिळाली. मला दुसऱ्या वर्षीचे सरकारी बक्षीस मिळाले. त्यानंतर ३ वर्षांनी मला ३ ऱ्या हिंदी चित्रपटातील भूमिकेबद्दल फिल्मफेअर अॅवॉर्ड मिळाले.

इतक्या कौतुकामुळे माझा यशाचा हव्यास वाढतच गेला. त्यामुळे संधी मिळाल्याबरोबर मी नाटकातही काम स्वीकारले. तालमींना बहुतेक वेळी अनुपस्थितीच होती. कारण यशाची खात्रीच होती. पण या नाटकाने मात्र माझे नाक कापले. ते काम पडले; पण अपयशाने मी न खचता पुन्हा कसून प्रयत्न करून तेच काम अत्यंत गाजवले. एकूणच नाटच व चित्रपटक्षेत्राने मला उदंड पैसा दिला. त्यावेळी मी आणखी नवीन-नवीन उत्तम भूमिका प्रेक्षकांपुढे ठेवत होते. अशी अनेक वर्षे मी येथे भूमिका करत होते. रसिकही त्या उचलून धरत होते. त्याच वेळी भारत सरकारने मला अभिनयाबद्दल 'पद्मश्री' दिली. पण प्रेक्षकांनी एखाद्या उत्कृष्ट प्रसंगी दिलेल्या टाळ्यांहून मला ती कमीच वाटली. महाराष्ट्र सरकारनेही अकादमी पारितोषिक देऊन गौरविले. शेवटी हा व्यवसाय सोडायच्या वेळी मला खरोखर कृतकृत्य झाल्यासारखे आंतरिक समाधान मिळाल्यासारखे वाटले आणि अतिशय आनंद झाला.

शेवटी माझ्याजवळ ४ मोहरा उरल्या.

वि. सू.-मी या व्यवसायातून आता बाहेर पडले आहे अशी कल्पना केली आहे.

□ □ □



ह्याच भायला मंगल यावेळी आबांकडे आला होता...

मे १९६८ मध्ये सोमनाथ येथे झालेल्या श्रमसंस्कार छावणीत गोरेगाव येथून पंधरा-वीस मुलांचा एक गट गेला होता. गटापेक्षा त्याला समूहच म्हणणे अधिक श्रेयस्कर ठरेल. कारण, पूर्वी एकमेकांना फारशी ओळखत नसलेली वेगवेगळ्या वयांची व स्वभावांची ही मुले केवळ या निमित्ताने एकत्र झाली होती.

गोरेगावातील 'केशव गोरे स्मारक ट्रस्ट' या संस्थेची प्रेरणा व मार्गदर्शन या मुलांना लाभले होते. या प्रकारच्या कामाची आवड असूनही केवळ आर्थिक अडचणींमुळे जाऊ न शकणाऱ्या मुलांना ट्रस्टने मदतीचा हात दिला. बरोबर कुणी मोठे नसतानाही, ही मुले गोरेगावबाहेर पडून महाराष्ट्राच्या सुदूर वनान्तरी पाऊल टाकायला तयार झाली होती, ती ट्रस्टच्या पाठबळावरच.

सोमनाथला पंधरा दिवस सहजीवन अनुभवून परतल्यावर मात्र या मुलांनी आपला गट कायम ठेवण्याचे, तो वाढविण्याचे विचारपूर्वक ठरविले. या आपल्या गटाला त्यांनी नाव दिले 'उत्क्रांती दल.' पुस्तकी ज्ञान घेत असताना त्या लहानशा विश्वाबाहेर डोकावून आजूबाजूचे जग न्याहाळावे, तेथील परिस्थितींचा अंदाज घ्यावा, एकंदर समाजाला आणि, शिक्षण पुरे करून स्वतःच्या पायावर समर्थपणे उभे रहाण्यासाठी उतरल्यावर स्वतःला, ज्या प्रश्नांना तोंड द्यावे लागते,

------

वसुधा करमरकर

------



# सोमनाथ-दिंडोशी-मागाठणे....

त्यांची तोंडओळख करून घ्यावी, ते सोडविण्याचे आपल्या परीने उपाय शोधावेत, आणि हे सर्व करीत असताना आपले स्वतःचे व्यक्तिमत्त्व घडवावे, त्यात उत्क्रांती करावी, अशा कल्पनेने हा गट काम करीत आहे.

केशव गोरे स्मारक ट्रस्टचे मार्गदर्शन उत्क्रांती दलाला प्रथमपासूनच मिळत आहे. मे १९६९ मध्ये बुलढाणा येथे झालेल्या 'युवक नेता प्रशिक्षण शिबिरा'त उत्क्रांती दलाच्या सात मुलांनी भाग घेतला होता. शिबिर संपता संपता दिवाकर-भय्यांनी सांगितले होते—हा शेवट नसून आता खरा तुमच्या कार्याचा प्रारंभ होणार आहे. शिबिरातून आपापल्या स्थानी तुम्ही परतल्यावर जर काहीच follow up होत राहिला नाही, तर केवळ वीस दिवसांच्या या शिबिराला काहीच अर्थ नाही. आता जाऊन वर्षभरात तुम्ही काय करता यावर या शिबिराचे यशापयश अवलंबून आहे....

या शिबिरात घेतलेल्या अनुभवाचा व ज्ञानाचा मागोवा कसा घ्यावा, यासंबंधी आम्ही बुलढाण्यालाच विचार करत असतानाच एक सुवर्णसंधी आपण होऊन आमच्या समोर आली. आवांकडून आम्हाला एक पत्र आले होते व त्यांनी एक नाविन्यपूर्ण कार्यक्रम आमच्यापुढे मांडला होता. तो असा :

बोरिवलीनजिक मागाठणे या लहानशा गावात, कूळकायद्याखाली जमीन मिळालेला, भायला मंगल हा एक आदिवासी शेतकरी. त्याची अवघी जमीन साडेतीन एकर. पावसाळ्यात या जमिनीत भात पेरावे, येईल ते पीक घ्यावे, उरलेल्या आठ महिन्यात मिळेल तेव्हा काम करावे व एरव्ही बेकार रहावे, हे भायला व त्याच्या आजूबाजूच्या शेतकऱ्यांचे जीवन. या वर्षी भायला आबांकडे आला होता व शेतात लावण्यासाठी तायचूंगचे चार किलो बी मागत होता.

तायचुंग-स्थानिक १ व आय. आर. ८ या भाताच्या सुधारलेल्या जाती आहेत. पारंपरिक भातातील अनेक दोष काढून टाकण्याचा यात प्रयत्न केलेला आहे. ही भाते पडत नाहीत. तसेच दिलेल्या खतांचा उपयोग पाने वाढविण्यात न होता धान्य बनविण्यासाठी करण्याची शक्ती यात आहे. नेहमीच्या भातापेक्षा यांचे उत्पन्न कितीतरी अधिक येते. परदेशी गव्हाकडे डोळे लावून बसलेल्या आपल्या-सारख्या देशात अशा प्रकारच्या जातीचा प्रसार व्हायला हवा.

पण स्थितिप्रियता हे भारतीय शेतकऱ्याचे खास वैशिष्टच. त्यातून प्रचारयंत्रणा राबविणार ती सरकारी नोकरशाही. त्यामुळे या व आपल्या नव्या संकरित जातीं-बद्दल शेतकऱ्यांच्या मनात अजून व्हावा तसा विश्वास निर्माण झाला नाही. उगाच हातचे सोडून पळत्याच्या मागे का लागा, असा सुज्ञ विचार त्याने केला नाही, तरच नवल. पण एवढे सगळे असूनही, आपल्या रुळलेल्या रस्त्याबाहेर जाऊन हे नवीन बेणे लावण्याचे धाडस करण्यास भायला मंगल तयार झाला होता.

आबांनी त्याला तायचुंग व IR–8 चे दोन–दोन किलो बी दिले. पण नुसते बी चांगले असून काय उपयोग ? सुधारलेल्या बियाण्यापाठोपाठ येणाऱ्या ज्या असंख्य आवश्यक गोष्टी, त्या केल्या नाहीत तर पीकवाढ कशी होणार ? या नव्या जातींचे नवे तंत्र सांभाळायला हवे. दिंडोशी येथील आमच्या शेतीवर आबा वेगवेगळे प्रयोग करत असतात. उत्पादनवाढ हा त्या विविध प्रयोगांमागील उद्देश असतो. कोळंब्या-ऐवजी तायचुंग व IR–8 ची लावगड करून व नव्या तंत्राचा अवलंब करून भाताचे सरासरी उत्पन्न एकरी आठशेवरून दोन हजार किलोवर नेणे आबांना शक्य झाले होते. पण जे आबांना शक्य झाले ते भायलासारख्या गरीब, अशिक्षित शेतकऱ्याला होईल का ? मजूर, पैसा, अवजारे, माहिती या सर्वांचीच त्याच्याकडे मारामार ! अशा या साधनविहीन शेतकऱ्याने काय करावे ?

त्याला मार्गदर्शन आम्ही करावे व त्यायोगे, आपण उचललेले हे पाऊल योग्य दिशेने पडत असल्याचा विश्वास त्याच्या मनात निर्माण करावा, असा कार्यक्रम आबांनी आमच्यापुढे ठेवला होता.

सोमनाथहून आल्यापासून आम्ही मुले दिंडोशीच्या भातशेतीत काम करण्या-साठी जातच होतो. पण आम्ही काम करत होतो, आणि माहिती मिळवत होतो. त्यांचे स्वरूप अगदी जुजबी होते. या वर्षी मात्र आम्ही विशेष लक्ष देऊन आणि

प्रत्येक कामातील बारकावे लक्षात घेऊन औषध-फवारणी, लावणी, वगैरे कामे दिंडोशीला केली, आणि या अनुभवांचा उपयोग भायलाच्या शेतावर केला.

शेवटी नवीन तंत्र, नवीन तंत्र म्हणजे तरी काय? पहिली महत्त्वाची गोष्ट म्हणजे शास्त्रीय, चिकित्सक दृष्टी. प्रत्येक बारीकसारीक गोष्ट का आणि एका विशिष्ट प्रकारेच का करावयाची, याला कारणे असतात. ती समजून घेतल्याशिवायच कामे केली, तर तो आंधळेपणा ठरेल. गादीवाफे का करावयाचे, खत का द्यावयाचे, लावणी दोरी घेऊन, जपानी पद्धतीने आणि तीही पूर्वपश्चिम का करावयाची, आंतर मशागतीची गरज काय, या व अशा अनेक गोष्टी समजून घ्यायला हव्यात.

दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे नेमकेपणा. आणि वेळेचे बाबतीत हा नेमकेपणा पाळणे तर नितांत आवश्यक आहे. ठरल्या वेळेला खत दिले नाही तर पिकांवर अनिष्ट परिणाम होईल, औषध मारले नाही तर कीड, उभे पीक खाऊन फस्त करील, आणि याउलट नियमितपणे व आवश्यक तेवढे खत, पाणी, रोगप्रतिबंधके, इत्यादी मिळाले तर पीक उत्तम यायलाच हवे.

शाळा-कॉलेजांच्या वेळा आणि या भातांच्या खत-औषधांच्या वेळा, यांचा मेळ जुळवायला हवा होता. शनिवार-रविवारी, व जरूर तर सुट्ट्यांच्या दिवशी, आम्ही त्या त्या वेळी आवश्यक ती कामे केली. उत्क्रांती दलाच्या सभेत आधी सांगून सर्वांच्या सोयीची वेळ नक्की केली जात असे. चार-पाच मुले जाऊन तास-दोन तास काम करून येत. या कामाच्या स्वरूपाची थोडी धावती कल्पना दिली, तर एका परीने हे 'तंत्र' किती सोपे आहे, व एका परीने वेळचेवेळी काम करण्यास


लहान मुलांसाठीं उत्कृष्ट औषध !

डोंगरे बालामृत

के. टी. डोंगरे अॅण्ड कं. प्रा. लि. मुंबई-१.

किती महत्त्व आहे, याचा अंदाज येईल. २८ जून ते २१ ऑक्टो. ६९ या सुमारे चार महिन्यांच्या काळातील कामाचा तपशील पुढीलप्रमाणे आहे :

| अनुक्रम. | दिनांक | उपस्थिती | तास | कामाचे स्वरूप |
|---|---|---|---|---|
| १ | २८-६ | २ | १ | रावाची पहाणी, राबातील तण काढण्यास भायलाला सांगितले. |
| २ | ३०-६ | ५ | २ | राबात खत, अमोनियम सल्फेट ४ कि.; औषधफवारणी—ब्लायटॉक्स ४० ग्रॅम्स्, टॅफड्रीन ३० मि. लि, पाणी १५ लिटर. |
| ३ | ६-७ | १४ | ६ | लावणी; शेताची मापे; खत टाकणे—सुपरफॉस्फेट ४० कि., अमो. सल्फेट ४० कि., म्युरेटो पोटॅश ८.५ किलो. |
| ४ | २०-७ | २ | १/२ | पाहणी, कोळपे भायलाकडे दिले. |
| ५ | २७-७ | ६ | २ | औषधफवारणी—ब्लायटॉक्स ६२.५ ग्रॅ., एन्ड्रीन २० मि. लि., पाणी २५ लिटर. |
| ६ | १०-८ | ४ | २ | खत टाकणे—अमोनियम सल्फेट ४० किलो. |
| ७ | १७-८ | ६ | २ | औषधफवारणी—ब्लायटेन २०० ग्रॅ., सुमिथिऑन ५० मि. लि., पाणी ४० लिटर. |
| ८ | १४-९ | ५ | १ | रोपांची वाढ, किडींचा प्रादुर्भाव इ० संबंधाने पिकाची पाहणी. |
| ९ | २०-१० | ३ | १ | } भाताचे वजन करणे. |
| १० | २१-१० | ४ | ३/४ | |

लावणीच्या दिवशी आम्ही चौदाजणांनी जाऊन दुपार होईपर्यंत लावणी पुरी केली. त्या दिवसाची आठवण अजून निथळते आहे, ओली चिंब आहे. तिचा ताजेपणा कमीच होत नाही. पाऊस धुवाधार कोसळत होता. आभाळात ढग, तसे भायला आणि त्याच्या माणसांच्या डोळ्यात कौतुक दाटून आले होते. डोईवर इरले पावसाच्या पाण्याचेच होते. भलऱ्या रंगल्या होत्या नि गुडघा गुडघा चिखलात इवलेसे भाताचे रोप लावले जात होते. म्हणता म्हणता लावणी पुरी सुद्धा झाली. आणि मग चिखलाची रंगपंचमी झाली. आभाळात घट फुटत होते नि आम्ही खाली गोकुळाष्टमी साजरी करत होतो. बांधाशेजारच्या खडकावर बसून बरोबर आणलेल्या शिदोऱ्या सोडल्या. लसणीच्या चटणीसंगे केलेल्या त्या जेवणाची चव अजून जिभेवर रेंगाळते आहे.

या प्रयोगाच्या एका महत्त्वाच्या टप्प्यापर्यंत येऊन पोहोचल्याचे समाधान प्रत्येकाच्या चेहऱ्यावर दिसत होते. लावणीनंतरही आठवडचा-पंधरवडचाला

मागाठणे-भेटी सुरू राहिल्या. भायलाकडे कोळपे नेऊन दिले. बावीस दिवसांनी कोळपणी होत होती.

दिसामासी रोपे वाढत होती, लोंब्या भरत होत्या. आमच्यापैकी काहीजणांनी 'भाताची लोंबी' ही चीजही आयुष्यात प्रथमच पाहिली होती.

कापणी आटोपल्यावर, भात पुरेसे वाळल्यानंतर नेहेमीप्रमाणे उडवे रचून न ठेवता, शेतातच ताडपत्री पसरून त्यावर 'अक्षत' या यंत्राच्या साहाय्याने झोडणी केली. त्यामुळे तायचुंग-आय. आर. आठच्या उत्पन्नाचे आकडे ताबडतोब हाती आले. भायलाच्या उरलेल्या शेतातील कोळंबा मात्र अजून सवडीप्रमाणे मोजून घ्यायचा आहे.

वजनाचा काटा घेऊन भात मोजावयास गेलो, त्यावेळी आनंद, उत्सुकता, समाधान, हुरहूर – साऱ्यांची सरमिसळ झाली होती मनात. चार महिने केलेल्या परिश्रमांचे काय फळ मिळणार होते ?

मोजल्यानंतर तायचुंग ३·१ गुंठे क्षेत्रात १५७ किलो, व आय. आर. आठ ४·३ गुंठ्यात २१४·५ किलो भरले. म्हणजे दर एकरी प्रमाण तायचुंगचे २०२६ किलो व आय. आर. आठचे ११९५ किलो पडले. बोरिवली तालुक्याचे सरासरी उत्पन्न ४०० किलो आहे. पाचसहा वर्षांमागे भायलाने मागाठण्यात भाताचे दर एकरी उत्पन्न सर्वात जास्त काढून पहिला क्रमांक पटकावला होता, त्यावेळीही त्याचे प्रमाण होते एकरी १०५० किलो.

खतांवरील ७५·०२ रु. व औषधांवरील ७·२० रु. मिळून ८२·२२ रु. खर्च वाढला आहे. म्हणजे दर एकरी ४४४·५ रु. खर्च वाढला आहे. जुन्या पद्धतीने ५०० किलो कोळंब्याचे ७० रु. क्विंटलप्रमाणे ३५० रु. उत्पन्न येते. त्याऐवजी या नव्या जातीचे २००० किलोचे ६० रु. क्विंटलप्रमाणे १२०० रु. उत्पन्न झाले आहे. खत-औषधांचे वाढीव साडेचारशे भरून निघून, शिवाय दर एकरी चारशे रुपये पूर्वीपेक्षा जास्त मिळतात.

भायलाच्या सुरकुतल्या चेहऱ्यावर समाधानाच्या रेखा लकाकत होत्या. पुढल्या साली जास्त जमिनीत हे नवे बेणे लावण्याच्या गोष्टी तो करू लागला होता, नि हीच आमच्या यशाची पावती होती.

□ □ □

# धुरवार

**म. वि. कोल्हटकर**

वाटा कधीकधी चकवतात. माणसाला भुरळ घालतात. तशीच ती एक वाट होती.

आणि त्या वाटेवरून चालणारे तिघे. पैकी एकाच्या हातात हवाई बंदूक होती. बाकी दोघे सडेफटिंग. मुकाटपणे वाट तुडवीत ते चालले होते. तेवढीच गोष्ट त्यांच्या स्वाधीन होती.

म्हटले तर तिघांच्या वाटा वेगवेगळ्या होत्या. एक होता वायुदलात. मित्रा त्याचे नाव. दुसरा होता सेनादलात. जगत्सिंग त्याचे नाव. तिसऱ्याचे नाव होते स्वामी. तो आरमारात कॅप्टन होता. तिघांची बोली वेगळी. प्रांत निराळे. होय, आवडीनिवडीदेखील भिन्न. तरीदेखील तिघात वेगळेपण नव्हतेच. ते का नव्हते हे त्यांनादेखील ठाऊक नव्हते. ते शोधण्याचा यत्नही त्यांनी केला नाही.

तिघे एकत्र आले. फार दिवसांनी योग येत होता, म्हणून त्यांनी ठरवले मन-मुराद भटकायचे. पाय नेतील तिकडे जायचे. मुळीच थांबायचे नाही. म्हणून ते भटकत राहिले. तेव्हा मग वाट गुंफल्यासारखी झाली. शिरा गुंताव्यात तशी. साप-शिडीसारखी. पुरात पडलेल्या भोवऱ्यासारखी. ते तिघे आवर्तात फिरत राहिले. प्रथम खुशीने. मग नाइलाजाने.

समोर खुला पहाड. अनादिकालापासून माजलेले जंगल. सोबतीला हिरवट वास घेऊन येणारा रानवारा. त्यांनी फलक पाहिला होता, नाही असे नाही. फलकावर ठळक अक्षरात लिहून ठेवले होते. 'गीर जंगल : संरक्षित वनविभाग : परवानगी-विना प्रवेश करू नये' इत्यादी. तथापि ते तिघे बळेच आत शिरले. मग वाट हरवून बसले. दूरवर सरहद्द दिसेना. गावाची खूण आढळेना.

परत फिरणे त्यांच्या स्वाधीन नव्हते. म्हणून त्यांनी धीटपणे येणाऱ्या प्रसंगाला सामोरे जाण्याचे ठरवले.

वाटा थोड्या मोकळ्या झाल्या होत्या. चढण वाढत होती. डोंगरमाथा दिसत नव्हता. तिघे बोलत नव्हते.



" ऐन वनराज्यात येऊन पोचलो तर आपण " मित्रा म्हणाला.

" आणि वनराजाच्या राजवाड्यातदेखील " सिंग उद्‌गारला.

" त्याचं विलासी ऐश्वर्य पाहून घेऊ " मित्रा म्हणाला.

" खेळ विश्वासाशी आहे. जरा जपूनच " सिंग.

" ॲण्ड्रोक्लीसची कथा ठाऊक आहे ना तुम्हाला ? " स्वामीने विचारले.

" ॲण्ड्रोक्लिसची मैत्री जमली असेल कदाचित् " सिंग.

" तो दयाळू असतो. उगाच वाटेला जात नाही. " स्वामी.

मग तिघांच्या डोळ्यांपुढे विस्तवासारखे डोळे, भरगच्च आयाळ, विक्राळ जबडा आणि दहशत निर्माण करणारी गर्जना आळीपाळीने येऊ लागली. ते तिघे थोडे बावरले.

दिवस मावळला. सांज करकरू लागली. आभाळात एक चांदणी लुक् लुक् करू लागली. आता दिवस असाच खोल बुडणार. रात्रीचे आगमन होणार. एका-पाठोपाठ चांदण्या फुलणार. वर चांदण्यांनी भरलेले आभाळ. खाली दाट काळोख.

वाट अंधारात बुजत होती. वठलेल्या एका झाडावर घुबडाचे कुटुंब विसावले होते. दमट कुबट वास सुटला होता. खडकाच्या अंगातून फुटलेली झऱ्याची धार पाचोळ्यात कुचमली होती. पाला कुजला होता. खडकावरून रानमुळ्या सरपटत खाली उतरल्या होत्या.

तिघांनी ठरवले. बोलून चालून उडी घेतली आहे. गुहेत शिरलो आहोत. आता फिकीर करावयाची नाही. जिवाची पर्वा करायाची नाही. वाटेचा नाद सोडायचा नाही. ती जसे घुमवेल तसे घुमायचे. चढ शिळेवर म्हटले तर चढायचे. टाक उडी म्हटले तर उडी ठोकायची.

" आणि समज दोन पिंगट डोळ्यांनी वाट अडवली तर ? " सिंगने विचारले.

" नाही म्हणायचे नाही. त्याच्या पाठोपाठ चालू लागायचे. हो पुढे म्हणायचे. "

असेच तिघे वणवण भटकत राहिले पोटात अन्नाचा कण नाही. तोंडे सुकलेली. पण मनाची उभारी दांडगी. जिद्दीने ते तिघे वाट तुडवीत होते. त्यांच्या मनात एक अंधुक आशा होती. या मनस्वी अंधारात दिलखुलास ऐश्वर्यानिशी एखादा वनकेसरी भेटेल, पुढ पाहू काय करायचे ते. पण केसरी भेटला नाही. त्याचा आवाज कानी आला नाही. पाऊलखुणा सापडल्या नाहीत.

ते तिघे खूप उचीवर येऊन पोचले होते. सभोवार जंगल बेसुमार माजले होते. तिघांचे ओठ सुकले होते. पोटात आतडी वळत होती. डोळ्यावर झापड आली होती. पण पाय थांबायला राजी नव्हते.

दूर नैर्ऋत्येला मोठा निनाद उठला. तिघांनी कान टवकारले. छे : ती मेघगर्जना होती. पाठोपाठ वीज चमकली. वारे सुटले. बघताबघता आभाळ काळवंडले. मेरु गदगदा हालला. जोरदार चळक झोडपून गेली. पावले चिकचिकू लागली. पुन्हा वारे झोंबू लागले. तिघांनी कोंडाळे केले. एकमेकांना मिठ्या मारल्या. उरल्या-सुरल्या सिगरेटस् फुलवल्या. धुरांचे दाट वलय निर्माण केले. त्या आवरणात मग काही काळ ते सुखाने बसले. जवळपास पाणी नव्हते. गार हवेचे झोत ओठांवर घेत ते तिघे फिरून वाटचाल करू लागले.

दूर एक ठिपका लुकलुकू लागला. तिथे क्षितीज डोंगरमाथ्याला टेकले होते.

" छे : तारा " सिंग म्हणाला.

" नव्हे दिवा " स्वामी.

" तो पहा तो पहा मोठा झाला " मित्रा.

" गेला. विझला. संपला. " स्वामी.

" फिरतोय् वाटतं दिवाच आपल्याभोवती " मित्रा.

दिवा एव्हाना सरकू लागला. पुढे तो स्थिरावला. मग हेलकावे खाऊ लागला. ज्योत धरू लागला. प्रकाश थोडा मोठा झाला. तेव्हा दिवा एका वेड्यावाकड्या झोपडीत आहे आणि झोपडी झाडाच्या बुंध्याला टेकली आहे असे दिसू लागले.

" दिवा फिरला " मित्रा.

" छे: झोपडी हलली " स्वामी.

" नाही नाही दोघेही " मित्रा.

तिघांच्या नजरेवर विश्वास बसेना. तिघे हट्टाला पेटले. त्यांनी दिव्याचा पाठ-लाग चालवला.

ते आता दिव्याजवळ येऊन ठेपले. वेड्यावाकड्या काटक्या रचल्या होत्या. त्याखाली एक मशाल फुरफुरत होती. आणि एक वारुळ. निमुळते होत गेलेले. निश्चळ.

तिघेजण झाडाच्या बुंध्याआड लपले. वारुळ किंचित हलले. पापणी हलली. तेव्हा पिंगट छटा असलेल्या जटाही दिसू लागल्या. जख्ख काष्ठासारखे हात. जीर्ण रुद्रा-क्षांची माळ.

एक मधमाशी गुणगुणू लागली. अनेक गुणगुणू लागल्या. आवाज स्पष्ट होऊ लागला. वारुळाच्या कंठातूनच तो उमटत होता. मग त्या वारुळाने शीळ मारली. तेव्हा भारल्याप्रमाणे ते तिघे पुढे झाले. त्यांनी डोकावून पाहिले. तेव्हा तो जीर्ण पुरुषी सांगाडा वडाच्या फांदीवर लोंबकळावे तसा जागच्या जागी झोके घेऊ लागला. मशाल मात्र फुरफुरत नव्हती. एकाएकी तो खळखळा हसला. बोडक्या डोंगरावर-देखील ते हसणे घुमटात उमटावे तसे घुमले. मग खोल दरीत नाद जिरावा तसे ते क्षीण होत गेले.

" याऽऽ " तो हाताची तरफ लांबसडक फेकून म्हणाला. मग ढेकूळ पाण्यात विरावे त्याप्रमाणे फस्स् आवाज काढीत तो तिघांकडे पाहू लागला. तो बोलण्याचा यत्न करीत होता. पण त्याला श्वास आवरत नसे. मध्येच त्याला खोकल्याची उबळ येई. तेव्हा त्याचे दात खुळखुळणाऱ्या कवड्यांसारखे वाजत.

" बाबा, नाव काय तुमचे ? " स्वामीने विचारले.

" नाव ? नाव ? नाव काय बरं ?" तो स्वतःशी आठवू लागला. मग पिंगट डोळ्यांनी तिघांना आळीपाळीने निरखीत म्हणाला, " नाव आठवत नाही...असेल काहीतरी...होतं पूर्वी मलाही नाव...नावे बदलावी लागली मला...मग विसरून गेलो सारी नावे. पण काय रे ? नावात काय आहे ? हीच मशाल घेना " म्हाता-ऱ्याने मशालीकडे नजर रोखली. नजरेतली तळपती ज्योत मशालीकडे वळली. ज्योतीची आडवी रेघ भडकली. म्हातारा खालीवर मान हलवू लागला. तेव्हा ज्योत

खालीवर घुसळू लागली. तेव्हा सिंगने मशाल धरली. करारी स्वरात म्हातारा उद्गारला, ' सोड ती मशाल. ती विझणार नाही. अशीच जळत राहणार.' आणि खरेच मशाल आज्ञाधारकपणे संथ जळत राहिली.

" या मशालीला टेंभा म्हण. दिवा म्हण. आग तीच. प्रकाश तोच. होय की नाही ?" म्हाताऱ्याने विचारले.

सारेजण एकसुरात म्हणाले, " होय. खरे आहे."

" मग पुन्हा माझे नाव विचारू नका." म्हाताऱ्याने खडसावले. तो थोडा अस्वस्थ झाला. पाठीतून कळ यावी तसा कासावीस झाला. कण्हू लागला.

" काय होतय् आपल्याला ?" स्वामीने विचारले.

" हे असेच चालायचे. नेहमीचेच. तुम्ही लक्ष देऊ नका तिकडे."

" बाबा, गाव कोणते तुमचे !" त्या वृद्धाचा नूर पाहून स्वामीने विचारले.

" गावही मला माहीत नाही. हेच वारे. हीच जमीन. हीच माती. अरे कितीएक वेळा हिमालयाचे वेड घेऊन भटकलो. हिमालयावरचे प्रेम वितळले नाही. तिथेच एका गुहेत माती व्हावी देहाची. सिंधुसागराचे पाणी प्यायलो. सह्याद्रीच्या कडेकपारीत लपंडाव खेळलो."

" कुणाशी ?"

" अरे या सातासमुद्रापलीकडून आलेल्या गोऱ्या संगिनींशी. या संगिनी छुप्या मार्गाने येत होत्या. त्यांची चाल भीषण होती. या संगिनींनी तट फोडले असते तर पर्वा नव्हती. या संगिनींनी आयाबहिणींच्या,डोईवरचे पदर उडवले. कासोटे सोडले. देवळे फोडली नाहीत. मूर्ती ओढल्या नाहीत; पण श्रद्धेचा भुगा केला. विषातला किडा विषावर पोसावा तशी गत झाली इथल्या माणसांची."

" या गनिमाशी रित्या हाताने संग्राम केलात तुम्ही ?"

" हात हात नव्हते. पाहायचे आहे. पहा, पहा..." त्या वृद्धाने सहजासहजी मशालीवरच्या स्वतःभोवती गुरफटलेल्या आगीच्या कळीत करांगुली खुपसली. तिथे लाल रसरशीत इंगळ दिसू लागला. तेव्हा वृद्ध धबधब्यासारखा हसला. त्याच्या तोंडातून चीत्कार उमटू लागले. नजरेतून अंगार फुलू लागले. त्याच्या मुद्रेवर वेगळेच तेज चढू लागले. त्याच्या पिंगट जटा थरथरू लागल्या.

" या हातांनी पहिला पाठ घेतला होता निखारे घेण्याचा. ते घेऊन शांतपणे शपथ म्हणण्याचा. शपथ घेऊन ती गिरवीत राहण्याचा." यावेळी तो वृद्ध हसला तेव्हा साखळदंड खळाळले.

" होय. आम्ही गुन्हा केला. आम्ही गुन्हा करणार. आमचे व्यसन आहे ते. या देशात वाहणारा वारा, इथला पाण्याचा थेंब, इथले गवताचे पाते, इथला मातीचा कण न् कण माझा आहे. तो माझाच राहील. या मातीवर माझे अनिवार प्रेम आहे. अरे तो माझा स्वभावच आहे. माणूस आपल्या हातावर प्रेम करतो, पायावर प्रेम करतो,

डोळ्यावर प्रेम करतो, मातेवर प्रेम करतो, तसेच या भूमीवर प्रेम. अहो यात अलौकिक काही नाही हो. हा आमचा देहधर्म. जशी तहान, जशी भूक, तशी ही मातृभूमीवर प्रेम करण्याची भावना. यात जगावेगळे काही करीत नाही आम्ही. म्हणून चक्क सांगितले युवकांना, पुतळे नका उभारू. देव्हारे नका माजवू. आमच्या नावाचा उल्लेखदेखील करू नका. पुतळेच उभे करायचे असतील तर मातेशी द्रोह करणारांचे उभारा. कारण मातृद्रोह करणे अस्वाभाविक. हा द्रोह म्हणजे विकृती. या विकृतीपासून जपून रहावे असा इशारा देणारा तो पुतळा!"

"बाबा, देहाची कोण ही आबाळ करून घेतलीत!" स्वामीने विचारले.

"मी खादाड आहे. या पहा माझ्या अचाट दाढा. अनिच्छेने मला क्रूर व्हावे लागले. हत्यार उपसावे लागले. शल्यकर्म करावे लागले. रक्त प्यावे लागले. मी क्रूर काळ बनलो. महाभयंकर झालो. हे सारे अनिवार्य होते. मला ठाऊक होते मला मरण आहे. पण या कार्याला मरण नाही. देशभर झंझावातासारखा पसरणारा मी, आगीचा डोंब उठवणारा मी, सूक्ष्म विवरातून बाहेर पडलो. उदंड सागर तरून पैलतीराला गेलो.'

"आपली कहाणी अजब आहे म्हणायची" सिंग.

"समोर प्रचंड शिळा उभी होती. ती शिळा शेकडो वर्षांची होती. तिला बेगुमान धडक देत राहिलो. उरात निष्ठा होती ना धगधगत! अजून पहा. हा बुखार तेजाळला आहे. धमनीत रक्त उकळते आहे. कडकडा ठिणग्या उडत आहेत. पहा पहा त्या उडाल्या. ताप शिरापर्यंत चढला आहे. मी बेभान झालो आहे. पहा तर खरे मनगटाला हात लावून." त्या वृद्धाने मनगट पुढे केले. तिघांनी हात पुढे केला. निखाऱ्याशी एकरूप झालेला तो लोहाचा तुकडा होता. त्याची धगच चटके देत होती. तिघांचे हात बाजूला झाले.

"पाहिलेत ना? हा असा बुखार बाळगून आहे मी अंगात. तरीही मी वावरतो आहे. हसतोच आहे..." वृद्ध म्हणाला.

"पण आता तर हा देश स्वतंत्र झाला. खरे ना?" सिंगने विचारले.

"साफ खोटे. एकदम झूट." त्या वृद्धाला धाप लागली. त्याला खूप बोलायचे होते. तो सांगू लागला.

"अरे, तीच कहाणी सांगतो. हाच पोर. याला अंगाखांद्यावर खेळवला. उनाड होता. चुगलखोर होता. देवाचे प्रेम नव्हते. देशाचे प्रेम नव्हते. पण म्हटले सुचेल बुद्धी मोठेपणी. त्याचे दुर्दैवी उद्योग खपवून घेतले. दूरचे त्याला दिसत नव्हते. म्हणून खांद्यावर चढवले. असा त्याला मोठा केला. असा त्याला उंच केला. पुढे परके राज्य गेले. हा राज्यावर बसला. सिंहासनावर आरूढ झाला. ठीक आहे. घडी उजाडली. मंगलवाद्ये वाजली. दरबार भरला. मनाशी म्हटले कसेही झाले तरी आपलाच भाई. राज्यही आपले. पाय थरथरत होते. दरबारी गेलो. म्हटले वैभव डोळे भरून पहावे. द्वारपालाने हुसकावून लावले. त्याला जुमानले नाही.

चौथी सचित्र आवृत्ती

□ □

राजा शिवछत्रपति

□ □

ब. मो. पुरंदरे

□ □

मूल्य : रुपये बेचाळीस फक्त

□ □

राजहंस प्रकाशन
पुणे

तरातरा आत गेलो. दरबार भरला होता. पाहतो तो भलभलते लोक मानाच्या जागा अडवून बसलेले. तरीही हरकत नाही. राजाला सामोरा गेलो. हसलो. अभिवादन केले. राजाच्या चेहऱ्यावर हास्य उमटले नाही. उलट आठी चढली. "मी आलो आहे" मग मीच म्हणालो. "कोण तू ? मी ओळखत नाही." राजाने गुर्मीत उत्तर दिले. "अरे, या हातांनी तुला खेळवले. या खांद्यावर बसवून पडलेले घट्टे तरी ओळखशील ?'

"छे: आम्ही घोड्यावर बसलो. खांद्यावर बसणे आम्हास ठाऊक नाही." मिजाशीत उत्तर आले.

ही साडेसाती चुकवण्यासाठी म्हणून त्याने स्वत:भोवती उधळलेल्या अनेक मोहरांतली एक उचलली आणि माझ्या अंगावर फेकली. "चल घे. चालू लाग" तो म्हणाला.

"मला क्रोध अनावर झाला. ते क्षुद्र धातूचे पिवळे नाणे तसेच त्याच्या अंगावर भिरकावले. भरदरबारात त्याच्या तोंडावर थुंकलो, तेव्हा एकच कोलाहल उठला. मानकरी धावले. सरदार अंगावर आले. हजारोंचा जमाव चालून आला. त्यांचे फटकारे, धक्के, धिक्कार सहन करीत गिळीत हा मी इथे आलो. पुन्हा मी त्या राजधानीकडे जाणार नाही...हा बुखार मला जाळतो आहे. हाड न् हाड प्रसरण पावून फुलत आहे. पेटत आहे. पहा तर हात हाती घेऊन."

त्या वृद्धाने हात पुढे केला. ती वज्रमूठ धगधगत होती. तिघांनी हात लावला. झटका बसावा तसे तिघांचे हात बाजूला गेले.

उत्तर रात्र होत आली. त्या वृद्धाची कहाणी संपली नव्हती. तो अखंड बोलत होता. ते तिघे मंत्रमुग्ध झाले होते. ती वाणी क्षीण झाली होती. पण ते तिघे उसंत न घेता वेगळ्याच साम्राज्यात हिंडत होते. या साम्राज्यात तो वृद्ध नव्हता. पण क्षीण आवाज अखंड सोबत करीत होता.

पहाट झाली. उजाडले. तिघेजण भानावर आले. तिथे झोपडी नव्हती. मशाल नव्हती. राख नव्हती. झाडाखाली फक्त एक दगड होता. तो अद्याप ओलाच होता.

वाट आता सुरळीतपणे चालली होती. ते तिघे अशांत होते. वाटेत एक वृद्ध भिल्ल भेटला. ऐन जंगलात तिघांना पाहून त्याने अचंबा व्यक्त केला. "दादा, वर कुणी माणूस ?" स्वामीने विचारले.

"वर माणसाचो माय् न्हाई पाय ठिवण्याची."

"कवा होतं का कधी ?"

"न्हाईबा"

"बघ आठवून."

"कवा मागं एकदा बावा आला हुता दाडीवाला. त्येनं अस्मानाला भिडणारा जाळ पेटवला अन् उडी घेतली त्येच्यात. लइदी झालं त्या गोष्टीला."

तिघेजण हबकले. पुढे चालू लागले. तेव्हा भिल्ल स्वत:शी पुटपुटला, "रान हटत चाललं. आता जातिवंत जनावरबी उरलं न्हाई या गीरच्या रानात !" ¤ ¤ ¤

# एक
# आवाज
# बाकी
# बचि

## लेखक - आनन्द चान्देकर

## लेखांक - पाच

### २९ मे

सकाळचे ५–५॥ वाजले असतील, पण बाहेर चांगले उजाडले आहे. ज्याप्रमाणे पूर्वेकडे सकाळ लवकर येते त्याचप्रमाणे जसजसे वर जावे तसतसे लवकर उजाडते. हवेत थंडी चांगलीच आहे. आम्हा दक्षिणेत रहाणाऱ्यांना थंडी काय ते खरोखर माहीतच नाही. खरी थंडी हिमालयातच. सकाळी ५॥ वाजता आणून दिलेला गरम चहा जर तसाच राहिला, तर ६ वाजेपर्यंत त्याचा गोठून बर्फ होतो. मी जागा झालो व पिशवीच्या उबेत कुंदनची वाट पहात पडून राहिलो. बाहेर व्यंकीचा व माळींचा आवाज ऐकू येतो. त्यांचा तंबू माझ्यापासून जरा दूरच आहे. बोलणे स्पष्ट

ऐकू येत नाही. ते हमालांना पैसे वाटीत आहेत. थोड्याच वेळात हमाल परत जावयास निघतील त्यावेळेस मला बाहेर जायला हवे. मी चहा येण्याची वाट पहात आहे.

शेवटी कुन्दन चहा आणतो. मग मी तंबूच्या बाहेर येतो. हमाल परत जात आहेत. "नमस्ते सरकार" भीमसिंग म्हणतो. "अच्छा, अभी वापस जानेके वखत आना" मी त्याला म्हणतो. "जरूर सरकार" तो म्हणतो. आता आमची निघण्याची तयारी.

सात वाजलेत. आम्ही निघण्याच्या तयारीत आहोत. मी सर्व सामान तपासतो. होकायंत्र, नकाशा, पेन्सीली, कोनमापक व दुर्बीण. आम्ही सहाजण आहोत. मी, माळी, लोपसांग, दोरजे, मीरवानसिंग व कुंदन. बाकीचे सदस्य व हमाल आज विश्रांती घेतील.

ह्या पुढील प्रदेशात आमच्यापैकी कोणीही गेलेला नाही. फारच थोडे लोक पूर्वी गेलेले आहेत. मला वाटते १९५० सालची, स्कॉटिश लोकांची शेवटची तुकडी. आम्हाला आता पूर्णपणे नकाशा, होकायंत्र व आम्ही मिळविलेली माहिती यावरच अवलंबून रहावे लागेल. कल्पना चित्तथरारक आहे.

आम्ही निघालो. "All the best sir" "Best of luck sir" इतर आम्हाला निरोप देतात. निघताना मी लोपसांगला नकाशाप्रमाणे पुढील प्रदेशाची कल्पना देतो व कोणत्या दिशेने जावयास पाहिजे हे ठरवितो. आम्ही चढू लागतो. मी व माळी सर्वात सावकाश. कुंदन, मीरवानसिंग यांनी पाठीवर एकेक तंबू व दोर घेतला आहे. त्यांच्या नेहमीच्या बोजाच्या मानाने हे काहीच नाही. ते झपाट्याने चढू लागतात. आज आम्ही Camp ची जागा ठरविल्यास हे सामान तेथे ठेवून परत यायचे आहे.

माझी तब्येत ठणठणीत आहे. माळींचो पण उत्तम दिसते. ह्या वेळेस त्यांना उंचीचा त्रास होऊ नये अशी माझी इच्छा आहे. सुरुवातीला थोडा वेळ आम्ही बरोबर चालतो. नंतर सहाजिकच लोपसांग व इतर पुढे निघतात. आम्ही एका दरडीवर चढतो. हिमनदीतून आलेला एक प्रवाह समोर खाली दिसत आहे. पाणी पांढरट व बर्फासारखे थंड आहे. ह्याच प्रवाहाच्या आणखी खालच्या भागातून हमाल आमच्यासाठी पाणी आणतात.

आता आमच्या डाव्या बाजूला एक बर्फाच्छादित शिखर दिसू लागले. नकाशावरून आपण कोठपर्यंत पोहोचतो ते पहावे असा विचार मी करतो. नकाशा व होकायंत्र काढतो. सर्व थांबतात. होकायंत्राने शिखराची दिशा काढली. अरे! हाच हनुमान काय? मी माळींना पण पहाण्यास सांगतो. थोडा वेळ हेच हनुमान शिखर असावेसे वाटते. म्हणून आम्ही जरा निरखून पाहू लागतो. एवढ्यात त्या शिखराच्या उजव्या बाजूला म्हणजे उत्तरेला प्रचंड दातासारखा दिसणारा खडक ध्यानात येतो. मालाथुनी खिंडीतूनही ह्याच खडकाकडे आमचे लक्ष गेले होते. तो तर

हनुमानच्या दक्षिणेला आहे. हे शिखर हनुमान नाही. छोटा हनुमान आहे. आमची खात्री पटते. आम्ही पुढे निघतो. गिर्यारोहणात अशा प्रकारच्या चुका होऊ शकतात. आमचे शिखर समजून दुसऱ्याच शिखरावर चढाई होते, व नंतर छायाचित्रावरूनच चूक लक्षात येते. आमच्या अॅडव्हान्स कोर्समध्ये हाच प्रकार घडला होता.

आम्ही खाली उतरून तो प्रवाह ओलांडतो. आणखी थोडे पुढे जाताच आम्हाला आमचा हनुमान दिसू लागतो. स्कॉटिश तुकडीने ज्या ridge वरून जाण्याचा प्रयत्न केला ती पण आमच्या समोरच आहे. ती सरळ शिखरापर्यंत जाते असे वाटते; पण तिच्यात एक प्रचंड खाच आहे हे आम्हाला माहीत आहे. त्या खाचे-पर्यंत जाऊन स्कॉटिश तुकडीला परत यावे लागले. ती खाचपण अस्पष्टशी दिसते. आम्ही ही ridge टाकून पुढील हिमनदीतून एकदम शेवटच्या बर्फाच्छादित ridge वर जाणार आहोत.

हनुमान शिखराजवळील दक्षिण बाजू दिसत आहे. "Do you think we can climb from this side ?" मी लोपसांगला विचारतो. "I think that slope is too dangerous" तो म्हणतो. खरोखरच ती बाजू भिंतीसारखी सरळ आहे. आम्ही विशेष न बोलता चढत राहतो.

"तुम्ही जरा पुढे व्हा, मी आलोच" माळी माझ्या जवळून पाण्याची बाटली घेत म्हणतात. आम्ही एक सुटलेल्या दगडांचा खच ओलांडीत आहोत. आम्ही दोघे मागे आहोत. बाकीचे पलीकडे आमच्यासाठी थांबले आहेत. मी तेथे पोहोचतो व त्यांना माळींसाठी थांबावयास सांगतो. आम्ही बसतो. हवा उत्तम आहे. स्वच्छ सूर्यप्रकाश आहे. मध्येच एखादा ढग येतो. सूर्य त्याच्या आड जाताच थंडी वाजू लागते. माळी येताना दिसतात एवढ्यात कडाऽड कडाऽड वरून आवाज येतो. दगड घसरत आहेत. मी जरा दचकतोच. कदाचित मोठा भाग खचेल. पण लोपसांग व दोरजे शांत आहेत. मीरवानसिंग व कुंदन देखील जरा घाबरल्यासारखे वाटतात. आम्ही माळींना ओरडून सावध करतो. सुदैवाने आवाज थांबतो. थोडेच दगड घसरले. आता ते थांबले आहेत. माळीपण येऊन पोहोचतात. "You must cross such places very quickly" लोपसांग सांगतो.

आता आम्ही स्कॉटिश ridge ओलांडली आहे, व त्या पलीकडील हिमनदीच्या पायथ्याशी आहोत. त्या हिमनदीतून निघणारा प्रवाह आमच्या समोरच दिसत आहे. हिमनदीच्या शेवटी जमणाऱ्या खडकांच्या ढिगाऱ्याचा Terminal moraine माथा आमच्यावर २००–२५० फुटावर आहे. आम्हाला तेथे गेले पाहिजे म्हणजे कल्पना येईल. "We have to go up there" मी लोपसांगला सांगतो. आम्ही चढू लागतो. आता थोड्याच वेळात आमच्या मोहिमेच्या यशापयशाची शक्यता आम्हाला समजेल. लोपसांग सर्वांत पुढे आहे. ह्या उतारावरून वर चढणारे आम्ही पहिलेच आहोत. कल्पना सुंदर आहे. मीरवान व कुंदन आमच्याबरोबर रहातात.

आमची चाल मंदावली आहे. आता आमची उंची १५००० फुटापेक्षा जास्त निश्चित असणार. माझ्यावर उंचीचा मुळीच परिणाम झालेला नाही. माळींवर पण दिसत नाही. किंबहुना काही वेळेला माझ्यापेक्षा त्यांचीच तब्येत उत्तम आहे असे वाटते. माझ्यापेक्षा ते जरा जलद पण चढतात.

आता आम्ही माथ्याच्या जवळ आलो. समोर एका खडकावर लोपसांग बसलेला मला दिसतो. आमची चाहूल लागताच तो मागे वळून पहातो व हसतो. आणि समोर बोट दाखवितो, हनुमानकडे.

शेवटच्या चढानंतर मी धापा टाकीत आहे. लोपसांगच्या शेजारीच मी बसतो व समोर नजर टाकतो आणि माझ्या मनातील सर्व शंका एकदम नाहीशा होतात. आमच्या अगदी समोर हनुमानच्या शिखरापर्यंत जाणारी ridge आहे. ती बर्फाच्छादित आहे. पांढरीशुभ्र दिसते. डाव्या बाजूला स्कॅटिश ridge आहे. ती बर्फाच्छादित ridge ला मिळते. तेथे सरळ कडा आहे. ह्याच कड्यामुळे त्यांना परत फिरावे लागले. आमच्या व त्या बर्फाच्छादित ridge मध्ये हिमनदी आहे. फारशी कठीण दिसत नाही. त्यात गिर्यारोहकांचा मार्ग रोखणाऱ्या भेगा दिसत नाहीत. फक्त खडक व बर्फ. वर भुसभुशीत व त्याच्याखाली दगडासारखा कठीण बर्फ...हे सर्व ओलांडून आम्ही त्या ridge वर पोहोचू. ती सरळ शिखरापर्यंत जाते. चढ फारसा कठीण वाटत नाही. अगदी शिखराजवळ दिसणारी एक घळ सोडली तर काहीच तांत्रिक अडचणी दिसत नाहीत.

मी नकाशा व होकायंत्र काढतो. खरे म्हणजे त्यांची आता मुळीच जरुरी नाही. पण खात्री करून घेतो. " So how is our route ? " मी लोपसांगला विचारतो. " It seems to be easy. We should succeed in a week. " मो उत्तर देतो. " How different in this side from the Western face ?" मी म्हटले. " It is always like this in Himalaya. The Western faces are steep, the Estern ridges are easy. "

" Where shall we have our Camp 1 ?" माळी विचारतात. समोरच्या बर्फावर बोट दाखवीत लोपसांग " Why not over there ?" ' I think it will be allright " माळी म्हणाले. आमच्या Camp 1 ची जागा तर ठरली. आता १०-४० झाले आहेत. ३—३॥ तासात आम्ही येथे येऊन पोहोचलो. उंची सुमारे १६००० फूट असेल.

" I and Dorje will go a little ahead and have a look " लोपसांग म्हणतो. " आगर चाहते है तो आपभी आ सकते " पण आम्ही त्यांनाच जाऊ देतो. आम्हाला त्यांच्याइतके जलद जाता येणार नाही. येथून दुपारपर्यंत कॅम्पवर पोहोचले पाहिजे. कारण संध्याकाळ लवकर होते व त्याच वेळेला बर्फ पण पडावयास सुरुवात होते. ते निघतात. त्यांच्या हालचालीत सफाई व सहजता आहे. ह्या

अशा प्रकारच्या प्रदेशात इतक्या सफाईदारपणे व सहज चालणे वर्षानुवर्षांच्या सवयीनेच जमते. थोड्याच वेळात समोर बर्फावर दोन लहानसे काळे ठिपके हालताना दिसू लागतात.

आता ढग येऊ लागले. सूर्य ढगाच्या आड जाताच आम्ही थंडीने अक्षरश: कुडकुडतो. माझ्या अंगात वादळी कोटाच्या खाली फक्त एक N. C. C. ची जर्सी, शर्ट व गंजीफ्रॉक आहे. ती जर्सी खरे म्हणजे हिमालयासाठी नाहीच. पण मला तिच्यात बरे वाटते. आम्ही सिगारेट ओढीत त्या दोघांची वाट पहात बसतो.

आमची कॅम्प १ ची ही जागा अप्रतिम आहे. आसपास स्वर्गीय निसर्ग आहे. उत्तरेला द्रोणगिरी. त्याच्या उजवीकडे ती दोन आवळीजावळी शिखरे. नंतर चांगभांग व कलंका. पूर्वेला एखाद्या संरक्षक तटाप्रमाणे ऋषिकोटची भिंत. ह्या सर्व पर्वतावर बर्फ. सर्व शिखरे पांढरीशुभ्र आहेत. खालच्या पातळीवर मात्र मधून मधून काळे खडकही दिसतात. परंतु या खडकांच्या खाली पण त्यांच्यासारखेच कठीण बर्फ आहे. फक्त बर्फ व खडक. आता गवत देखील नाही. दूर अंतरावर दक्षिणेकडे देवीस्थान, त्रिशूळ व बथारटोली हिमालची शिखरे दिसतात, आणि पश्चिमेकडे आमचा हनुमान.– दोन खडकाळ दरडींच्या मधून, थेट शिखरापर्यंत जाणारी शेवटची बर्फाच्छादित पांढरीशुभ्र ridge एखाद्या प्रचंड प्राण्याच्या जिभे-प्रमाणे, आकाशात खुपशीत उभा आहे. या कॅम्पमधून चढाई करणारे आमचे पथक शिखरावर पोहोचेपर्यंत दिसू शकेल.

लोपसांग व दोरजे परत येतात. " This is the best approach " लोपसांग म्हणतो. आम्ही नकाशावरून ठरविलेलाच हा मार्ग आहे. आम्हाला बरे वाटते. ११॥ वाजले आहेत. आम्ही जेवणाचे डबे उघडतो. खाता खाता मी म्हणतो. " Can we not take our camp a little further ?" Then we will have an intermediate camp below this moraine " लोपसांगने उत्तर दिले. " This site is just at the right distance from the base camp. We need not shift the base camp. " दोन कँपमधील अंतर वेळात मोजणे श्रेयस्कर असते. कारण खालच्या कॅम्पवरून वरच्या कॅम्पमध्ये सामान पोहोचवून त्याच दिवशी संध्याकाळपूर्वी खालच्या कॅम्पवर परत जाता आले पाहिजे. तेसुद्धा कोणालाही. यासाठी safety margin भरपूर हवा. त्यादृष्टीने पहाता आमच्या दोन तळातील ३–३॥ तासाचे अंतर ठीक आहे. आम्हाला बरोबर सामान नसल्याने एवढा वेळ लागला. सामान पाठीवर घेऊन हमालांना ह्याच्यापेक्षा बराच जास्त वेळ लागेल. आमचा याच्यापुढचा कॅम्प म्हणजे कॅम्प २ आणखी १५००–२००० फूट आम्ही वर नेऊ शकलो तर सर्व ठीक होईल.

थंड झोंबरा वारा सुटला आहे. आकाश ढगांनी भरले आहे. आम्हाला परत फिरले पाहिजे. बरोबर आणलेले सामान मीरवानसिंग व कुंदन दगडाखाली घालून

ठेवतात. येथे सामान कोणी उचलून नेण्याचा प्रश्नच नाही. ह्या दरीत आमच्या शिवाय कोणीही नाही. बऱ्हाल आहेत. त्यांच्या जोड्या आमच्या कॅम्पपासून जवळच आम्ही पाहिल्या, पण ते येथे येणार नाहीत. भीती फक्त वादळ व बर्फाची. सामान दगडाखाली असल्याने वादळात उडून जाणार नाही. फक्त बर्फाखाली गाडले गेले तर शोधून काढावे लागेल एवढेच.

आम्ही अगदी सरळ बेसकॅम्पच्या दिशेने जाऊ लागतो. मीरवानसिंग व कुंदन रस्त्यात जागजागी खुणा करीत जातात. अगदी उभ्या उतारावरून देखील ते पळतच खाली जातात. मी व माळी आमच्या गतीने त्यांच्या पाठोपाठ जातो. माळी माझ्यापुढे आहेत. जेथून आम्हाला प्रथम हनुमान दिसला तेथे आम्ही येतो. जवळच प्रवाह आहे. लोपसांग खाली न जाता वर चढू लागतो. त्याला तोच आमचा पर्वत आहे याची खात्री करून घ्यायची आहे. पण मी त्याला सांगतो. " Don't worry, I am quite sure about our mountains " खरोखरच माझ्या मनात मुळीच शंका नव्हती.

आम्ही एक लॅन्डस्लाईड ओलांडीत आहोत. माळी जरा माझ्या पुढे आहेत. बाकी कोणीच मला दिसत नाहीत. आम्ही पलीकडे जातो. एका बारीकशा उंचवट्यामागे लोपसांग बसला आहे. तो आमच्यासाठी थांबला आहे. " Sir, you can smoke a cigarette " आम्हाला जरा विश्रांती मिळावी म्हणून तो सुचवितो. पण त्याची जरुरी नाही. खाली खोलवर मीरवानसिंगची छोटीशी आकृती दिसते. आम्ही खाली उतरू लागतो. " साब आप दोनो बहोत तगडे है " लोपसांग म्हणतो. आम्ही आमच्या बेस कॅम्पच्या जवळ आलो आहोत. मीरवान व कुंदन एव्हाना पोहोचले असणार. आकाश काळ्याकुट्ट ढगांनी भरले आहे. थंडी चांगलीच आहे. थोडेथोडे बर्फ पडू लागते. सर्वजण तळावर आमची वाट पहात आहेत. १-४५ वाजता आम्ही कॅम्पवर पोहोचलो. चहा तयार आहे. दोन तासातच आम्ही येथे येऊन पोहोचलो.

" Camp 1 is established " मी अभिमानाने जाहीर करतो. " Venkie you can send this news. " तो आमच्या मोहिमेचा कार्यवाह आहे. मुख्य तळ गाठल्याची बातमी त्याने अगोदरच हमालांबरोबर पाठविली आहे. आम्ही सर्व फार खुशीत आहोत. पण आता जास्तच बर्फ पडू लागले. आम्ही सर्व नऊच्या नऊ. आमच्या Conference tent मध्ये घुसतो. लोपसांग पण येतो, पण तो तंबूच्या कडेवर बसतो. आत येत नाही.

आता पुढील योजनेचा विचार सुरू होतो. उद्याचा दिवस विश्रांतीचा. सात दिवस सारखे काम केल्यानंतर एक दिवसाची सुटी मला हवीशी वाटते. पण उद्या काही हमालांना सामान वर ठेवून येता येईल. परवा आमच्यापैकी काही वरच्या तळावर मुक्कामाला जातील. वर कोणी कोणी जावे ? उद्या Camp 1 ला जाणाऱ्या

सदस्यांना परवा त्यांच्या वरच्या म्हणजे Camp 2 ची जागा शोधण्यासाठी पुढे जावे लागेल. शेवटी मी, लोपसांग, दोरजे, प्रकाश, देसाई व अरोरा यांनी जावे असे ठरते. बहादूर व कुंदन पण येतील. उरलेले सर्व सदस्य दुसऱ्या दिवशी म्हणजे सात जूनला वर येतील, त्यावेळेस ह्या कॅम्पमध्ये फक्त हमालच उरतील. परवा वर नेण्याच्या सामानाचे बोजे उद्या तयार केले पाहिजेत. उद्या सुटी असली तरी कॅम्प-मध्ये भरपूर काम आहे.

" अच्छा Sir " लोपसांग म्हणतो व जातो.

आता बर्फ अधिकच जोरात पडू लागले आहे. तंबूवर भराभर थर जमू लागले. आम्ही आतून धवाधव बुक्के मारून ते खाली पाडतो. नाहीतर त्याच्या ओझ्याने तंबूचे दोर ढिले होतात. सर्वांनी सिगरेटस् पेटविल्या आहेत. अरे, ॲश् ट्रे हवा ! कोणीतरी अरोराची जेवणाची ताटली देतो. अरोरा सिगारेट ओढीत नाही. थंडी वाढली आहे. सर्वांना कॉफी हवी आहे. "कुंदऽऽन" घरत ओरडतो 'आया साब' कुंदन ओरडतो. डोक्यावर पांघरूण घेऊन तबूच्या दाराशी येतो. "अच्छा कॉफी बनाव सबके लिये." त्याला सांगण्यात येते.

बहादूर व कुंदन खरोखर आमची उत्तम सेवा करीत आहेत. ते आमच्या बाटल्या व पिण्याचे पेले त्यांच्याजवळच ठेवतात, व धुऊन जेवणाच्या वेळी आम्हाला देतात. कुठल्याही कामाला नाही म्हणत नाहीत. प्रत्येक प्रश्नाला 'हां साब' 'जी साब' हे त्यांचे ठरलेले उत्तर. वर सदा हसतमुख. आमच्या गप्पात व थट्टा-मस्करीत पण भाग घेतात. एवढे सर्व करून स्वतःच्या वाटेचा पूर्ण बोजा पण उचलतात.

कॉफी व बिस्किटे येतात. "लोपसांग और दोरजे, साब कु दिया की नही ?" आम्ही विचारतो. "हा साब उनकू पहिलेही दिया" कुंदन सांगतो. कॉफी नंतर कोणाला तरी हुक्क्याची आठवण येते. मग मीरवानसिंगला तो आणण्याची सूचना मिळते. थोड्याच वेळात तो हुक्का पेटवून आणतो. पाळीपाळीने सर्व ओढतात. त्र्यंकी पण चांगलाच ओढायला शिकला आहे. मला मात्र सिगरेटच बरी वाटते. पण घरत माझ्या मागे लागतो, "The leader must lead every where" तो म्हणतो.

बर्फ अजून पडतच आहे. बाहेर राहिलेले काही बूट बर्फात गाडले गेले आहेत. तंबूच्या तोंडाशीच प्रकाश बसला आहे. तो तंबूच्या दाराचा पडदा जरा वर करतो. बाहेर एक अप्रतिम देखावा दिसतो. आसपास सर्व पांढरेशुभ्र आहे. खडक पण बर्फाने झाकले गेले आहेत. समोरच्याच डॉक्टरांच्या तंबूवर बर्फच बर्फ आहे. पांढराशुभ्र तंबूच्या आकाराचा बर्फ दिसत आहे. बर्फाच्या भाराने तंबू वाकला आहे. जमीनीत खोचलेल्या दोन कुऱ्हाडी बर्फाने झाकल्यामुळे पांढऱ्याशुभ्र दिसत आहेत. आसपासचे पर्वत दिसेनासे झाले आहेत. अजून बर्फ पडतच आहे. आम्ही तंबूतूनच फोटो काढले.

दुपारचे ४ वाजून गेले आहेत. प्रकाश पुन्हा तंबूचे दार वर करतो. थोड्याच अंतरावर ओझ्याखाली वाकलेली व बर्फाने आच्छादलेली मानवी आकृती दिसते. अंगावरच्या कपड्यावर बर्फ व पाठीवरच्या ओझ्यावर पण बर्फ आहे. बर्फ पडतच आहे. आम्ही सर्व उठून बसतो. तंबूचे दार आता पूर्ण उघडले आहे. काही हमाल आले आहेत. काल परत गेलेले ते निश्चित नव्हते. ते देवडीवरचे सामान घेऊन उद्या येथे येतील. दुराशीला राहिलेले सामान आणण्यासाठी देवडीहून पाठविलेले हे हमाल आहेत. आज सकाळी ते देवडीहून निघाले व रस्त्यात त्यांना बर्फाने गाठले. गरीब बापडे. त्यांचे फारच हाल झाले असणार. वाट, विशेषतः शेवटला भाग तर फारच कठीण आहे. बरेच सामान त्यांनी शेवटल्या लँडस्लाईडच्या खालीच ठेवले व वर आले. काही हरकत नाही. ते सर्व सुखरूप आले हे पुष्कळ झाले. येथे त्यांना धड निवारा पण नाही. अजून बर्फ पडतच आहे. आम्ही आणलेली ताडपत्री त्यांना झोपण्यासाठी निवारा करायला दिली आहे. आणखी एक तंबू. "त्यांना ताबडतोब चहा व बिस्किटे दिली पाहिजेत" माळी म्हणतात. लागलीच बहादूरला सूचना मिळते.

५॥ वाजले तरी आम्ही अजून तंबूतच आहोत. बर्फ पडतच आहे. आम्ही हवामान वृत्त ऐकतो. तो रोजचाच कार्यक्रम आहे. प्रकाश एक फूटपट्टी घेऊन बर्फात खुपसतो. ती ६ इंच आत जाते. "आज सहा इंच बर्फ पडले – आमचा निर्णय. देसाई त्याला थर्मामिटर देतात. ते पण तो बर्फात खुपसतो.

आता बर्फ जवळजवळ थांबले आहे. लहान लहान पुंजके तरंगत खाली येतात. ६ वाजले आहेत. शेवटी बर्फ थांबते. आसपासचे पर्वत दिसू लागतात. सूर्य पण बाहेर येतो. ताज्या बर्फावर त्याची किरणे चमकतात. आमचे एकेक सदस्य बाहेर पडू लागतात. घरत रोजच्याप्रमाणे सूप करण्यासाठी स्वयंपाकघराकडे वळतात.

मी आळशीपणे तंबूतच बसून रहातो. अरोरा व देसाई पण आहेत. आम्ही गप्प पडून राहतो. बाहेर इतरांचे आवाज ऐकू येतात. पण मला बाहेर जावेसे वाटत नाही. मी आल्यापासून बूट काढले पण नाहीत. आतापर्यंत तसाच बसून आहे. एकाएकी बाहेरून आरोरा येतात. "अरेऽवा" "सुंदर" "Fantastic" वगैरे. आता मात्र मला आत बसवत नाही. मी बाहेर पडतो.

बाहेरचे दृश्य अवर्णनीय आहे. जिकडे तिकडे पांढरेशुभ्र बर्फ. समोरच्या ऋषि कोटच्या भिंतीवर काळे पांढरे ठिपके दिसत आहेत. चांगभांग तर फारच सुंदर दिसत आहे. मावळत्या सूर्याच्या सोनेरी किरणात तो पिवळा–नारिंगी चकाकत आहे. त्याच्या टोकदार शिखरावरून निघणारी वाफ पण सूर्यकिरणात सोनेरी तांबूस दिसते. खरोखर स्वर्गीय दृश्य आहे. फारच सुंदर! आमच्या दक्षिणेला पण त्रिशूळचे शिखर सूर्यकिरणात न्हाऊन निघाले आहे. त्याचप्रमाणे ऋषिकोटचा माथा पण. मावळत्या सूर्यकिरणांनी ह्या पर्वतांच्या माथ्यांना जणू आगच लावली आहे.

आता सूप तयार झाले आहे. चुलीभोवती बसून आम्ही गरम गरम सूपचे घोट घेतो. आज पाणी आणायला जाण्याची जरुरी नाही. आसपास भरपूर बर्फ आहे. तेच वितळवून पाणी करावयाचे. शिवाय हमालांना पाण्यासाठी प्रवाहावर पाठविणे धोक्याचे पण आहे. कारण बर्फ फारच आहे. थंडी पण.

आज आम्ही लवकर तंबूत जातो. प्रथम बर्फाने वाकलेले तंबू नीट करावे लागतात. मी व घरत एका तंबूत आहोत.

आता उद्याची काळजी नाही. आमच्या यशाच्या आशा दुणावल्या आहेत. झोप लवकर लागते.

## ३० मे

मी जागा आहे. कुंदनने चहा केव्हाच आणून दिला. पण मी पडून रहातो. आजचा दिवस विश्रांतीचा आहे. जरा उशिरा उठले तरी चालेल. पिशवी उबदार आहे. रात्रभरच्या शरीराच्या उबेने ती चांगलीच गरम होते. बाहेरची थंडी जाणवत नाही. बाहेरची थंडी असताना मजेदार उबेत पडून रहाण्याचे सुख मी अनुभवत आहे. पण कितीवेळ असे राहणार ? शेवटी तंबूच्या बाहेर यावेच लागते.

सूर्यकिरण चकाकत आहेत. पण कालचे बर्फ अजून वितळले नाही. सर्व तळ व आसपासचे उतार पांढरेशुभ्र आहेत. त्या पांढऱ्या पार्श्वभूमीवर आमचे, लाल, निळे व पिवळे तंबू सुदर दिसतात. भोवतालच्या उतारावरील बर्फावर सोनेरी सूर्य-किरण चमकतात.

सकाळचा नाष्टा करून हमाल रस्त्यात ठेवलेले सामान आणण्यासाठी जातात. आता आम्हालाही कामाला लागले पाहिजे. पुढच्या कॅम्पवर नेण्यासाठी बोजे तयार केले पाहिजेत. आता बोजांचे वजन कमी केले पाहिजे. या उंचीवर हमालांना पुन्हा पहिल्याइतकेच वजनदार बोजे पेलणार नाहीत.

प्रथम वर न्यावयाचे गिर्यारोहणाचे साहित्य. लोपसांग व दोरजे ते बाजूला काढतात. दोर, pitons, Caralines, तंबू. crampons म्हणजे बर्फातून चालताना बुटांना बांधावयाची १० – १२ खिळ्यांसारखी टोके असलेली बुटांच्याच आकाराची चौकट. प्रत्येकाच्या बुटाला ते बसवूनच पाहिले पाहिजेत. आम्ही प्रत्येकजण आपापल्या बुटांसाठी crampons शोधू लागतो. लोपसांग माझा बूट घेऊन त्याला बरोबर बसणारी जोडी शोधून काढतो. शेवटी सर्वांना बुटासाठी crampons मिळतात.

आता केरोसीन व स्टोव्हची जरूर लागणार. वरच्या कॅम्पजवळ जळणाला लाकूड मिळणार नाही. आगपेटया व मेणबत्त्या. मेणबत्त्या तर अजून आम्ही वापरल्या पण नाहीत. हे सर्व साहित्य बाजूला काढल्यानंतर आता खाण्यापिण्याची तरतूद.

आम्ही सर्व खोके उघडतो. सगळे डबा बंद अन्न व इतर पदार्थ बाहेर काढतो. एकामागून एक खोके उघडले जातात. आमच्या समोर एक लहानसे दुकानच उभे रहाते. लोण्याच्या डब्यांच्या चळती, जॅमच्या बाटल्या, लोणची, चीज, पोहे, गूळ सर्व अगदी भरपूर आहे. सामान मागेपुढे राहिल्याने आम्हाला काही वापरताच आले नाही. पोहे काढावे म्हटले तर ते पुढे गेलेले असायचे किंवा मागे तरी राहिलेले असायचे. एवढे सगळे पदार्थ आम्ही संपविणार तरी कसे याचीच मला काळजी वाटू लागते.

सकाळचे ११ वाजले आहेत. उत्तम सर्यप्रकाश आहे. खाली ठेवलेले खोके घेऊन हमाल येतात. आणखी डबे. भेळीची दोन पाकिटे. आज संध्याकाळी एक वापरू या. मार्मलेड – जेवणाबरोबर चव पाहू या ! कोलबीचे डबे. उघडा आताच एक डबा, असे सारखे चालते. अरे – द्रव मसाला – वाळवलेली कोबी आजपासून वापरलीच पाहिजेत. घरत व देसाई ते ताब्यात घेतात व लागलीच चुलीजवळ कोबीच्या भाजीची तयारी सुरू होते. मसाल्याची बाटली उघडण्यासाठी देसाईंची झटापट पटकन् बूच उडते व निम्म्याच्या वर बाटली भाजीत रिकामी होते. अक्षरशः पेल्याने त्यांना भाजीतला मसाला काढावा लागतो. आजच्या जेवणात मसाल्याने सूड घेतला.

जेवणाच्या वेळेपर्यंत बोजे तयार झाले. बर्फ आता वितळले आहे. पण आम्हाला पाणी वहाताना दिसलेच नाही. ते खालच्या खाली जमिनीत शोषले गेले. जेवणानंतर आम्ही conference tent मध्ये आराम करतो. सर्वांचा सुटीचा मूड आहे. शिवाय आता आमची मोहीम यशस्वी होण्याची बरीच अशा आहे. दुपार केव्हाच निघून जाते.

नेहमीप्रमाणे दुपारी आकाशात ढग आले. ४ ते ६ बर्फ पडले. पण थोड्याच वेळात आकाश पुन्हा निरभ्र झाले. सूर्य पण ढगाआडून बाहेर आला. संध्याकाळ कालच्यासारखीच रम्य आहे. बर्फ कालच्यापेक्षा कमी पडल्याने सर्वजण मजेत कॅम्पच्या आसपास फेरफटका मारतात.

हळूहळू छाया दाटतात. आकाश स्वच्छ आहे. चंद्रोदय होतो. पौर्णिमा २ – ३ दिवसांवरच आहे. आज सुंदर चंद्रप्रकाश आहे. आसपासचे बर्फ व पर्वत चांदण्याने उजळून जातात. पण थंडी वाढली आहे. संध्याकाळचे जेवण चांदण्यातच होते. थोडावेळ चलीभोवती शेकत बसून आम्ही जरा लवकरच तंबूत परत जातो.

हमालांनी शेकोटी पेटविली आहे. आमच्या तंबत आम्हाला त्यांची गाणी ऐकू येतात. हनुमानने प्रसन्न व्हावे म्हणून त्याची स्तुती व प्रार्थना ते करीत आहेत. मधून मधून इतर देवांची पण नावे येतात. त्यांच्या गाण्याला ताल-सूर नसला तरी एक लय आहे. ह्या वातावरणात धुंदी आणायला ती पुरेशी आहे. त्यांच्या गाण्याचे सूर कानात घुमत असतानाच आम्हाला आमच्या पिशवीत झोप लागते. त्यांचे गाणे चालूच आहे. (क्रमशः)



# भिंतीच्या तुंबड्या

## सुंदर मी (लक्सने) होणार !

इंग्लंडमध्ये म्हणे असा एक कायदा करण्यात आला आहे की दुकानदाराने किंवा कारखानदाराने आपल्या मालाची जाहिरात करताना ती फसवणुकीच्या सदरात मोडण्याइतकी अतिरंजित असता कामा नये. आता काय म्हणावे या आचरट अपेक्षेला ? जाहिरातीतले मनोरंजन हेच तर आजकाल मुख्य मनोरंजन होऊन बसले आहे. आता माझीच गोष्ट घ्या. मी रोज लक्स टॉयलेट साबणाने आंघोळ करतो–कारण लक्स टॉयलेट साबणाने मी मीनाकुमारीसारखा सुंदर दिसेन अशी लक्सकर्त्यांनी मला गॅरंटी दिली आहे. पण माझ्या बायकोच्या मते मी " सुंदर ते ध्यान " या वर्गात मोडतो त्याला लक्स काय करणार, अन् मीनाकुमारी तरी काय करणार ? तरीही मला ही जाहिरात आवडते–कारण कधी तरी तिच्यातल्या फोटोत मीनाकुमारीऐवजी आपण झळकू अशी मला आशा आहे.

दुसऱ्या एका जाहिरातीत अतिरंजन व मनोरंजन यांचा सुवर्णसंगम सापडतो ती टूथपेस्टची. ९१$\frac{१}{३}$ टक्के लोक म्हणे कोलगेट टूथपेस्ट वापरतात, तर ९३$\frac{१}{२}$ टक्के लोक म्हणे मॅक्लीन्स वापरतात. आता अस्मादिकांचे गणित तसे पहिल्यापासूनच कच्चे, पण एकूण लोक फक्त शंभर टक्केच असतात असे मला वाटते. मग त्याच शंभरातले नव्वद लोक कोलगेट–कैवारी अन् नव्वद लोक मॅक्लीन्स–मित्र हे कसे काय असा मला नेहमी यक्षप्रश्न पडतो–अन् त्याचे उत्तर प्रत्यक्ष धर्मराजालाही एखाद्या अॅड्व्हरटायझिंग एजन्सीत कॉपी–राईटिंगचा अनुभव घेतल्याखेरीज देता येणार नाही याची मला खात्री आहे.

झोडियाक टायची जाहिरातही मला पहायला आवडते. त्यातला तो झोडियाक टाय लावलेला रुबाबदार माणूस मोठ्या दिमाखाने सुंदरींच्या घेरावमध्ये उभा राहिलेला पाहून मला वाटते–च्यायला ! एक टाय लावून डझनभर लावण्यलतिकांशी लग्गा लावता येत असेल तर आपण एका वेळी दोन दोन लावायला तयार आहोत–पण हाय ! आमची ही एक तारखेला माझा पगार कब्जात घेतल्यावर माझ्या हातावर रोज ऑफिसला निघताना बसचे पन्नास पैसे व दुपारच्या चहाचे पंचवीस पैसे मोजून ठेवते, तेव्हा आठ–दहा पोरींना गटविण्यासाठी लागणारी

आठ–दहा रुपयांची टाय कोठून परवडणार? त्यातून अमचा रुबाब अभवानेच तळपतो, त्याला झोडियाक तरी काय करणार?

## प्रेमाचा ट्रेनिंग कोर्स

गणित कसे करावे, फर्निचर कसे करावे, अन विमान कसे चालवावे येथपासून हॉटेल कसे चालवावे येथपर्यंत जवळ जवळ कोठलाही विषय हल्ली कोठल्याना कोठल्या शाळेत शिकायला मिळतो. पण आता या शिक्षणक्रमात एक अजब भर पडली आहे–युरोपात काही मानसशास्त्रज्ञांनी म्हणे मत्सर कसा करू नये हे शिकविणारी शाळा काढायचा बेत केला आहे. भले! रामायणाच्या काळी असली शाळा नव्हती हे नशीबच म्हणायचे, नाहीतर कैकेयीने घडविलेले रामायण घडलेच नसते. पण मला वाटते मत्सर न करण्याचे नकारात्मक शिक्षण देण्यापेक्षा प्रेम कसे करावे याचे पॉझिटिव्ह ट्रेनिंग देणारा सिलॅबस तयार झाला तर आजकाल दगडफेक अन् जाळपोळीत दंग झालेले विद्यार्थी नक्कीच मन लावून 'अभ्यास' करायला लागतील. आता या प्रेमाच्या अभ्यासक्रमाचा आराखडा काय बरे असू शकेल? माझ्यासारख्या प्रेम म्हणजे काय याचा पत्ता नसलेल्या सुखी संसारी इसमाला याची कल्पना येणे कठीणच, पण प्रयत्न करून पाहू या–

प्रेमाचे मानसशास्त्र: प्रेम हा बहुतेक प्रसंगी फक्त पन्नास टक्के भांडवलावर म्हणजे आतबट्ट्यात करावा लागणारा व्यवहार आहे हे ओळखून त्याप्रमाणे मनाला शिकवण देणारा धडा. प्रेमाचे वैद्यकशास्त्र. कॉलेज–कन्यकेपासून कारकुनिकेपर्यंत ती पाहताच बाला कलिजा कसा खलास झाला याची वैद्यकीय चिकित्सा. यात हल्ली फॅशनेबल झालेल्या हार्ट ट्रान्स्प्लांट ऑपरेशनने प्रेमाच्या साफल्याला किती मदत मिळू शकेल यावर एक परिच्छेद आवश्यक. प्रेमाचे भाषाशास्त्र: प्रेमाची भाषा शेर-भर मेघदूत, अदपाव गोविंदाग्रज अन् छटाकभर किंचित कवी मिळून तयार झालेली असते. रव्याच्या लाडूत रवा किती अन् खवा किती या बाबतीत सल्ला देणाऱ्या उषा वहिनींकडून साद्यंत शब्दप्रेमाची पाकक्रिया. प्रेमाचे अहारशास्त्र: प्रेमचि चटणी प्रेमचि भाकर हे दिवस जाऊन प्रेमचि हॉट् डॉग प्रेमचि हॅम्बर्गर असे दिवस आले आहेत, तेव्हा प्रेमाची कॅलरी व्हॅल्यू किती वाढली आहे याची न्यूट्रिशन चार्टच्या आधारे सचित्र माहिती.

–जाऊ द्या! आपले डोके गरगरायला लागले तेथे पाहिजे प्रेमवीराच्या जातीचे, येऱ्या गबाळ्या संसाऱ्याचे काम नोहे.

– सुधाकर राजे

### खानोलकरांचे तिरक्या चालीचे तरी पण बरेच सरळ जाणारे

# गुरु महाराज गुरु

पहिला अंक संपला तेव्हा आपण खुश होतो. दुसरा अंक संपल्यावर वाटले, ठीक आहे, चालले आहे ते काही तितके वाईट नाही. पण नाटक संपले, आणि लक्षात आले, साले हे वाटले तितके काही चांगले नाही. – खानोलकरांचे नवीन नाटक बघितल्यावर लगेच उमटलेली प्रतिक्रिया ही अशी होती.

खानोलकर काही सरळ चालीने चालणारे नाटककार नव्हेत. हे त्यांचे 'एक शून्य बाजीराव,' पाहिलेला कोणीही प्रेक्षक – (सुजाण, अजाण, कसाही) सांगू शकेल. 'गुरु महाराज गुरु' या आपल्या नवीन नाटकातही खानोलकरांनी ही तिरकी चाल कायम ठेवली आहे.

गुरुनाथ आणि केशव हे परमस्नेही. अनपेक्षित मिळालेले धन ट्रकच्या धंद्यात घालवून आणि कर्जाचा बोजा शिरावर घेऊन ही दुक्कल वावरत आहे. अनपेक्षितपणे गुरुनाथला एका यतीची कफनी मिळते. काणि कफनी अंगावर चढताच ड्रायव्हर गुरुनाथचा – 'गुरु महाराज' होतो. हा हा म्हणता भक्तगण गोळा होतो. आणि भक्तगणांच्या उपस्थितीत एका निवृत्त न्यायाधीशाच्या जीवनाची काळी बाजू गुरु महाराज उजेडात आणतात. त्या धक्क्याने न्यायाधीश आत्महत्या करतो. आणि त्याची बुद्धिवादी मुलगी सुमन गुरूची शिष्या बनते. हजर असलेल्या अनेक भक्तगणात कर्वेकाका हा निष्ठावंत भक्त तर सबनीस–भेंडे ही संधिसाधू दुक्कल कफनीचे रहस्य माहित असल्याने बुवाबाजीचा खरा लाभ उठवत असते.

देवीचा हात तोडल्याचा गावातील एका प्रतिष्ठित इसमावर आरोप असतो. सबनीस–भेंडेची जोडी या इसमाकडून लाच खाऊन गुरुमहाराजांकडून असत्य वदवण्याचा घाट घालते. या दुकलीकडून कफनी बदलली गेल्याने गुरुमहाराजांचा गुरुनाथ होतो. सामान्य गुरुनाथ न्यायदान करू शकत नाही आणि भक्तांच्या विश्वासाला तडा जातो. विषप्राशनाच्या दिव्याची कल्पना निघते. पट्टशिष्य कर्वेकाका आव्हान स्वीकारतो. तथापि त्याची तड लागण्यापूर्वीच कर्वेकाकूंचा आणि एका अश्राप बालकाचा जीव वाचवून गुरुनाथ मरण पावतो.

पारंपरीक दृष्टिकोनातून नाटक पहाणाऱ्या प्रेक्षकाला नाटक आवडणार नाही.

प्रयोगाची सुरुवात मोठी फक्कड झाली आहे. पहिल्या अंकाला गतीही समाधानकारक आहे. आणि घडणाऱ्या घटनांना काही प्रमाणात का होईना, सुसंवादित्व आहे. विशेष म्हणजे गुरुनाथच्या कफनीचे रहस्य प्रेक्षकांना समजल्याने नाटक कोणत्या पातळीवर फिरणार आहे याची थोडीशी कल्पनाही नाटककाराने दिली आहे.

गुरुनाथ आणि गुरुमहाराज ही एकाच माणसाची दोन रूपे दुसऱ्या अंकात अधिक काटेकोरपणे विभक्त होतात. बिचारा केशव – कफनीच्या रहस्याची कल्पना नसल्याने आपला मित्र बुवाबाजी करतो आहे; अशा भ्रमात वावरत असतो. या अंकाची खरी रंगत गुरुनाथ आणि सुमन यांच्या प्रवेशामध्ये आहे. प्रेयसीचे प्रियाराधन करणारा गुरुनाथ, आणि आपल्या आदर्शाचा चोळामोळा होत असलेला पाहून अस्वस्थ झालेली सुमन, यांचा हा प्रवेश अनेक दृष्टीने संस्मरणीय आहे. या उलट याच अंकातील नृत्य एकदम भंकस, आणि नाटकाचे स्वरुप बिघडवून टाकणारे आहे.

## तिसरा अंक – साफ निराशा

तिसरा अंक तर संपूर्ण निराशाजनक आहे. अश्राप बालकाचा जीव वाचवण्याचे आणि कर्वेकाकूंना जीवदान देण्याचे सामर्थ्य गुरुनाथच्या अंगी कोठून येते? गुरुनाथचा मृत्यू तर विलक्षण नाटकी व खोटा वाटतो. शोकांत नाटकाचा शेवट अपरिहार्य असेल, तरच ते नाटक परिणाम साधून जाते. येथे गुरुनाथ मरतो आणि त्याचा नकली मृत्यू प्रेक्षकाना अधिकच गोंधळात टाकतो. याच अंकात सुमनही परत येते – आणि येते ती गुरुनाथसाठी त्याचे दोष पोटात घालून त्याचा स्वीकार करण्याच्या तयारीने. सुमनच्या वर्तनातील हा बदलही न पटणारा आहे.

नाटकातील सर्वात कच्ची व्यक्तिरेखा सुमनची. पहिल्या अंकात प्रखर बुद्धिवादाचा आव आणणारी सुमन बापाच्या आयुष्यातील सत्य वेषीवर टांगले जाऊन त्याने आत्महत्या करताच गुरुमहाराजांची भगत बनते. 'माई' होऊन महाराजांची सेवा करू लागते आणि गुरुनाथचे खरे स्वरूप उघड होताच त्याच्यापासून कायमची दूर होते. आणि तिसऱ्या अंकात हीच सुमन पुन्हा आश्रमात येते, पण महाराजांकडे नव्हे तर गुरुनाथकडे, अगदी आपल्यासारख्या हाडामांसाच्या माणसाकडे. पहिल्या अंकातील सुमन घडीभर बाजूला ठेवली तरी दुसऱ्या अंकातील सुमन खरी समजायची का तिसऱ्या अंकातील? दुसऱ्या अंकातील सुमनचे वर्तन खरे मानले, तर नंतर येणारा बदल सुयोग्य वाटत नाही आणि तिचे अखेरचे रूप खरे मानले तर दुसऱ्या अंकात तिने स्वतःशीच प्रतारणा केली आहे असे मानावे लागेल.

नाटकाचा प्रयोग डॉ. श्रीराम लागू यांनी मोठा झक्क बसवला आहे. गुरुनाथची महत्त्वाची भूमिका ते जीव ओतून करतात. संवादफेकीचे त्यांचे सामर्थ्य दृष्ट लागावे असे आहे. या बाबतीत दत्ता भट आणि प्रा. तोरडमल या दोघांचीच त्यांच्याशी तुलना होऊ शकेल. अभिनयात मोकळेपणा, आणि आवाजात सामर्थ्य

असले तरी संवादातून व्यक्त होणारे भाव चेहऱ्यावर व्यक्त करण्यात हा नट थिटाच पडतो. विशेषत: त्यांच्या बाबतीत पहिल्या दोन बाजू प्रभावी असल्याने चेहऱ्यावरील भावव्यक्तीच्या बाबतीतील उणेपण प्रकर्षाने जाणवते.

सुमनला जेवढा न्याय देणे शक्य आहे तेवढा देण्याचा प्रामाणिक प्रयत्न सुलभा देशपांडे यांनी केला आहे. विनायक पै (कर्वेकाका) आणि जयवंत (केशव) यांच्या अभिनयकौशल्याचा उल्लेख करणे आवश्यक वाटते. नारायण पै आणि रमेश रणदिवे सबनीस-भेंडेच्या जोडीमध्ये ठीक वाटतात इतकेच. चांगल्या नटवर्गाला अक्षरश: गालबोट लावतात त्या कर्वेकाकू (प्रेमलता खांडके) आणि भिकार नृत्य करणारी तमासगिरीण.

दिग्दर्शक डॉ. लागू यांची नाटकावर घट्ट पकड असल्याचे स्पष्टपणे जाणवते. पहिल्या अंकातील भजनाचे, आणि शेवटच्या अंकातील गुरुमहाराजांवर रागावलेल्या भक्तगणांचे मॉब सिन्स त्यांनी फारच सुंदर बसवले आहेत. दुसऱ्या अंकातील काही कांपोझीशन्स अतिशय बोलकी आहेत. दुसऱ्या अंकात महाराजांचे वाढलेले प्रस्थ त्यांनी छोटासा बदल करून चांगल्या प्रकारे प्रस्थापित केले आहे. आणि विशेष म्हणजे रंगमंचावरील या बदलाच्या वैचारीक लेव्हलस् सुचवण्यासाठी त्यांनी यथार्थपणे उपयोग करून घेतला आहे. बहुतेक कलाकारांकडून हवे ते आणि हवे तेवढेच करून घेण्यात त्यांनी चांगले यश मिळवले आहे.

नेपथ्य प्रयोगाची गरज पूर्ण करणारे आणि प्रकाश, ध्वनी, पार्श्वसंगीत या पूरक बाजू समाधानकारक असल्याने प्रयोग रंगतो चांगला. पहिल्या अंकातील भजनांच्या उत्कृष्ट सिन्क्रोनायझिंगचा आवर्जून उल्लेख करणे आवश्यक वाटते.

मांडणीच्या विसंगतीतील उणीव, खानोलकर उत्कट संवाद देऊन भरून काढतात. 'गुरु महाराज गुरु' या नावावरून नाटक बुवाबाजीवर आहे असे वाटते. नाटकाच्या बाह्यात्कारी स्वरूपावरून तसे वाटत असले तरी नाटकाची झेप या विषयाचा आधार घेऊन त्या पलीकडे जाण्याची आहे. नाटकाला रिपीट ऑडीअन्स मिळणार नाही. कालेलकर-कोल्हटकर-बाबूराव गोखले यांचा प्रेक्षकही फारसा ओढला जाणार नाही. तथापि खानोलकर-लागूंचा सर्व प्रेक्षक जर नाटकाला मिळाला तर पन्नास पाऊणशेची संख्या गाठणे फारसे जड वाटू नये.

**– प्रतिनिधी**



दादूमिया

# दहेल्ली तब और अब

दिल्लीची राजधानीची शान प्राचीन काळापासून आहे. दिल्ली ही सत्ताधीशांच्या विलासाची कर्मभूमी आहे. अर्जुन आपले गांडीव धनुष्य घेऊन ौपदी व धर्मराजा एकांत करीत असताना त्यांचे व त्यांच्या राज्याचे संरक्षण येथेच (सध्याच्या पुराण्या किल्ल्यापाशी) करीत असे. राजपूतांचे स्व व परस्त्रियांवरून माजलेले कलह व त्यानंतर मुसलमान आक्रमकांनी त्या कलहाचे उठविलेले फायदे ह्या यमुनेच्या तीरावरच घेतले गेले. मोगलांनी दिल्ली, आग्रा व फत्तेपूर शिक्री येथे 'शृंगार कॉम्प्लेकस्'च जणू निर्माण करून ठेवला. ब्रिटीशांनी नवी दिल्ली त्यांच्या बाबू लोकांसाठी स्थापन केली. त्यामुळे नव्या दिल्लीत लोकसंख्या जवळजवळ नव्हतीच. ह्याच गोष्टीमुळे तरुण व वृद्ध इंग्रज अधिकाऱ्यांचे अगदी भर रस्त्यांवर चालणारे प्रणय या नव्या दिल्लीने पाहिलेले व पचविले आहेत. मायबाप सरकारचा दरारा एवढा मोठा होता की, साहेबाच्या प्रणयाविरुद्ध ब्र काढायची कोणाची हिंमत होती ?

गोरा साहेब गेला व दिल्लीत काळ्या साहेबाचे राज्य सुरू झाले. नेहरूंना " Last English ruler in India " असे थोड्याशा खोडसाळपणाने गोरे लोक म्हणत. याचे कारण संस्कारक्षम वयात नेहरू इंग्लंडमध्ये वाढले. ते स्वतःला संस्कृतीने मुस्लीम व शिक्षणाने ख्रिती म्हणवून घेत. अशी व्यक्ती महात्माजींपाशी इतके दिवस होती, तरीदेखील ती शेवटपर्यंत Semi-English राहिली असे सर्टीफिकेट खुद्द ब्रिटीश लेखकांनीच त्यांना दिले आहे. साहेबाने भारतावर दोनशे वर्षे राज्य केले. त्यामागे त्याच्यापाशी असलेले शिस्त, वक्तशीरपणा, आदब, वडिलांबद्दल आदर, स्वदेशनिष्ठा व सतत सचोटीने काम करण्याची दानत यासारखे गुण कारणीभत झाले होते हे विसरता कामा नये. गोऱ्या साहेबाचा विलासीपणा,

भारतीय लोकांच्या जिवावर चालणारा आपला थाटामाट व उधळपट्टी आणि सर्व क्षेत्रांतील हुकूमशाही हे दुर्गुण नेमके आमच्या नेटीव्ह काळचा साहेबाने उचलले। गुण उचलण्याचे काळचा साहेबांचे राहूनच गेले. त्यामुळेच की काय, काळचा साहेबांच्या हातून राज्यलक्ष्मी सध्या निसटण्याच्या मार्गावर आहे. हा पराजय साहेबाच्या भाषेत बोलायचे म्हणजे "of their own making" आहे. उगीच दुसऱ्यांना दूषण देत बसण्यात काय अर्थ आहे?

पण या काळचा साहेबांच्या गेल्या वीस वर्षांच्या राज्यात दिल्लीस वरचेवर भेट देणाऱ्या माझ्यासारख्या सामान्य पामराला 'दोन पिढीतील फरक' जाणवतो व वाईट वाटते. आज दिल्लीतील कोणाही जुन्या व्यक्तीस गाठून विचारलेत तर ती हेच सांगेल; "तब मजा थी अब सजा है।" नेहरूंचे परराष्ट्रीय धोरण चीनच्या व पाकिस्तानच्या बाबतीत भले चुकले असेल, त्यांची अर्थव्यवस्था भले आतून पोखरलेली होती, त्यांची शासनव्यवस्था भले मऊ होती, तरीही नेहरूंच्या काळी एक प्रकारची शान होती, जरब होती, दरारा होता. त्यांच्या सुकन्येच्या राज्यात बेशिस्त, बेदिली व बेकायदा व्यवहार उदंड मातला आहे. इतका की, त्याची शिसारी यावी. एका यंग तुर्कास हा फरक मी सांगितला. यंग तुर्क म्हणजे काँग्रेस-मधील हिप्पी. मोठ्या बेफिकीरीने त्याने उत्तर दिले, "तुमचे म्हणणे अगदी खरे आहे. आम्ही तरी निराळे काय म्हणत आहोत? राजकारणाचा सारा विचका या वुद्ढ्या लोकांनी करून सोडला आहे. तो आवरणे हे आता आमचे समाजवादी तरुणांचे काम आहे."

मी या हिप्पीस हात जोडले.

पण हात जोडून मनाचे समाधान होईना. ही हिप्पी "चुकून खरे तर सांगत नाही ना?" असा प्रश्न आतील आवाज हळूच मला विचारून सतावू लागला.

सत्य शोधण्यासाठी दोन्ही बाजू विचारात घ्याव्या लागतात असा एक संकेत आहे. अपवाद माओ व स्टालीनच्या राज्यात. ते लोक म्हणतील तेवढे सत्य, इतर सारे मिथ्या, असा खाक्या तेथे असतो.

पण मन विचारू लागले, सध्या दिल्लीत आणखी काय चालले आहे? इंदिरा म्हणल ते सत्य. बाकी साऱ्या गप्पा. दिल्लीतील पंजाब्यांच्या भाषेत बोलायचे झाल्यास 'क्या फर्क पडता है जी?'

आणि इंदिराबाई तर निजलिंगप्पाजींनाच हुकमशहा म्हणतात. यात खरे कोणते?

एक प्रकार मला प्रामुख्याने खटकला. नेहरू पंतप्रधान असताना काँग्रेसच्या प्रत्येक सभासदास नेहरूंचा प्रत्येक शब्द पटतच असे, असे नाही. तेव्हाही खडाजंगी चर्चा होई पण मतनोंदणीच्या वेळी सारे एकमताने नेहरूंना पाठिंबा देत. व्हीप् म्हणजे खरोखरचा शिस्तीचा चाबक (का बडगा?) होता. जेव्हा हा व्हीप् पाळणे कृपलानी वा लोहीया यांच्यासारख्या सभासदांना जड जाऊ लागले तेव्हा

त्यांनी सोशॅलीस्ट पार्टीची वेगळी चूल थाटली.

आजचा काँग्रेस पक्ष व त्याच्या प्रमुख इंदिराबाई! लोकसभेत गेल्यावर कॉमिक् चित्र दिसते. विशेषत: मोरारजी, पाटील, अशोक मेहता, निजलिंगप्पा जेव्हा मधोक, वाजपाई, पिलू मोदी यांच्या मांडीला मांडी लावून समोर विरोधकांच्या बाकड्यावर बसतात तेव्हा मनात कुठेतरी खटकते, अर्थात मौज देखील वाटते. काँग्रेस यावच्चंद्रदिवाकरौ रहावी असे माझे जराही मत नाही. दिल्लीत माझी सर्वात करमणूक झाली ती राज्यसभेत या खेपेच्या पहिल्या बैठकीत. राज्यसभा म्हणजे वयोवृद्ध व ज्ञानवृद्ध अशी माझी समजूत. पण तेथील सदस्यांची पोरकट व टवाळ वागणूक पाहून माझे मन उद्विग्न झाले. 'आम्हाला वेगळे व्हायचे आहे' ही काँग्रेसच्या सिंडीकेट गटाची भावना एक वेळ समजू शकेल पण त्यासाठी गोंधळ, आरडाओरड व जमिनीवर बसणे कशाला? राज्यसभेच्या बैठका बघून झाल्यावर माझ्या मनात आले, 'या वृद्धांचा रोग कॉलेजांतील तरुणांना लागला आहे का तरुणांचा रोग या वृद्ध सभासदांना लागला आहे?'

तेथील बेशिस्त पाहून हुकूमशाहीची आठवण होते. पूर्वी पुण्यात बेशिस्त मुलांना लवाटचांच्या हॉस्टेलात दाखल करीत. आमच्या बेशिस्त खासदारांना व त्यांच्या इतर भक्तजनांना सरळ करण्यासाठी हुकुमशाहीचीच जरूर आहे. मी माझे विचार एका दोघा मोठ्या पुढाऱ्यांना ऐकविले. ताडकन् उत्तर आले, "म्हणजे पुन्हा पार्शीच! सेम् मानेकशाहा! We'll not entertain any non-Hindu chief any more!"

मला पुन्हा धडकी भरली.

राजधानीत प्रांतीयवाद, पंथवाद व जातीयवाद यांनी धुमाकूळ घातला आहे. शिवसेनेस शिव्या देणाऱ्या एका उत्तर प्रदेशी खासदार ने मला रागाने सांगितले, "तुमच्या मुंबईसच साऊथ इंडियन्स् वाढले आहेत असे नाही आमच्या कानपूर, लखनौ वगैरे ठिकाणी असलेल्या पब्लीक सेक्टर्समधून त्यांनी योजनाबद्ध 'इन्व्हेजन्' चालविले आहे. आय वुड् लाईक् टू इन्व्हाईट युवर ठाकरे टु ओपन् ए ब्रांच ऑफीस ॲट कानपूर."

"बट व्हाय नॉट हॅव युवर ओन ठाकरे देअर?"

त्यांचा युक्तिवाद सरळ होता. "महाराष्ट्राचे नाव आधीच संकुचितवादी व प्रांतीयवादी म्हणून खराब झाले आहे. आमच्या लीडरशीपने तसला दरारा नाही निर्माण होत! साला, युवर टाकरे कॅन शट ऑल्सो!"

महाराष्ट्राचे हिंसावादी व प्रांतीयवादी म्हणून खराब नाव दिल्लीत सुधारावे अशी दुर्दैवाने महाराष्ट्र सरकारची मात्र इच्छा नाही. शिवसेना व महाराष्ट्र सरकाराविरुद्ध ही दाक्षिणात्य बाब मडळी रोज नवीन गोष्ट तयार करून ती फैलावण्यात वाकबगार झाली आहेत, आणि सेक्रेटरीएट त्यांचेच असल्यामुळे ह्या

अफवा फैलावण्यास जास्तीत जास्त दोन दिवस लागतात. यावर महाराष्ट्र सरकारने उपाय कोणता योजावा ? महाराष्ट्र इन्फर्मेशन सेंटरच्या अत्यंत उत्साही व अभ्यासू अशा भा. कृ. केळकर नावाच्या चिटणीसांना बदलून त्यांच्या जागी श्री. माथूर यांना महाराष्ट्र सरकारने नेमले आहे !

यशवंतराव दिल्लीस आल्यामुळे काही वाईट गोष्टी झाल्या असतील तर त्यातील प्रमुख ही होय. यशवंतरावांना ' राईट मॅन् फॉर द राईट प्लेस ' हे धोरण सुदैवाने चांगले ठाऊक होते. म्हणून मंत्री निरक्षर असला तरी त्याचा चिटणीस अनुभवाच्या बाबतीत राक्षस असावा एवढी खबरदारी ते घेत.

दिल्लीत तुम्ही कोठेही जा – सुप्रीम कोर्ट, साऊथ अॅव्हेन्यू, नॉर्थ अॅव्हेन्यू, उद्योग भवन किंवा कृषी भवन – सर्वत्र प्रांतीयवादी गट ठळकपणाने दिसून येतील. आश्चर्य वाटेल, पण एम. पीज्. च्या साऊथ अॅव्हेन्यूतील कॅंटीनमधील सारेच्या सारे कर्मचारी (म्हणजे नोकर ! ) साऊथ इंडियन आहेत ! विनोदाने लोक कुजबुजतात, हे कर्मचारी केरळ कम्युनिस्ट खासदारांना बिल कमी आकारतात !

प्रांतीयवादाची, जातीयवादाची किंवा पंथवादाची दिल्लीतील ठिकठिकाणची किती उदाहरणे देऊ ? आणि हे वाद अगदी थेट वरून खालपर्यंत माजलेले दिसतात. लाल बहादूर शास्त्री दिल्लीत पंतप्रधान झाले व त्यांचे सेक्रेटरीएट एकजात कायस्थांनी भरून गेले. बिर्लाजींचा जोर त्या वेळी वाढीस लागला. सचीन चौधरी हा बिर्लाजींचा माणूस नेमका त्यावेळी अर्थमंत्री झाला ! बिर्लाजींचे ' रडर सेट्स् ' खात्याखात्यात लावले गेले. आज ' समाजवादी ' इंदिराबाईंना ही जुनी शासकीय व्यवस्था बदलून घेणे या लोकशाहीच्या जमान्यात अशक्य आहे !

हे वाद व त्या जोडीला खाण्याची प्रवृत्ती ! दिल्लीत आज याचे राज्य आहे. इंदिरापुत्राने गाडी जोडून तयार केली व ती लौकरच बाजारात येईल एवढी बातमी बाहेर आली. लगेच अॅंबॅसेडर, स्टॅंडर्ड व फियाट यांचे भाव एकदम अवाच्यासवा वधारले.

तडजोडवाद हा तर गांधीजींनी दिल्लीत मागे ठेवून दिलेला त्यांचा वारस होय. लगेच विचारमंत्रणा सुरू झाली. या इतर गाड्यांचे भाव आपल्या गाडीच्या दुप्पट असल्याशिवाय आपल्या गाडीस ' बेबी कार ' कोण म्हणणार ? समाजवादी आईच्या भांडवलदार मुलाचा ' मोनोपोली बिझनेस इन् ऑटोज् ' तोडून टाकण्यासाठी काही साम्यवादी सभासदांनी आत्तापासूनच कंबरा कसल्या आहेत. पण तेही तडजोड करतील.

इंदिराजींनी गेल्या चार महिन्यात राजधानीत गैरशिस्तीचे जे प्रकार चालविले आहेत त्याने कॉंग्रेस पक्षास जास्तीत जास्त नुकसान पोचलेले आहे. इंदिराबाई कम्युनिस्ट नाहीत हे त्यांनी भारतात व त्यांच्या मागील अमेरिकेच्या दौऱ्यात पुन्हा पुन्हा सांगितले आहे. पण त्यांची विधाने व त्यांच्या साम्यवादी युक्त्या (स्ट्रॅटेजीज्) – त्यांच्या साथीदारांच्या पाठीत वार; संस्थेच्या मुळावर प्रहार; खास विश्वासातील सभासदांचे वस्त्रहरण; स्वतःचे बहुमत झाल्यास एक न्याय व

अल्पमत झाल्यास दुसराच न्याय; सत्तेवर असताना एक पण प्रत्यक्ष संस्थेसाठी दुसरी मापपट्टी; चांगले झाले तर स्वतःकडे कर्तृत्वाचे यश व वाईट झाले तर दुसऱ्यांच्या डोक्यावर दोषाचे खापर फोडण्याची तयारी; स्वतःची विधाने व प्रत्यक्ष व्यवहार यांच्यात दोन ध्रुवांचे अंतर; सूत्रे व विधाने यांच्यातील सतत बदला-बदल; साम्यवाद्यांना सत्तेतील भागीदारी द्यायची तयारी पण 'मी कम्युनिस्ट नाही' ही सतत घोषणा; साम्यवाद्यांच्या पाठिंब्यावर जिवंत रहायची तयारी, मात्र निजलिंगप्पांनी तसे म्हटले तर त्याचा ताबडतोब इन्कार – यांच्यामुळे इंदिराजी काँग्रेस पक्षात जास्त जास्त एकट्या पडू लागल्या आहेत.

ही एका दृष्टीने स्वागतार्ह बाब आहे. इंग्लंड-अमेरिकेसारख्या मुरलेल्या लोकशाहीत मतदार आपापसात म्हणतात, 'Let us educate our masters.' अमेरिकेत तर अध्यक्ष चारच वर्षे सत्तेवर असतो. सावध व जागृत मतदार असल्यावर अध्यक्ष व त्यांचा पक्ष लोकांच्याविरुद्ध जाऊन मनास वाटेल तसे वर्तन करेल हे पूर्णपणे असंभाव्य आहे. पण दिल्ली व भारत येथील मतदार ! नाव काढू नका मी ओळखीच्या खासदारांना पुन्हापुन्हा हा प्रश्न विचारला, "Does the voter exist ?" मतदाराचे अस्तित्वच जेथे नाही तेथे कसले आले आहे 'educate the master'चे धोरण ! इंदिराबाईंना म्हणे ९५ टक्के जनतेचा पाठिंबा आहे, त्यांचा म्हणे समाजवादावर पूर्णपणे भरवसा आहे – एक न् दोन, राजधानीत त्यांच्या आवडीनिवडीची रोज एवढी जाहीरात करण्यात येते की सामान्य अज्ञ व मूर्ख माणसाला त्यांच्याविषयी देवतेसमान आदरभाव निर्माण व्हावा.

'Let us educate our master'च्या पाठीमागे विरोधी पक्षांच्या पुढाऱ्यांवर फार मोठी जबाबदारी असते. गेल्या निवडणुकीत नऊ बिगर-काँग्रेसी राज्य सरकारे अस्तित्वात आली त्यावेळेस जाणत्यांना जागृत मतदार व कर्तव्यनिष्ठ विरोधी पुढारी यांच्याविषयी भलताच आदर वाटू लागला, व त्यांच्याविषयी अपेक्षा व आशा भलत्याच उंचावल्या. कारण लोकशाहीचे खरे बळ विरोधी पक्षावर अवलंबून असते. नेहरूंच्या कारकीर्दीत नेहरूंनी विरोधकांच्या शिडातील हवा काढून घेतली व त्यांना निष्प्रभ केले. तेव्हापासून हे विरोधी झाड नीट मूळच घेत नाही. आमच्या देशाचे दुर्दैव हे आहे की काँग्रेसपक्षाप्रमाणेच विरोधी पक्षांनीदेखील मतदारांचा विश्वासघात केला आहे. स्वतंत्रांपासून साम्यवादी खासदारांपर्यंत भेटेल त्याला मी माझे मत सुनावीत गेलो. प्रत्येकाने सांगितले, "आप जो कहते हो वो सही है लेकिन क्या करे? मजबूर है –"

"क्यूं जी, क्या बात है ?"

"काँग्रेन पक्षाने सत्तेच्या मार्गाने सेवा हा जो अजब प्रकार आपल्या देशात घालून दिला आहे तो बदलणे जवळजवळ अशक्य आहे. आम्हाला जनतेची सेवा करायची झाल्यास त्याच मार्गाने जावे लागते. ही दुर्दैवी पण सत्य हकीगत आहे.

आणि सत्ता आली की तिची लफडी आली. आणि लफडी म्हटली की कुठले शुद्ध मार्ग व सत्यदर्शन ?"

"पण सत्तेशिवाय नुसती जनतेची सेवा करणे काय अशक्य आहे ?"

"आप समझते क्यूं नही हो ? जनतेला सेवा म्हणजे काय पाहिजे आहे अशी तुमची समजूत आहे ? जनतेच्या अपेक्षा मोठ्या नाहीत. कोणास नोकरी, कोणास चाकरी, कोणास व्हिसा, कोणास लायसेन्स्–पण त्यासाठी सत्ता पाहिजे ना आपल्या हातात, मिस्टर ?"

"पण केवळ सेवा –"

"आम्हाला या बाबतीत त्यागी गांधीवाद पसंत नाही. नुसती सेवा करणे, गद्धेमजुरी करणे व बोनस म्हणून जनतेच्या शिव्या खाणे. त्यात फायदा काय ? आणि विशेषतः इतर साले आरामात राहून फुकट मजा मारताना आम्ही पाहत आहोत. तरी-सुद्धा आम्ही सेवा करीत आत्महत्येच्या मार्गाने जावे असे का तुमचे म्हणणे आहे ?"

हिंदुमहासभाभवनात एकदा बाळाराव सावरकर भेटले व दुसऱ्यांदा गेलो तेव्हा हिंदुसभेचे सरचिटणीस भिडे भेटले. मराठी माणूस भेटला की मनास आनंद होतोच. त्यांनी खास पुरणपोळीची ऑर्डर देववून दिवाळी साजरी केली ! भिडयांना विरोधकांचे हे म्हणणे मी सांगताच ते म्हणाले, "सावरकरांचेदेखील सांगणे हेच होते. या निवडणुका, त्यांचे खर्च, त्यांच्यामागील सत्ताभिलाषा–हे सारे हिंदु-सभेने टाळावे व फक्त जनसेवेचे व्रत सांभाळावे. त्यांचे म्हणणे खरे होते. पूर्वीच्या ब्राह्मणांनी हा हव्यास जर ठेवला असता तर हिंदू समाज उभा राहिला असता का ? गुरूने आधी गुरुदक्षिणा टाक मग मी शिकवेन, किंवा आम्ही सेवा करावी फुकटात, ते क्षत्रिय पहा दहा बायका करतात व मजा मारतात, किंवा ते वैश्य पहा, कसे पैसे साठवून आराम करतात, असे म्हटले असते तर ? आता जुन्या जाती नकोत, जुनी बंधनेही नकोत, फक्त आरामाच्या गप्पा हव्यात–मार्क्सने सांगून ठेवलेच आहे की, कलीयुगात अर्थ हा साऱ्या संसाराचा मध्यबिंदु आहे."

"पण सेवा –"

"सोडा, डॉक्टरसाहेब, हल्ली सेवा फक्त बोलण्यापुरती राहिली आहे. कोणी सेवाबिवा करीत नाही !"

भिडयांचे म्हणणे खोटे नाही. "आपको क्या सेवा कर सकता हुं ?" किंवा "मेरे लायक कुछ कामकाज ?" ही दोन वाक्ये मी खासदार व मंत्री यांच्या तोंडून इतके वेळा ऐकली की त्याचा मला वीट आला आहे.

कितीजणांना भोगाचे डोहाळे लागावे ? लेकाचे किती दारू पितात म्हणून सांगू ? जणू साऱ्यांच्या मीन राशी ! मासा पाण्यात तरंगतो, हे लोक दारूत, एवढाच फरक. फुकट प्यायला मिळते म्हणून अमेरिका, रशिया, जर्मनी, यु. के. यांच्या एंबसींनी दिलेल्या पार्टींना ही गर्दी ! अशा व 'फ्री ड्रिंक्स'साठी पुन्हा तेथे जाऊन वडवडायची यांची तयारी खरी ! प्रोफेसर गाल्ब्रेथ दिल्लीत राजदूत

असताना एक केंद्रीय मंत्री त्यांना सारखा म्हणे, ' मला तुम्ही संरक्षण मंत्री बनवा ना. मग मी अमेरिका सांगेल त्याप्रमाणे संरक्षण धोरण आखेन ! ' वा: रे केंद्रीय मंत्री !

दिल्लीत एवढा अफाट पैसा कोठून येतो तेच मला कळत नाही. पैसा मिळविण्यासाठी काही कष्ट; तर केले पाहिजेत की नाही ? पण पहावे तर काही खासदार त्यांच्या घराच्या बाहेर पाऊलदेखील टाकीत नाहीत. आठवडेच्या आठवडे ! काय उद्योग करत असतील हे लोक पैसा मिळविण्यासाठी हे कोडे मला शेवटपर्यंत काही कळले नाही. आणि दरमहा पाचशे रुपये मिळविणाऱ्या या खासदारांचे खर्च पहावे तर महिन्याला दहा दहा हजार रुपये ! जणू नवाबजादे ! दोन दोन मोटारी दिमतीला – एक स्वतःला व दुसरी मेमसाहेबांसाठी शॉपिंग करायला ! तेवढे एकच काम असते, कारण त्यांची दुसरी सारी कामे नोकर करतात.

मग हा पैसा येतो कोठून ? हे लोक दरोडे घालताना तर दिसत नाहीत. बिझीनेस ? त्यासाठी डोके लागते. तेही यांच्याजवळ अभावानेच दिसते. मग काय हे लोक लाचलुचपतीवर जगतात ? ही लाच यांना देते कोण ? लाच देणारे स्वदेशस्थ का परदेशस्थ ? आणि ती का म्हणून ? यांच्यात एवढे मोठे कोणते गुण लागून गेले आहेत की ..................

एका नबावजाद्यास मी असल्या यक्षप्रश्नांनी भंडावून सोडले. तो रागाने वेडा झाला व पिसाळून म्हणाला, " सी. आय. डी.लोक देखील एवढे प्रश्न विचारत नाहीत. ही काय कटकट लावली आहेस तू ? साले सरसकट बदमाष आहेत सरकारी अधिकारी. पूर्वी पैसे मागत. आता त्यांना पैशाचा, रेफ्रीजरेटरचा, स्टीरीओ टेपरेकॉर्डर्सचा– साऱ्याचा कंटाळा आला आहे जणू. आता म्हणतात, ओबेरायमध्ये एक नाईट. "

" म्हणजे ? "

" म्हणजे ओबेरायमध्ये सूट रिझर्वेशन. डीनर अँड ड्रिंकस्. अँड ए ग्लॅमर गर्ल फॉर द रेस्ट. समझे ?"

" हां साब. "

" उसका नाम सेवा. इसीके वजेसे पब्लीक सेक्टर लॉसमे रन होते है जनाब. "

दिल्लीच्या राजनैतिक वर्तुळात तर विषकन्या (राजधानींत त्यांना ' अमृतकन्या ' म्हणतात ! ) मोठी धमाल उडवून देत आहेत. कोणतीही महत्त्वाची फाईल मायक्रोफोटोग्राफीसाठी एक रात्र गायब करण्याचे साधे तंत्र या पोरींनी पक्के आत्मसात केले आहे. २६ ऑगस्ट १९६९ रोजी बलराज मधोक यांनी या ' कॉल गर्लस् ' राजधानींत किती आहेत व त्यांच्याविरुद्ध कोणती उपाययोजना केली जात आहे असा प्रश्न लोकसभेत विचारला. गोविंद मेनन यांनी अशा चाळीस केसेस् झाल्या व त्यात १३५ माणसांची धरपकड झाली असे सांगितले. डी. एम. के. चे खासदार व्ही. कृष्णमूर्ती लोकसभेत उठून उभे राहिले व मधोकांना म्हणाले, " आपण कोणत्या कॉल गर्लला बळी पडलात, मिस्टर मधोक ?"

लोकसभेत त्यावर मोठी खसखस् पिकली. बिचारे खासदार ! त्यांना कृष्ण-

मूर्तींच्या प्रश्नाचा रोखच समजला नाही. त्यांना विचारावयाचे होते, "कॉर्ल गर्ल ऑलराईट्, पण कोणत्या देशाची ? सोव्हिएट का अमेरिकन ?"

हे फॉरीन् 'कॅपिटल'चे रहस्य जेथे खासदारांना समजले नाही तेथे सर्वसामान्य जनतेला ते कोठून उलगडणार? तो एका स्वतंत्र लेखाचा विषय असल्यामुळे त्यावर इथे जास्त लिहिण्याचा मोह मी आवरता घेतो.

एवढे तरी चित्रण कशासाठी ?

कारण सामान्य जनतेला सत्ताधाऱ्यांपासून उंच अपेक्षा बाळगण्याची सवय लागली आहे. अपेक्षाभंगाचे दुःख त्यांना प्रत्यही मिळते. पण ते त्यांच्या अज्ञानातून निर्माण होत असते. अपेक्षा कोणत्या माणसाकडून किती राखाव्यात हे आज कळले नाही तर जीवन जगणे मुष्कील होईल.

एवढे कबूल करावेसे वाटते की मराठी लोक खासदार वा मंत्री व्हायच्या लायकीचे – निदान दिल्लीत तरी – खास नाहीत. चहाचा कप मिळाला तर स्वर्गानंद, तेथे हे लोक फुकट दारू का पाजणार होते ! स्वतःची बायको वा बहीण जरा इतरांशी जास्त वेळ बोलली तर डोळे फाडून हे लोक रागाने दातओठ चावीत येरझारा घालणार ! त्यांना महागडचा अमृतकन्यांची लज्जत काय परवडणार ? यांचे बाप मास्तर वा शेतकरी होते, हे लोक इन्कम्टॅक्स नियमाने देतात. हे अशी कोणती जंगी प्रॉपर्टी ठेवणार व एका वेळी चार चार मोटारी कशा उडविणार ?

मराठ्यांनो, निर्लज्जपणा हा तुमच्याकडे सद्‌गुण समजला जात नाही. तुमचे दिल्लीत कसे होईल ?

मला तुम्हाला पुन्हापुन्हा सांगावेसे वाटते की दिल्ली जी वीस वर्षांपूर्वी होती ती आज नाही. येथे गांधीजींचा साधेपणा, नेहरूंचे 'आराम हराम है'चा घोशा व सुभाष – श्यामाप्रसाद – लोहीया प्रभृतींचा राष्ट्रवादी पण कडू स्पष्टवक्तेपणा लोप पावला आहे. शिवीगाळ ऐकू येते पण त्यात परमार्थ नाही, लोकहित नाही, कोणाचेच कल्याण नाही; आहे ती बकबक आहे – कोणीतरी फुकट पाजलेल्या दारूपोटी, कोणीतरी खिशात कोंबलेल्या लाचेपायी.

नेहरूंनी लोकशाहीच्या मर्यादा व पथ्ये पाळून मगच आपली हुकूमशाही चालविली होती. इंदिरा गांधींना पित्याचा मार्ग पसंत आहे; गांधीजींचा मार्ग त्यांना अवघड वाटतो व म्हणून वर्ज आहे.

या मार्गाने जाता येणे त्यांना किती शक्य आहे ? त्या बाबतीत आजवर त्यांनी कसे आचरण ठेवले आहे ?

बापसे बेटी सवाई आहे असे म्हणतात ते खरे का ? असल्यास किती ?

वरील प्रश्नांच्या उत्तरात इंदिरेचे व अप्रत्यक्षपणे भारताच्या लोकशाहीच्या भविष्याचे रहस्य दडलेले आहे.

(क्रमशः)

## राज्य नाट्य महोत्सव

[ पृष्ठ १० वरून ]


सामान्य प्रयोग करून ग्रंथालयाचे नाव मात्र या नाट्यशाखेने बदनाम केले. ग्रामीण भागातून आलेल्या नाट्यसंस्थांना अनंत अडचणींना तोंड द्यावे लागते. तरी 'वेड्याचे घर उन्हात' सारख्या अवघड नाटकाचा नेटका प्रयोग बारामतीची नाट्यसंस्था करू शकते. आणि सर्व सोयी उपलब्ध असून नामवंत नाट्यशाखा म्हणवणाऱ्या संस्थेच्या प्रयोगाची ही दुर्दशा चीड आणणारी आहे. या नाटकात युवराजाची भूमिका करणारे—बापुराव काळे नावाचे गृहस्थ विकलीच्या अंकामध्ये संवादाची नक्कल ठेवून ती वाचून दाखवत होते. तर कलावतीची भूमिका करणाऱ्या ललिता गांधी नावाच्या नटीने आपले संवाद न आठवल्याने एक केविलवाणे हास्य करून रंगमंचावरून पळ काढला अशा संस्थेला स्पर्धेच्या रंगभूमीवर पुढील किमान पाच वर्षे तरी उतरू देऊ नये.

### बाहेरगावचे नाट्यप्रयोग

पुणे केंद्रामध्ये झालेल्या बाहेरगावच्या चार नाट्यप्रयोगांपैकी बारामती येथील नाट्य साधनेचा 'वेड्याचं घर उन्हात' या एकमात्र नाटकाचा अपवाद वगळता बाकी सर्व प्रयोग दुर्लक्षणीय होते. बारामतीच्या नटसंघापैकी चित्रा गुप्ते, (शकू) व भारत दोशी (बापू) हे कलावंत चांगले वाटले. दादाची भूमिका करणाऱ्या अनंत कुर्लेकर या कलावंताच्या प्रामाणिक प्रयत्नाची दखल घ्यावीशी वाटते. श्री. प्रभाकर देशपांडे यांचा दामू त्यांच्या दामोदरपंतापेक्षा सरस होता. निर्मितीची बाजू समाधानकारक होती.

सर्वसाधारणपणे महाविद्यालयीन नटसंघ या स्पर्धेमध्ये उतरत नाहीत. संगमनेर नगरपालिकेच्या महाविद्यालयाने अपुऱ्या तयारीने स्पर्धेत उतरून स्वतःचे हसे का करून घेतले ते समजू शकत नाही.

स्पर्धा संपल्या आता उत्सुकता आहे ती निकालाची. माझ्या मते अंतिम फेरीसाठी धन अपुरे, जादूगार, श्रीमंत आणि अमृत पडले भूमीवरती यापैकी दोन नाटकांची—त्यातही पहिल्या दोन नाटकांची शक्यता अधिक वाटते. ग्रामीण भागाचे पारितोषिक निर्विवादपणे 'वेड्याचे घर उन्हात' या नाटकास मिळेल. महाराष्ट्रीय कलोपासक या संस्थेच्या 'कथा कुणाची' नंतर पुण्याच्या नाट्यसंस्थेस अंतिम फेरीमध्ये पारितोषिक नाही. आता यंदा ?



[ पृष्ठ ३ वरून ]

आटपलेले असतील. तेव्हा किती टक्के सत्याचा विजय झाला याचा हिशेब जग-जाहीर होईल. पण गंमत म्हणजे गोष्टी इतक्या थराला गेल्या तरी काही चिकट मंडळींनी काँग्रेस-एकीची आशा न सोडता ती पुनः प्रस्थापित करण्यासाठी निरनिराळ्या सूचना करण्याचे पुण्यकर्म चालू ठेवले आहे. एक भूतपूर्व मंत्री श्री. महावीर त्यागी यांनी असे सुचविले की, दोन गटांनी दोन मेळावे भरविण्याचा खटाटोप न करता एकच मेळावा भरवून पक्षातल्या मंडळींसमोर आपआपली बाजू मांडावी व ज्याला पक्षाचा कौल मिळेल तो सच्चा असे समजावे. आणखी कोणी तरी तर विनोबांना गळ घातली आहे की, तुम्ही या भांडणात रदबदली करा. पण विनोबा भूदानाचा कार्यक्रम सोडून अक्कलदानाचा कार्यक्रम हाती घेतील असे दिसत नाही.

## काँग्रेसच्या बैलजोडीचे विभाजन ?

या सर्व गोंधळात काँग्रेसच्या मालमत्तेच्या विभाजनाचे घोंगडे तसेच भिजत पडले आहे. दरम्यान ही मालमत्ता जवळजवळ सपूर्णपणे कर्जात बुडालेली आहे असे उघडकीला आले आहे. आतापर्यंत काँग्रेसने सुमारे ९० लाख रुपयांचे कर्ज केले आहे, व अप्पा–काँग्रेस ही 'अधिकृत' काँग्रेस मानून घेणेकऱ्यांनी तिच्याकडे डोळे लावले आहेत. म्हणजे दोन्ही पक्षांना हव्या असलेल्या खरेपणाच्या शिक्क्याची ही उलटी बाजू म्हणायची. नव्या दिल्लीत जंतरमंतर रोडवरील काँग्रेस कार्यालयात काम करणाऱ्या मंडळींचा गेल्या महिन्याचा पगार चुकता करण्यासाठी तर एक मोटारगाडी विकावी लागली. अशा परिस्थितीत काँग्रेसची खरी इस्टेट एकच उरली आहे, व ती म्हणजे बैलजोडीचे चिन्ह. तेव्हा हे चिन्ह आपल्या पदरी पडावे म्हणून इंदिरा काँग्रेसने स्वाक्षरी मोहीम आरंभिली आहे. या स्वाक्षऱ्या निवडणूक-अधिकाऱ्यापुढे पेश करण्यात येणार आहेत.

## मध्यावधी निवडणुकी : किती नकार म्हणजे एक होकार ?

मध्यावधी निवडणुकी होणार की नाही या यक्षप्रश्नाचे उत्तर दिवसेदिवस अधिकच अस्पष्ट होत आलेले आहे. त्या होणार नाहीत असे इंदिराजी व त्यांचे सरकार पार्लमेंटमध्ये व पार्लमेंटच्या बाहेर जेथे जेथे संधी मिळेल तेथे तेथे सांगत आहे. पण त्यामुळे शेक्सपियरच्या वारंवार इन्कार करणाऱ्या स्त्री-पात्राप्रमाणे परिस्थिती होऊन विरोधकांचा संशय अधिकच दुणावत चालला आहे. जनसंघाचे अध्यक्ष वाजपेयी यांनी तर आपल्या कार्यकर्त्यांना मध्यावधी निवडणुकीची तयारी आरंभण्याची जाहीर चेतावणी दिली आहे. त्यांनी नुकतेच एका भाषणात जाहीर-

पणे सांगितले आहे की, "इंदिरा-सरकार ज्या साम्यवादी पार्ट्यांच्या बळावर तग धरून आहे तो केव्हा ओसरेल हे सांगता येणार नाही; तेव्हां इंदिराजींना लवकरच जनतेचा कौल घेणे भाग पडेल."

## रबातने शिकविलेला धडा ?

रबात प्रकरणाच्या निमित्ताने भारताच्या परराष्ट्रीय धोरणाची सध्या जी चिरफाड चालली आहे तिच्यातून एक गोष्ट स्पष्ट झाली आहे, व ती म्हणजे सध्या तरी इंदिरा-सरकार परराष्ट्रीय धोरणाच्या क्षेत्रात विशेष मोठी हालचाल करणार नाही. याचे प्रमुख कारण म्हणजे देशातल्या देशात जो राजकीय समरप्रसंग निर्माण झाला आहे त्याला तोंड देण्याच्या भानगडीत गुंतलेल्या इदिराजींच्या दृष्टीने परराष्ट्रीय धोरणात 'जैसे थे' परिस्थिती चालू ठेवणं हेच सध्या सर्वात अधिक सोयिस्कर आहे. दुसरे म्हणजे भारताचे हितसंबंध ज्या भूभागांशी विशेष निगडीत आहेत तेथल्या सध्याच्या परिस्थितीत भारताने काही नवीन करून दाखवायला वावच नाही असे सांप्रत सरकारी मत आहे. थोडक्यात म्हणजे इंदिराजींचे सरकार सध्या तरी उत्तर व्हिएटनाममधील भारतीय राजदूताचा दर्जा वाढवील अथवा पूर्व जर्मनीला राजकीय मान्यता देईल असे दिसत नाही. इंदिराजींना काँग्रेसमधले आपले शासन स्थिरस्थावर केल्यानंतरच त्यांचे सरकार या दोन गोष्टी करायला धजेल असे वाटते. ती वेळ आली म्हणजे भारताच्या परराष्ट्रीय धोरणाला 'समाजवादी' मुखडा चढविण्याचा विचार इंदिराजी करू शकतील. पण अजून ती वेळ आलेली नाही व सांप्रत इंदिराजींच्या समोर प्रमुख समस्या आहे ती म्हणजे काँग्रेसचा परंपरागत पवित्रा व आपला नवीन समाजवादी आविर्भाव यांची सांगड घालून शक्य तेवढ्या काँग्रेसी कोकरांना आपल्या कळपात कसे ओढन आणता येईल ही होय. उत्तर व्हिएटनामला मान्यता दिल्यास त्याचा भारत-अमेरिका संबंधावर अनिष्ट परिणाम होईल हे माहीत असूनही देशातला अंतर्गत राजकीय गोंधळ आटोक्यात आल्यास ही कारवाई करण्याचा सरकारचा मनसुबा असल्याची चाहूल आहे. आणि पूर्व जर्मनी हे एक प्रस्थापित राज्य आहे या सत्याकडे डोळेझाक करून चालणार नाही असे सरकारी मत आहे; परंतु पूर्व जर्मनीला मान्यता दिल्याने भारताला विशेष लाभ काय होईल या प्रश्नाचे उत्तर सध्या तरी सरकारजवळ दिसत नाही.

— अनामिक

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून, तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर




' डॉक्टर, दुसरं तिसरं काही नाही ! माझी स्मृती वाजवीपेक्षा तल्लख होतेय् ! गेल्या सात आठ वर्षांत मी टॅक्स न भरल्याचं मला आठवू लागलंय्, नि हे धोक्याचं आहे. . . '

लाल महाल

प्रतापगड

पन्हाळगड

राजगड

पुरंदर

आग्रा

आवृत्ती : तिसरी

किंमत : तीन रुपये

ब. मो. पुरंदरे
यांची सहा पुस्तके
१५ डिसेंबरला
प्रसिद्ध झाली.

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव
पुणे ३०